# मराठी साहित्यातील



# ययाती

भा. व्यं. गिरधारी.

# मराठी साहित्यातील ययाती

*

डॉ. भा. व्यं. गिरधारी
प्राचार्य
गोखले एज्युकेशन सोसायटीचे
कला आणि वाणिज्य महाविद्यालय
जव्हार (ठाणे) ४०१ ६०३

*

विभा प्रकाशन
'विभा', पर्णश्री को-ऑप. हौ. सोसायटी
एच्. पी. टी. कॉलेज वसतिगृहाजवळ
नाशिक-४२२ ००५

**मराठी साहित्यातील ययाती :**

Marathi Sahityatil Yayati

डॉ. भास्कर गिरधारी

Dr. Bhasker Girdhari

---

प्रकाशिका :

सौ. वसुधा भास्कर गिरधारी
विभा प्रकाशन,
'विभा', पर्णश्री को-ऑप. हौ. सोसायटी
एच्. पी. टी. कॉलेज वसतिगृहाजवळ
नाशिक-४२२ ००५

---

सर्वाधिकार : प्रकाशिकेच्या स्वाधीन

---

मुद्रक :

श्री. संदीप लाहोटी
अभिनव मुद्रणालय
मेनरोड, संगमनेर-४२२ ६०५, फोन : २४६

---

प्रथम आवृत्ती :

गुढीपाडवा : ६ एप्रिल १९८९

---

ग्रंथालयीन वर्गीकरण :


द्विबिंदु वर्गांक : O155, 3 M 98 : g
दशांश वर्गांक : 891-4609

---

मूल्य :
चाळीस रुपये फक्त

॥ श्री ॥

"वंदनीय तात्यासाहेब शिरवाडकर
आणि
समस्त महाभारत रसिकांना–
सविनय सादर समर्पण"



आदरणीय तात्यासाहेबांच्या सहवासातील माझ्या
सुयोगाने टिपला गेलेला क्षण.

– भास्कर गिरधारी

# अनुक्रमणिका

**मनोगत–**

**अभिप्राय–**

**कचोपाख्यानातील व्यक्तिचित्रे–**

उपाख्यान विचार– १, सर्जनशील उपाख्यान– २, 'आमचा पूर्वज ययाती'– ३, कचोपाख्यानावरील नाटके– ४, नाट्याचार्य खाडिलकरांचे सं. विद्याहरण– ५, देवयानीं अर्थात विद्यासाधन– १९, सं. संजीवनी नाटक– २४, आणखी एक सं. संजीवनी नाटक– २८, श्री संजीवनीहरण : राष्ट्रभक्त 'कच'– ३१, कचोपाख्यानाचे मराठी अवतार– ३४

**ययाती उपाख्यानातील व्यक्तिचित्रे–**

सं. देवयानी पाणिग्रहण नाटक– ३६, वि. गो. श्रीखंडे यांचे सं. ययाती– ४१, वि. स. खांडेकरांची 'ययाति' कादंबरी– ४७, वि. वा. शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी'– ६४, 'ययाति' चे नाट्यरूपांतर– ७२, ग. त्र्यं. माडखोलकरांची 'देवयानी'– ७४, मंगेश पाडगांवकरांची 'शर्मिष्ठा'– ८२, कार्नाडांचे अनुवादित नाटक– ८६, समालोचन– ८८

**परिशिष्टे–**

अ) प्रबंध : रूपरेषा आणि निष्कर्ष– ९१ ब) साहित्यकृतींच्या विविध प्रेरणा– १०५ क) महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्याची कालानुक्रमे सूची– १०७ ड) प्रबंधात अभ्यासलेल्या काही महत्त्वाच्या नोंदी– ११३ इ) मराठी साहित्यात आढळणाऱ्या महाभारतातील महत्त्वाच्या विषयांची सूची– ११४ ई) प्रकाशित साहित्याची सूची– ११६.

* * *

# — मनोगत —

मराठी प्रतिभावंतांचे वैशिष्टच म्हणजे महाभारतातील ययाती उपाख्यानावर केलेली विपुल ललित साहित्य निर्मिती. आश्चर्य म्हणजे संस्कृतमध्येही अभिजात, गाजलेली साहित्यकृती या उपाख्यानावर प्रसिद्ध नाही. कै. भाऊसाहेब खांडेकरांनी तर शब्दशः लाख मोलाची 'ययाति' कादंबरी लिहून ज्ञानपीठ सन्मान वाढविला. एकूण अठरा ललित पुस्तके या उपाख्यानावर आधारित असून, शिवाय 'ययाति' ला ज्ञानपीठ पुरस्कार मिळून, एकही स्वतंत्र समीक्षा ग्रंथ या विषयावर नाही याची खंत वाटत होती. सुदैवाने गुरुवर्य डॉ. ह. कि. तोडमल यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाभारतावर आधारित अर्वाचीन मराठी ललित साहित्य' अभ्यासले. पुणे विद्यापीठाने १९७९ सालीच पीएच्. डी. पदवी दिली. प्रबंध अद्यापही प्रकाशनाची वाट पहात आहे. प्रकाशकांशी संपर्क साधण्यापेक्षा स्वतःच हे ग्रंथ प्रकाशनाचे धाडस महाराष्ट्र रसिकांच्या आणि महाभारत प्रेमी जनांच्या विश्वासावर केले आहे.

सुयोगाने आदरणीय डॉ. गो. के. भट यांनी आपला 'अभिप्राय' प्रस्तावना म्हणून छापण्यास अनुमती दिली. त्यांचे ऋण शब्दातीत आहे. वंदनीय तात्यासाहेब शिरवाडकरांना 'ज्ञानपीठ' गौरव प्राप्त झाला. मन आनंदी झाले. त्या उत्साहात त्यांची परवानगी गृहीत धरून हा ग्रंथ त्यांना व महाभारत प्रेमी रसिकांना सादर समर्पित केला आहे. 'बेन्स' च्या सौजन्याने आतील छायाचित्र उपलब्ध झाले. त्यांचेही आभार!

या ग्रंथाच्या मुद्रण व्यवस्थापनाची जबाबदारी प्रा. पंडितराव निजामपूरकर व श्री. राधाकिसन दिघे यांनी स्वीकारली. मुद्रणशोधन श्री. वेल्हाळ सर यांनी केले. मुद्रण श्री. संदीप व संजय लाहोटी ह्या बंधूनी केले. ग्रंथालयीन वर्गांक श्री. राजेंद्र कुम्भार यांनी काढून दिला. मुखपृष्ठ संकल्पना श्री. सदाशिव मुकणे व श्री. मोहन क्षत्रिय यांची आहे. या सर्वांचे आभार परिवारातील आप्त संबंधित असल्याने अव्यक्त ठेवतो.

महाभारत प्रेमी रसिकांना विनम्र अभिवादन !

महाशिवरात्री
६ मार्च, १९८९

**भास्कर गिरधारी**

# अभिप्राय!

महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्याचा अभ्यास या प्रबंधाचा आवाका तसा मोठा आहे. पण लेखकाने तो सावरला आहे. एका मोठ्या कालखंडातील शेकडो पुस्तकांचे वाचन व अभ्यास लेखकाने केला आहे; आणि तो चिकित्सक दृष्टीने केला आहे याचा प्रत्यय येथ आहे.

प्रबंध लेखकाला मर्मग्राही दृष्टी आहे. समतोल टीका दृष्टीही आहे हेही जाणवते. ययाति, राधेय, युगान्त, व्यासपर्व, चक्र इत्यादी मोलाच्या वैचारिक आणि ललित कृत्तीचे योग्य रसग्रहण जसे लेखक करतो तसे त्याला सदोष लेखनाचेही भान आहे; मग ते मूळ कृतीचे असो की एखाद्या कृतीवरील समीक्षेचे असो. उदाहरणे म्हणून शिरवाडकरांच्या 'ययाती देवयानी' वरील उषा हस्तक यांच्या परीक्षणाचा चिकित्सक विचार जसा लेखक करतो. तसेच या नाटकात 'यती आणि विदूषक थोडा जास्त भाव खातात.' हे सांगायलाही विसरत नाही. माडखोलकरांच्या 'देवयानी मधील स्वच्छंद, अनुचित बदलाची नोंद लेखकाने घेतली आहे. (टिपणीसांच्या 'मत्स्यगंधा' या नाटकातील गौरी या पात्राने काय साधले, ही चर्चा योग्य आहे आणि कलान्तर्गत न्यायात वसू शकेल असे पात्र चालेल ही चर्चाही समीक्षा ग्राह्य आहे. 'ठाकरे' यांच्या नाटकाच्या विवेचनात टीकात्मक विवेक आहे. 'भिडे' यांच्या द्रौपदी वस्त्रहरण नाटकाचे केलेले विवेचन सडेतोड आहे. टेंबे-खाडिलकर यांची तुलना उद्‌बोधक आहे. खाडिलकरांच्या कीचकवधाची स्तुती केल्यावर 'त्रिदंडी संन्यास' वर केलेली टीका अशीच योग्य व समतोल आहे.)

संशोधनात्मक अभ्यास करतांनाही काही तत्त्वपध्दती (Research Methodology) असते, याची जाणीव लेखकाला आहे. (याचा प्रत्यय दोन ठिकाणी येतो. इरावती कर्वे यांचे अर्जुन विषयक प्रतिपादन 'युगान्त' मध्ये विखुरलेल्या अनेक संदर्भावरून सिद्ध केले आहे. हे एक स्थळ. दुसरे परिशिष्ट ज्यात महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी साहित्याची कालानुक्रमे मांडणी केली आहे.)

लेखकाच्या समतोल स्वतंत्र समीक्षादृष्टीमुळे या प्रबंधाने एका विशिष्ट विषयावरील मराठी साहित्याचे संकलन व अभ्यास सिद्ध झाला आहे. त्याचे मोल आहेच.

**डॉ. गो. के. भट (पुणे)**

# कचोपाख्यानातील व्यक्तिचित्रे

## उपाख्यान-विचार:–

महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्याचा अभ्यासात 'ययाती' या महत्त्वाच्या व सर्वात अधिक मराठी ललित साहित्यकृतींना जन्म देणाऱ्या उपाख्यानाचा विचार प्रस्तुत ठिकाणी केला आहे. वि. स. खांडेकर आपल्या 'ययाति' कांदबरीच्या प्रास्ताविकात 'ययाती कथा हे उपाख्यान असल्यामुळे महाभारतापेक्षा आणखी स्वातंत्र्य घेण्यास वाव आहे' असे म्हणतात. ऐस्वीकाराई मत आहे. ललित साहित्यिकाला उपाख्यानात कल्पनाविलासाला अधिक वाव मिळतो किंवा स्वातंत्र्य घेता येते. मूळकथेत प्रक्षिप्त ठरणाऱ्या आख्यान उपाख्यानाचा ज्ञात तपशील, तोंडावळा तसाच टिकवून त्यात स्वतःचे रंग भरण्याचे स्वातंत्र्य ललित लेखकाला आहे. एखाद्या मेकॅनोच्या खेळासारखी ललित लेखक नवी नवी जुळणी पुराणकथांची करीत असतात. लेखकाच्या नव्या शोधानुसार (Findings) त्याला विशिष्ट सूत्र किंवा आकृतिबंध गवसलेला असतो. महाभारतातील उपाख्यानांचा कलात्मक आविष्कार म्हणून कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुन्तलम्' नाटकाचा एक आदर्श उदाहरण म्हणून विचार करता येईल. त्यात ललित लेखकाला स्वातंत्र्याची सनद मिळाली आहे. उपाख्यानांची काव्यानुकूलता जोखून कालिदासाने आपल्या प्रतिभाबलाने एक समर्थ कलाकृती निर्माण केली आहे. अशा अजरामर कलाकृतीची निर्मिती पुराणकथेतून संभवनीय असते.

मराठी प्रतिभेने एक फार मोठा पल्ला 'कच, ययाती, देवयानी, शर्मिष्ठा' या उपाख्यानाच्या कलात्मक अभिव्यक्तीतून गाठलेला आहे. कचदेवयानी, ययातीशर्मिष्ठा उपाख्यानाची काव्यानुकूलता आणि कलात्मकता जाणून घेण्याची कलात्मक दृष्टी (Artistic Vision) मराठी प्रतिभावंतांजवळ आहे. प्रथमतः या उपाख्यानाचे वाङमयीन मोल जाणून

त्यांनी लिहिले ही गोष्ट विशेष लक्षणीय आहे. संस्कृत साहित्यिकांच्या अवलोकनातून ही गोष्ट सुटलेली आहे. हे नमूद केल्यावर मराठी साहित्यिकांच्या स्वतंत्र कलादृष्टीचे महत्त्व पटते.

## सर्जनशील उपाख्यान:-

महाभारतातील 'कच ययाती' उपाख्यान हे मराठी प्रतिभा-वंतांच्या सर्जनशीलतेला आव्हान ठरले आहे. कर्णाच्या कहाणीप्रमाणेच कच-ययातीची कहाणी मराठी साहित्यिकांना आकर्षून घेते. कर्णविषयक साहित्याप्रमाणेच ययाती, कच उपाख्यानांवर आधारित मराठी ललित लेखन विपुल आहे. विपुलतेबरोबरच त्यात वैविध्य व वैचित्र्यही आहे. विविध साहित्य प्रकारांच्या माध्यमातून हे उपाख्यान अवतरले आहे. अर्वाचीन कालखंडात म्हणजे इ. स. १८५० पासून १९७५ पर्यंतच्या काळात या उपाख्यानाविषयीचे कुतूहल मराठी ललित लेखकात पुष्कळ दिसून येते. यावरून या उपाख्यानाची सर्जनशीलता ध्यानात येते. या उपाख्यानावर आधारित साहित्यकृती लोकप्रिय व लोकमान्य तर ठरल्याच पण कलामूल्यांच्या दृष्टीनेही सरस लक्षवेधी ठरल्या आहेत.

कचोपाख्यानाचा समर्थ आविष्कार म्हणून खाडिलकरांचे 'विद्याहरण' तर ययाती उपाख्यानाचे समर्थ व कलात्मक आविष्कार म्हणून वि. स. खांडेकरांची 'ययाति' मुळातच आहेत. ययाती उपा-ख्यानात 'उत्तरयायात' हा ययातीच्या उत्तर-आयुष्याशी संलग्न भाग आहे.

पहिल्या कचोपाख्यानात कच, देवयानी, शुक्राचार्य, वृषपर्वा यांना महत्त्व आहे. कच शुक्राचार्यांकडे विद्या शिकण्यासाठी विद्यार्थी म्हणून राहतो आणि संजीवनी विद्या हरण करुन निघुन जातो; ही सर्व हकिकत पहिल्या भागात येते.

मराठी ललित साहित्यात या दोनही भागांवर आधारित साहित्य-कृतींची निर्मिती झाली आहे. कचोपाख्यानावर आधारित साहित्यात नाट्याचार्य खाडिलकरांचे 'विद्याहरण' ही प्रमुख साहित्यकृती आहे. या

शिवाय 'कच देवयानी नाटक'[1] 'देवयानी अर्थात विद्यासाधन', संगीत संजीवनी नाटक 'संजीवनीहरण' नावाचे नाटक व खंडकाव्य, इत्यादी साहित्यकृती प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यात कचाचे 'संजीवनी विद्याहरण' कथानक आले आहे. कच, देवयानी, शुक्राचार्य, वृषपर्वा या व्यक्तींना महत्त्व मिळाले आहे.

ययाती उपाख्यान हा जो दुसरा भाग आहे. त्यात कच, देवयानीला 'कोणताही ऋषिकुमार तुझ्याशी विवाहबद्ध होणार नाही असा शाप देतो' यापुढील कथाभाग आलेला आहे. त्यात देवयानी शर्मिष्ठा कलह, देवयानीचे ययातीकडून पाणिग्रहण, ययातीशर्मिष्ठा-प्रणय, देवयानी-शुक्राचार्यकोप, ययातीला वार्धक्याचा शाप, पुरुकडून ययातीच्या वार्धक्याचा स्वीकार इत्यादी प्रसंग आलेले आहेत. या कथानकात ययाती, देवयानी, शर्मिष्ठा, पुरु, शुक्राचार्य, कच या व्यक्तिरेखांना महत्त्व आहे.

ययाती उपाख्यानावर वि. स. खांडेकरांची 'ययाति' (ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त) कादंबरी, गिरीश कार्नाड यांचे 'ययाती' नाटक, वि वा. शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी' नाटक आधारित आहे. 'ययाति' (१९५९) कादंबरीच्या निर्मितीनंतर ययाती उपाख्यानाला विशेष बहर आला असून काही लेखकांनी आपल्या साहित्यकृती ययातीच्या आधाराने निर्माण केल्या आहेत.

कच व ययाती उपाख्यान असे दोन भाग कल्पून प्रस्तुत ठिकाणी विवेचन केल्यास अधिक सोयीचे व सुसंगत होईल म्हणून तोच मार्ग अवलंबिला आहे. तत्पूर्वी कच देवयानी ययाती शर्मिष्ठा उपाख्यान महाभारतात कां व कसे आले हे संक्षिप्तपणे पाहणे आवश्यक आहे.

## 'आमचा पूर्वज ययाती'

कौरवांचा 'वंशकर' म्हणून दुष्यन्त शकुन्तला उपाख्यान महाभारतात येते त्याचप्रमाणे 'आमचा पूर्वज ययाती' याला शुक्राचार्यांची

---

[1] गद्यपद्यात्मक कचदेवयानी नाटक : स. बा. सरनाईक, (१८८७)
सं. कचदेवयानी नाटक : वि. भि. कापरेकर, (१८९२)

कन्या देवयानी कशी लाभली हा प्रश्न जनमेजयाने विचारला. त्यासाठी हे ययाती उपाख्यान महाभारतात आले आहे.[2] देवयानीची कथा कचाशी निगडित असल्यामुळे कचोपाख्यान ओघात आले आहे. येथे कच, ययाती, देवयानी, शर्मिष्ठा, शुक्राचार्य, पुरु या व्यक्तींच्या जीवनातील घटनांनी सांधलेले कथानक त्यांच्या नातेसंबंधांवर प्रकाश टाकते.

साहित्यिकांनी जरी ययातीचे वार्धक्य पुरु घेतो एवढा कथाभाग स्वीकारला असला तरी महाभारतात हे उपाख्यान आणखी पुढे आहेच! त्यात ययाती स्वर्गात गेला, तेथून खाली येत असतांना त्याचा अष्टक, वसुमान, शिबि प्रभृतींशी जो संवाद झाला तो 'उत्तरयायात' भाग म्हणून येतो. या संवादानंतर ययाती स्वर्गात जातो, अशी कथा पुढे आहे. शुक्राचार्य, वृषपर्वा, कच, देवयानी, शर्मिष्ठा, ययाती, यदु, पुरु या व्यक्तींचे जीवन व स्वभाव न्याहाळले म्हणजे या कथानकातील नाट्यमयता (Dramatic Element) जाणवते. रंजन-प्रबोधनप्रेरणेतून, अर्वाचीन मराठी साहित्याच्या आरंभीच्या (१८०० ते १८८५ पर्यंतच्या) कालखंडात ललितसाहित्य निर्माण झाले आहे. त्यातनाट्य-लेखनाकडे साहित्यिकांचा विशेष ओढा दिसून येतो. 'ययाती-कचोपाख्यान' नाट्यलेखनासाठीच या कालखंडात निवडल्याचे आढळते.

## कचोपाख्यानावरील नाटके-

इ. स. १८८१ ते १८९० या कालखंडातील किर्लोस्कर संगीत नाटकाच्या प्रभावाने या उपाख्यानावर नाट्यलेखन झाले आहे. स. बा. सरनाईक यांचे सं. कचदेवयानी हे नाटक इ स. १८८७ मध्ये प्रसिद्ध झाले.[3] श्री. वि. भि. कापरेकर यांनी १८९२ मध्ये 'कचदेवयानी'

---

[2] महाभारत आदिपर्व (संभवपर्व) अध्याय ७५ ते ९३.

[3] 'कथानकाची रचना बऱ्यापैकी असून, देवयानी, कच, शुक्राचार्य यांच्या स्वभावाचा परिपोष यांत चांगला साधला आहे. अत्यंत साध्या व सोप्या भाषेत सुटसुटीत संवादात हे पौराणिक कथानक त्यांनी व्यक्त केले आहे.' (पौराणिक नाटके : वि. पां. दांडेकर, पृ. २३४)

नाटक लिहिले आहे कचदेवयानी उपाख्यान मराठीमध्ये नाटचरूपाने सांगण्याचे कार्य या दोन्ही नाटकांनी नेटकेपणाने केले आहे. पण सामान्य प्रतीची ही नाटचनिर्मिती असल्याचा अभिप्राय डॉ. वि. पां. दांडेकर यांनी आपल्या पौराणिक नाटके या प्रबंधात दिला आहे.[4] अशाच प्रकारचे एक सामान्य दर्जाचे नाटक म्हणून श्री. भि. ग. आठवले यांच्या 'सं. देवयानी पाणिग्रहण'[5] या नाटकाचीही नोंद याच ठिकाणी केली पाहिजे. या तिन्ही नाटकांची या विषयावरील पौराणिक नाटके म्हणून दखल घेण्यापलीकडे फारसे वैशिष्टच त्यात नाही.

## नाटचाचार्य खाडिलकरांचे सं. विद्याहरण :–

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी १९१३ साली महाभारतातील कचोपाख्यानावर 'सं. विद्याहरण' नाटक लिहिले. या नाटकाच्या नावाप्रमाणे खाडिलकरांना कचाने शुक्राचार्यांकडून केलेल्या संजीवनी विद्येच्या प्राप्तीपर्यंतचे कथानक नाटचरूपात सादर करावयाचे आहे. खाडिलकर विचारप्रधान नाटके लिहितात. त्यांच्या 'कीचक–वध' नाटकातील विचारनाटच फार प्रभावी आहे. पौराणिक कथाभाग घेऊन त्यात काही 'शिष्टसंमत' (तेवढेच) फेरफार ते करतात आणि आपल्याला हवा तो परिणाम नाटचमाध्यमातून साधतात.

## शिष्ट संमत फेरफार :–

खाडिलकरांनी विद्याहरणाच्या प्रस्तावनेत आपण महाभारतातील आदिपर्वात आलेल्या कचोपाख्यानात 'शिष्ट-संमत' फेरफार करीत आहोत

---

[4] 'अगदी सुरुवातीच्याच नटी सूत्रधारांच्या प्रवेशातच कच देवयानीचा संबंध विफल होणार अशी सूचना जी नाटककाराने दिलेली आहे ती विशेष कौशल्यपूर्ण वाटते. पण कथानकाची रचना वा पात्रांचा स्वभाव-परिपोष इत्यादी दृष्टींनी हे नाटक एक विशेष लक्षात घेण्याजोगे ठरणार नाही.'

(पौराणिक नाटके : डॉ. वि. पां. दांडेकर, पृ. २४६–४७)

[5] या नाटकाचा लेखनकाल १८९६ आहे.

असें म्हटलेलें आहे.[6] पौराणिक नाट्यलेखनात खाडिलकर सिद्धहस्त लेखक आहेत. पुराणानें पुरविलेला महत्त्वाचा तपशील ते कायम ठेवून आपल्याला अभिप्रेत असलेले विचारनाट्य कलात्मकतेने गुंफतात. या नाटकाच्या मुळाशी त्यांचे राजकीय तत्त्वचिंतकाचे व्यक्तिमत्त्व उभे आहे. प्रस्तुत विद्याहरण नाटकातही 'मद्यपान निषेध' करणारे विचार-नाट्य ते शुक्राचार्यांच्या व त्यांच्या मद्यपान संप्रदायाच्या अधःपातातून सूचित करतात.

महाभारताचे उपाख्यान आणखी एका दृष्टीने त्यांना उपयुक्त वाटते 'शिवाय मद्यपानाविषयी तिटकारा उत्पन्न करुन मद्यपान निषेधाच्या विषयाची नाट्यसृष्टीने पूर्तता व्हावी म्हणून मद्याधीन 'शिष्यवरा' चे हास्यरसांची जोड पौराणिक पात्रांना द्यावी लागली.'

कृ. प्र. खाडिलकरांनी महाभारताच्या वाढीच्या प्रक्रियेला ललित लेखकांचा कसा हातभार लागतो, नव्या आविष्कारांनी महाभारत कसे वाढते आहे, याचा निर्वाळा या नाटकाच्या निमित्ताने केलेल्या विधानातून दिला आहे. 'विद्याहरणा' ची ही कथा नीट समजण्याकरिता व यांतील रसाचा परिपाक होण्याकरिता साखळीतील निरनिराळ्या दृष्यांना योग्य वळण द्यावे लागले. (प्रस्तावना)

---

6 "महाभारतातील 'कच-देवयानी' आख्यानांत शिष्ट संमत फेरफार करुन हे नाटक लिहिलें आहे. शुक्राचार्यांना स्वतःचे शिष्यवृंदाबद्दल व सांप्रदायाबद्दल अपत्य स्नेहाचे तोडीचा अभिमान वाटत होता, आणि त्यांचा शिष्यवृंद स्वहिताविषयी नेहमी दक्ष होता. अशा अभिमानाच्या व दक्षतेच्या तटबंदीत कोंडून ठेवलेली संजीवनी विद्या देवांच्या बाजूला कशी गेली? या विद्येचे हरण करितांना कचाचे कार्य निष्ठेला देवयानीच्या दिव्य प्रेमाची मदत मिळाली; दैत्यांच्या फाजील दक्षतेतील अविचाराचा पाठींबा मिळाला व आचार्यांच्या सुरापानाचे व्यसनामुळें तटबंदीचे दरवाजे खुले झाले."

सं. विद्याहरण (नाटक) : कृ. प्र. खाडिलकर आ. ८ वी, १९७२
(प्रस्तावना पृ. नाही.)

खांडेकरांची 'ययाती' ही कादंबरी जशी आपल्या काळात प्रभावी ठरली. नवीन परंपरा निर्माण करु शकली तशाच प्रकारे खाडिलकरांची 'कीचक-वध' आणि 'विद्याहरण' ही दोन नाटके. १९०० ते १९२५ या कालखडावर आपला विशेष ठसा उमटविणारी झाली आहेत.

स्वत:ला अभिप्रेत असलेल्या मद्यपाननिषेध विषयानुकूल महा-भारत कथा बनविण्याच्या खाडिलकरांच्या प्रयत्नामुळे या उपाख्यानातील शुक्राचार्यांच्या व्यक्तिरेषेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महा-भारतातील कचोपाख्यानात कचाचे विद्याहरण महत्त्वाचे आहे.

महाभारतात एवढ्या ठळकपणानें शुक्राचार्य या कथाभागात येत नाहीत. शिवाय कृ. ह. दीक्षितांचे 'विद्याहरण अर्थात विद्यासाधन', शा. रा. वंदे यांचे 'सं. संजीवनी' मामा वरेरकरांचे 'संजीवनी' हीं नाटके म्हणजे 'विद्याहरणाची प्रभावळ' आहे. स्वत: नाटककारांनी या गोष्टीची कबुली दिलेली आहे. कचोपाख्यान मराठीमध्ये रुजविण्याचे श्रेय खाडिलकरांच्या विद्याहरणाचे आहे आणि ययाती उपाख्यान मराठी मनात विशेष रुजविण्याचे श्रेय भाऊसाहेब खांडेकरांच्या 'ययाती' कादंबरीचे आहे. कलाबाह्य रंजनाची किंवा प्रचाराची प्रेरणा ज्या साहित्यकृतीची असते त्या सामान्य कृती ठरतात. पण खाडिलकरांच्या प्रतिभेत रंजन आणि उद्बोधन असूनही कलात्मकतेचा स्पर्श नाट्य-कृतींना देण्याचे सामर्थ्य आहे.

## मदिरा संप्रदाय : शुक्राचार्यांचा नवा अवतार:-

खाडिलकरांनी विद्याहरण नाटकांत मदिरापानाचे स्तोम अगदी नाटकाच्या आरंभापासून वर्णिले आहे. देवयानी सरस्वतीच्या रूपात रुसून बसली असून तिला मदिरेचा नैवेद्य दाखविण्याचा आग्रह तिच्या सख्या, दासीजन करीत आहेत. असा नाटकाच्या प्रारंभीचा देखावा आहे. यावरुन कल्पना येते की, या नाटकांत मद्यपानाच्या प्रश्नाला महत्त्व आहे. म्हणूनच खाडिलकर नाट्यारंभापासून आपले लक्ष त्यावर केंद्रित करतात. हे मदिरासक्तीचे चित्र मुळीच नाही. खाडिलकरांच्या नाट्यरचनाकौशल्याची ही सारी किमया आहे.

...७

कच-देवयानी प्रणयाराधनातून निर्माण होणारा शृंगाररस, कचाची ध्येयवादी कार्यनिष्ठा, देवयानीचे कचावरील अत्युत्कट प्रेम' देव-दानवांच्या मधील वैमनस्ये गौण पात्रांच्या मदतीने हास्यरसाची निर्मिती, शुक्राचार्यांची भक्कम तात्त्विक अधिष्ठानावर उभी असलेली व्यक्तिरेखा, इत्यादी सर्व गोष्टींबरोबरच शुक्राचार्यांचे अतिरेकी मद्य-पानाचे व्यसन, त्यातून निर्माण झालेला मदिरा संप्रदाय आणि शेवटी घडलेल्या अध:पतनाने त्यांनी केलेला मद्यपानाचा निषेध, या गोष्टींना 'विद्याहरणा'त विशेष महत्त्व आले आहे त्यासाठीच शुक्राचार्यांची नाटकाच्या अखेरीस एकच प्याल्यातील सुधाकराप्रमाणेच, मद्यपानाच्या धिक्काराची प्रदीर्घ स्वगते आली आहेत.

प्रचारकी थाटाचा आविर्भाव येथे व्यक्त होत असला तरी खाडिलकरांच्या व्यक्तिचित्रणातील सामर्थ्याने आणि घटना प्रसंगांच्या जुळणीतील कौशल्याने त्याला केवळ प्रचाराचे स्वरूप न राहता ते त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वाभाविक अंग बनत जाते व त्याला कलात्मक चित्रणाची पातळी लाभते. 'युवराज' 'मधुकर' ही काल्पनिक व्यक्ति-चित्रणे एकच प्याल्यातील तळिरामादि 'आर्य मदिरा मंडळा' सारखीच मद्यपानाच्या दुष्परिणामांचे चित्र रेखाटण्यासाठी आहेत शुक्राचार्यांचा एक महत्त्वाचा डाव आहे. त्यांना कचाला आपल्या मद्यपानपंथात सामील करुन घ्यावयाचे आहे. त्यासाठी ते प्रतिज्ञापूर्वक प्रयत्न करतात. खाडिलकरांनी केलेली मदिरा संप्रदायाची निर्मिती, महाभारतातील शुक्राचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक व्यापक करते. त्यांच्या व्यक्तित्वाचे विश्लेषण करते. मूळ उपाख्यानातील शुक्राचार्यांची व्यक्तिरेखा तिचा कल आणि तोल लक्षात घेऊन विकसित होते आणि शुक्राचार्यांचा नवा अवतार घडतो.

## खाडिलकरांची नवनिर्मिती:-

कचाला आपल्या मद्यसंप्रदायात ओढण्याचा शुक्राचार्यांचा डाव मूळ उपाख्यानात नाही. खाडिलकरांनी नव्याने ही कल्पना मांडली आहे. खरे तर शुक्राचार्यांना कचाला आपल्या आश्रमातून घालवून

देण्याचीं इच्छा आहे. पण धृतराष्ट्राला, द्रोणाचार्याला जसा अपत्यस्नेह, पुत्रमोह आहे; त्यापुढे काही सुचतच नाही; तशीच स्थिती या नाटकातील शुक्राचार्यांची आहे. 'देवयानी मला, पुत्र जणु एकला!' अशी त्यांची स्थिती आहे. असुर राजाचे गुरु असूनही आपल्या लाडक्या एकुलत्या एक कन्येपुढे त्यांचे काही चालत नाही शुक्राचार्यांना जुळते घेण्यापलीकडे आणि देवयानीच्या इच्छेला सादर होण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय शिल्लक राहत नाही.

सुरुवातीला शुक्राचार्यांनीच देवयानीला कचावर प्रेम करण्याचा सल्ला दिला आहे. पण त्यांना खरोखरच कच–देवयानी हा अभंग समास त्यातून घडेल याची कल्पना नव्हती. या समासाचा विग्रह होत असला तरी तो समासच आहे, याचा विसर शुक्राचार्यांना पडलेला दिसतो. शुक्राचार्यांना देवयानी पूर्णपणें कचावर अनुरक्त होईल. त्याच्या संपूर्ण आधीन होईल याची कल्पनाच आली नाही. यातून एक नवे नाट्य येथे उमलले आहे. या नाटकातील शुक्राचार्य संजीवनी विद्या आपल्या जावयाला हुंडा म्हणून जाहीर करतात. शुक्राचार्य इंद्राने देवलोकातून पाठविलेल्या ज्ञानी कचाला विद्यार्थी म्हणून स्वीकारतात पण स्वतःच्या जाळयात सापडावा ह्या हेतूने! देवयानीला ते म्हणतात 'उलट तू कचावर प्रेम करुन प्रेमाच्या जोराने कचाला माझ्या संप्रदायाच्या पचनी पाड, अशी माझी आज्ञा आहे'[7] खाडिलकरांची देवयानीसुद्धा या गोष्टीला उद्युक्त होते. ती म्हणते "बाबा! आपल्या सांप्रदायात त्यांना प्रेमाने ओढून घेण्यास मी कधी तरी कमी करीन काय? वाडवडिलांच्या संप्रदायांत पुरुषांना गुरफटून टाकण्याकरतांच आम्ही बायका जन्माला आलेल्या असतो"[8] येथे देवयानीच्या प्रेमाविषयी शंका येऊ लागते. प्रेम ही एक मोठी शक्ती हे जाणून शुक्राचार्य हा धूर्त डाव टाकतात पण तो त्यांच्यावरच उलटतो. महाभारतातील कथानकात देवलोकातील–शत्रुपक्षातील माणसाला, विद्या देण्यासाठी शिष्य म्हणून शुक्राचार्य स्वीकारतातच कसे? असा जो

---

[7] सं. विद्याहरण : कृ. प्र. खाडिलकर, १९७२ अंक १ (पृ. १४)

[8] सं. विद्याहरण : कृ. प्र. खाडिलकर, आ. ८ वी, १९७२ (पृ. १२)

प्रश्न निर्माण होतो. त्याला खाडिलकरांच्या या नव्या कल्पनेने उत्तर दिले. खाडिलकरांनी शुक्राचार्यांना येथे अधिक मानवी केले आहे.

हीच गोष्ट खाडिलकरांनी 'युवराज' या नव्या पात्राची योजना करुन साधलेली आहे. हा युवराज म्हणजे वृषपर्व्याचा पुत्र असून त्याला नेहमी स्वतःच्या भवितव्याची काळजी आहे. त्याला 'कच' हा फार मोठा अडथळा वाटतो. त्याच्या क्षीरसागरात तो त्याच्या दृष्टीने 'मिठाचा खडा' असतो. युवराज अहोरात्र या गोष्टीची चिंता करतो. 'कच देवयानीसह संजीवनी विद्या हरण करील' ही त्याची रास्त भीती आहे, आणि त्याच्या भीतीप्रमाणेच घडते. मूळ उपाख्यानात केलेल्या या बदलाने कथानकात नवी रंगत निर्माण होते आणि कथानकाचा विकास होतो. त्यात नाट्यानुकूलता निर्माण होते. 'राधेय' कादंबरीतील 'चक्रधर' किंवा 'मृत्युंजय' कादंबरीतील 'शोण' 'ययाती आणि देवयानी' नाटकातील 'विदूषक' ह्या व्यक्तिरेखा, खाडिलकरांच्या प्रस्तुत नाटकातील युवराजाप्रमाणेच पूरक म्हणून येतात. देवयानी आईविना पोरकी आहे हे दाखवून खाडिलकरांनी शुक्राचार्यांना द्विधा मनःस्थितीत ठेवले आहे. शुक्राचार्यांना एकाच वेळी देवयानीचा पिता आणि देवयानीची माता या दोन्हीही भूमिका वठवाव्या लागतात. जेव्हा शुक्राचार्य मनाविरुद्ध वागतात तेव्हा देवयानीच्या, 'आई जिवंत असती तर–' या करुण उल्लेखाने शुक्राचार्य हळवे बनतात आणि त्यांची भूमिका पार बदलते. अशी अनेक स्थाने या नाटकात दाखविता येतात. त्यातून निर्माण होणारे हे द्वंद्व व्यक्तींचे भावविश्व ढवळून काढते. निर्णय घेणे अवघड असते आणि या द्विधा मनःस्थितीत या व्यक्तींच्यामधील माणूसपणाचा साक्षात्कार विशेष जवळून होतो. देवयानीपुढे प्रश्न निर्माण होतो 'पिता की प्रियकर?' शुक्राचार्यांपुढे प्रश्न निर्माण होतो, 'कन्या की संजीवनी विद्या?' आणि कचा समोर या नाटकात प्रश्न आहे, 'देवयानी की विद्यासाधना?' असे विभिन्न ताण एकाचवेळी निर्माण करण्याचे सामर्थ्य खाडिलकरांनी महाभारतातील या उपाख्यानाला स्वतःच्या नाट्यप्रतिभेचा स्पर्श करुन प्राप्त करुन दिले आहे.

**व्यक्तींचे स्वभावदर्शन:–**

खाडिलकरांच्या नाटकातून व्यक्तींच्या अंतर्द्वंद्वांचे चित्रण प्रभावीपणे झाले आहे. व्यक्तींच्या अंतःकरणातील विविध भाव–भावनांची आंदोलने अधिक परिणामकारक व तीव्र बनविण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. विद्याहरण नाटकात देवयानीच्या मनात कचाविषयी वाटणाऱ्या प्रेमाची तळमळ जशी कौशल्याने ते रंगवितात; त्याचप्रमाणे शुक्राचार्यांच्या मनातील स्वतःच्या अधःपाताविषयीची तळमळही त्यांनी मोठ्या तन्मयतेने रंगविली आहे. कचाची ध्येयनिष्ठा आणि त्याच्या मनात निर्माण झालेला 'प्रेम की कर्तव्य' हा संघर्ष प्रभावीपणे विद्याहरणात आलेला आहे.

वि. वा. शिरवाडकरांच्या ययाती आणि देवयानी नाटकातील देवयानी कचाशी सुद्धा विशिष्ट प्रसंगी अहंकाराच्या दिमाखात वागतांना दिसते, तसे चित्रण विद्याहरणात नाही. खऱ्या प्रेमामुळे या देवयानीचा सगळा अहंकार अगदी आरंभीच गळून गेला आहे. शिरवाडकरांच्या नाटकात शेवटी तिचा अहंकारही नाहिसा होतो. या ठिकाणी प्रथमदर्शनी प्रेमासारखी देवयानीची स्थिती झाली आहे. कचदेव आले, पाहिले, आणि त्यांनी तिला जिंकले. त्यामुळे ती कचाशी साधे भांडणही करू शकत नाही. उलट कचाला आदरार्थी संबोधनाने ती संबोधते. 'त्यांचा (कचाचा) अपमान न होता आपला सन्मान करायला मी तयार आहे.' (पृ. १३) देवेंद्राच्या सभेत देवयानीचे मन प्रसन्न ठेवण्याचा विडा उचललेला 'कच' येथे आहे. कारण त्याला खात्री आहे की देवयानीचे मन जिंकून घेतल्यावर शुक्राचार्यांचा क्रोध आपले भस्म करु शकणार नाही.[१] देवयानीला शुक्राचार्य आणि कच दोघांनीही आपापल्या हेतूसाठी राबविले आहे. त्यामुळे देवयानीची मनःस्थिती नेहमीच दोलायमान होते. मासा पकडतांना आमिष जे कार्य करते, तशी देवयानीची स्थिती आहे. पण देवयानी आमिष बनत नाही. 'बेकेट' सारखी तिची स्थिती

---

[१] 'तुझ्या बाबांच्या क्रोधाचा वडवानल तुझ्या व माझ्या प्रेमाच्या सागराचे पोटात बुडी मारून दडून राहील.' (सं. विद्याहरण, पृ. ३४)

होते. साधन म्हणून पाठविलेला बेकेट खरोखरच कामगार, श्रमजीवी विश्वाशी एकरूप होतो. तशी देवयानी कचावर अतूट प्रेम करते, त्यामुळे शुक्राचार्यांना कचाला जिवत करून संजीवनी विद्या देणे भाग पडते. प्रीतीच्या बळावर कच करीत असलेले विद्याहरणाचे धाडस पाहून देवयानी त्यावर भाळते, तर कच स्वतःच्या खडतर तपश्चर्यासामर्थ्यावर विश्वास ठेवतो आणि ध्येय गाठतो. वधाच्या भीतीने असहाय्य होत नाही. शत्रूच्या गोटात असूनही ताठ मानेने वावरणारा हा कच आहे आणि तरीही तो देवयानीचा प्रियकर आहे. ही खाडिलकरांनी निर्माण केलेली नवी रंगत आहे.

शुक्राचार्यांच्या अतिरेकी अपत्यस्नेहाचे दर्शन येथे खाडिलकरांनी नव्याने समाविष्ट केले आहे. मूर्च्छित झालेल्या देवयानीला सावरतांना शुक्राचार्य म्हणतात .. 'हिच्याबरोबर माझीही जीवनज्योत मावळू लागते.' एकीकडे हे अपत्यप्रेम आणि दुसरीकडे एक तप:सामर्थ्य असलेले दैत्यगुरु म्हणून वृषपर्वन राजाची स्वीकारलेली जबाबदारी अशी त्यांची स्थिती आहे. शेवटी असहाय्य होऊन त्यांना वृषपर्व्याला वेगळीच गुरुदक्षिणा मागावी लागते.[10] द्रोणाचार्यांची आठवण व्हावी असा हा एक समांतर प्रसंग येथे वर्णिलेला आहे.

महाभारतातील धृतराष्ट्र कौरवाविषयीचा अपत्यस्नेह मनातल्या मनात दडवून ठेवतो व वरकरणी कौरव-पांडव समान असल्याचो बतावणी करतो. तसे शुक्राचार्य अपत्य प्रेमात गुरफटलेले असले तरी त्यांचे प्रेम आंधळे नाही. ते सरळ देवयानीला कचाचे मन वळविण्यासाठी एक वर्षाची मुदत देतात. सगळ्यांनाच ही मुदत जास्त वाटते कारण सर्व बाजूंनी ताण निर्माण झालेला हा कालावधी आहे. 'या अवधीत कचतरी स्वकीयांवरील भक्तीचे धागे तोडील.' देवयानी तरी प्रियकरांवरील प्रेमाचे धागे तोडील किंवा हा शुक्रतरी अपत्यस्नेहाचे धागे तोडील.'

---

10 'अधिराज कचाला हाकून द्यावयाला मी तयार असलो तरी माझा शब्द खरा करून दाखविण्याचा हट्ट आपण आणखी एक वर्ष धरू नका. असली गुरुदक्षिणा मागण्याकरिता मी आलो आहे.' (विद्याहरण : पृ. ३५)

असा निश्चित निर्णय काहीतरी लागेल असा दिलासा स्वतः शुक्राचार्य देतात. या प्रसंगाच्या निमित्ताने शुक्राचार्यांच्या स्वभावाचे दर्शन घडते.

शुक्राचार्यांचे हे देवयानीवरील प्रेम जाणून युवराज वृषपर्व्याला म्हणतो, 'आपण संसारी असून अपत्यप्रेम दाखवीत नाही आणि गुरुवर्य तपोनिधी असून अपत्य प्रेम मानतात' या बोलण्यातून वृषपर्व्याने आपण राजा होऊ शकू याची तरतूद करुन ठेवावी हे सूचित केले. पण राजाचे हवे तेवढे लक्ष नाही म्हणून आपली खंत येथे बोलून दाखविली आहे.

**कचदेवयानी प्रणयरंगः—**

कचदेवयानीचा प्रणय प्रसंगही खाडिलकरांच्या प्रतिभेने रंगतदार बनविला आहे. मधुबनातील प्रसंगांतून कचदेवयानीच्या परस्परांवरील उत्कट प्रेमाची साक्ष पटते.[11] कचाचा दोन वेळा युवराज व त्याचे साथीदार वध करतात तेंव्हा देवयानी चिडून युवराजाला ऐश्वर्यनाशाचा शाप देते. त्यावरुन संजीवनी विद्याहरणाचे भाकीत व्यक्त होते. कारण जोपर्यंत संजीवनी विद्या आहे तोपर्यंतच दैत्यांना ऐश्वर्य, वैभव आहे. पण युवराजही कणखर आहे. शत्रूला मारणेच योग्य मग त्यासाठी तो आत्मबलिदानाला तयार आहे. शेवटी शुक्राचार्य 'संजीवनी विद्या माझ्या प्राणाबरोबरच हरण होईल' असे आश्वासन युवराजाला देतात.

देवयानी आपले कचावरील उदात्त प्रेम बोलून दाखवितांना म्हणते 'बाबा माझ्या प्रेमाचे शब्दचित्र आपणासारख्या स्वयंभू कवीलाही काढता येणे शक्य नाही.' (पृ. ५६) तिच्या या उदात्त प्रेमाची ही वर्णने मूळ उपाख्यानात नसून शृंगाररसाला पोषक म्हणून ही चित्रणे खाडिलकरांनी रेखाटलेली आहेत. शुक्राचार्यांची विवाहास संमती असल्याचे पाहून कच म्हणतो, 'संजीवनी विद्येशिवाय देवयानीचे पाणिग्रहण करता येत नाही. संजीवनी विद्येच्या लोभाने मी देवयानीवर प्रेम केले नाही व करीत नाही. परमेश्वरसाक्ष माझे देवयानीवर निर्लोभ प्रेम आहे.'[12] युवराज कचाला जाळायला निघतो तेव्हा कच म्हणतो, 'देह

---

[11] विद्याहरण : कृ. प्र. खाडिलकर, आवृत्ती ८, १९७२ (पृ..७७)
[12] विद्याहरण : कृ. प्र. खाडिलकर, आवृत्ती ८, १९७२ (पृ. ५७)

जाळता येतो–पण देह धारण करुन स्वकीयांची सेवा निरपेक्ष बुद्धीने करण्याच्या इच्छेचा मूलाधार शरीरातील आत्मा. युवराज कोणालाच जाळता येत नाही. 'मरतांहि भय नाही शिवले कचाला।।' असे कचाचे व्यक्तिमत्त्व आहे.

नाटकाच्या शेवटी पित्याच्या विशिष्ट भूमिकेने विशद केलेले बहीणभावाचे नाते त्यांना स्वीकारावेच लागते. अनिच्छेने आणि वृष–पर्व्याच्या चुकीमुळे नाइलाजानेच शुक्राचार्यांनी कचाला संजीवनी–विद्या दान केली असा याचा अन्वयार्थ आहे. शेवट वर्णिलेली देवयानीची अहंकाररहित स्थिती मूळकथा भागाला धरुन नाही. मुळात कच देवयानी परस्परांना शाप देतात पण येथे तर ही देवयानी उदात्त प्रेमाचे तत्त्वज्ञान सांगते. त्यातून तिच्या उज्ज्वल प्रेमाची आणि प्रेयसीने स्वीकारावयाच्या भूमिकेची प्रचीती येते.[13] खांडेकरांची हीच अनुभूती आहे.[14]

## मद्यपान निषेध : विद्याहरणाचा हेतू :–

खाडिलकरांच्या सं. विद्याहरण नाटकाचा हेतू मद्यपान निषेध हा आहे. त्यासाठी त्यांनी महाभारतातील कचदेवयानी या कथेचा आधार घेतला आहे. मद्यपानाचे दुष्परिणाम दाखविणे हेच येथे त्यांचे साध्य आहे. या साध्यावर त्यांनी या नाटकात आपले लक्ष केंद्रित केल्यामुळे व्यक्तिरेखाही साधनीभूत होऊन विशिष्ट तत्त्वाच्या पुरस्कारासाठी अस्तित्वात आल्या आहेत. त्यामुळे व्यक्तींच्या सर्वंकष व्यक्तित्त्वाला

---

13 'साध्वीच्या हृदयातील पतिप्रेम इतके उज्ज्वल असते की अहंकाराचा हिणकस त्यात किंचितही सापडावयाचा नाही.' (पृ. ८०)

14 "मूळ कथा वांचता वाचता दुसरी एक गोष्ट माझ्या लक्षात आली. ती म्हणजे खाडिलकराच्या विद्याहरणामुळे परिचित झालेली देवयानी ही महाभारतातल्या देवयानीहून अत्यंत भिन्न आहे ही देवयानी मुख्यत: प्रणयिनी आहे. हट्टी, अल्लड पण प्रेमभावनेत स्वत:ला विसरून जाणारी अशी प्रेयसी आहे. महाभारतातील देवयानी अशी उत्कट प्रणयिनी नाही. तिच्या स्वभावात विविध गुण दोषांचे मिश्रण झाले आहे."
पार्श्वभूमि : 'ययाति' वि. स. खांडेकर, आ. ४ थी १९६७ (पृ. ४५५-४५६)

साकार करण्यापेक्षा आपल्या उद्दिष्टानुरूप प्रकाशात येणाऱ्या व्यक्तित्वाच्या अंगालाच महत्त्व प्राप्त झाले आहे. शुक्राचार्यांच्याविषयी हे घडले आहे. मदिरा आपल्या पंथाची प्रतीक मानून तिला अव्हेरणारा कच. त्यांना परका वाटतो. मद्यपान हीच येथे अत्यंत महत्त्वाची गोष्ट ठरते. नाटकाच्या शेवटी शुक्राचार्यांच्या प्रदीर्घ भाषणातून नाटककाराला हाच एक महत्त्वाचा परिणाम साधावयाचा होता हे स्पष्ट दिसते. अपत्यस्नेहात गुंतलेले शुक्राचार्य 'विद्याहरणा'त व्यसनाधीन लोकनेता बनतात.[15]

कालसंदर्भातील आव्हान यशस्वीरीत्या मांडता आले. म्हणून काही विद्याहरणासारखे नाटक श्रेष्ठ ठरत नाही. एखाद्या कलाकृतीच्या श्रेष्ठत्वाचे खरे गमक तिचे कालातीत आवाहन हेच असते यादृष्टीने विद्याहरणाच्या आवाहनाचा विचार केला तर त्यात अतिरेकी मद्यपानासारख्या व्यसनाधीन माणसाच्या विवेक शून्यतेचे चिरंतन चित्र रेखाटलेले आढळते. खाडिलकरांच्या नाट्यविश्वात तत्त्वचिंतनाला फार महत्त्व आहे.[16]

तत्कालीन राजकीय वा सामाजिक परिस्थितीची छाप 'कीचक–

---

15 'त्याच्या अध:पाताचे विदारक चित्र जेंव्हा मूर्तिमंत साकार होऊन पुढे उभे राहिल्यावर तत्कालीन प्रेक्षक खडबडून जागा झाला असेल यात शंका नाही.'
संपादकीय : खाडिलकर नाट्यविशेषांक : म. सा. पत्रिका
अंक १८३ ऑ. नो. डि. १९७२

16 "तत्त्वचिंतन हा त्यांचा प्रकृतिधर्म असल्यामुळे नाट्यकृतीच्या उगमस्थानी असणाऱ्या संघर्षात काय किंवा विविध भूमिकांच्या चित्रणात काय, केवळ नाट्याची रंगत साधली एवढ्यानं ते संतुष्ट होत नाहीत. त्या संघर्षाच्या प्रवाहात सापडलेल्या विविध स्वभावांच्या व्यक्तींचं नुसतं ठसठशीत चित्रण करून त्यांचं समाधान होत नाही. त्या संघर्षाच्या मुळाशी असलेल्या जीवनाच्या प्रेरणांतून ज्या अटळ समस्या निर्माण होतात त्याचीही उकल करण्याचा ते प्रयत्न करतात." खाडिलकरांच्या नाटकातील तत्त्वचिंतन :
वि. स. खांडेकर (लेख) : म. सा. पत्रिका नोव्हें. ७२ (पृ. २)

वधा 'इतकी स्पष्टपणे या नाटकावर उमटलेली नसली तरी विद्याहरण नाटकाला तसे हेतू चिकटविण्याचे प्रयत्न झाले आहेत.[17]

त्याचप्रमाणें विद्याहरणातील रुपक उलगडून दाखविणाऱ्या सन्मित्र समाजाच्या १९२३ सालच्या एका पद्यावलीत शत्रूच्या गोटात आणि पोटात शिरुन विद्या संपादन करावी असे सुचविले आहे.[18]

'मद्यपाननिषेध' हे नाटकाचे मुख्य प्रतिपादन वाटत असले तरी येथे नाटकातील आशयाभिव्यक्तीविषयी स्वतंत्रपणे विचार केलेला दिसतो. मद्यपान समस्या हे खाडिलकरांना आनुषंगिक स्फुरण वाटते. कारण खाडिलकरांचा शुक्राचार्य केवळ मद्यपान संप्रदायाचा निर्माता नाही तर स्वतःच्या कठोर तपश्चर्येने संजीवनी विद्या प्राप्त करुन घेतलेला आहे. बृहस्पतीलाही आपला पुत्र विद्यासंपादनास पाठवावा असे वाटले इतपत तो थोर आहे.

देवयानीच्या मदतीने कचाला वश करण्याचा शुक्राचार्यांचा खरा डाव होता पण त्यांच्यातील पिता देवयानीपुढे हतबल होतो ही एक पिता म्हणून दाखविलेली शुक्राचार्यांची शोकांतिका, हृदयस्पर्शी आहे. कन्या-प्रेमापायी शुक्राचार्य हतबल होतो.

---

17 "परदेशात जाऊन परत आलेले विद्यार्थी 'बाईच्या आणि बाटलीच्या' नादी लागत होते, त्यांना सावध करण्याकरता हे नाटक लिहिले."
खाडिलकरांची नाट्यसृष्टी : व. शां. देसाई,
आवृत्ती १ ली १९७२ (पृष्ठ ५१)

18 'शत्रुच्या पोटि शिरोनी । घ्या त्यांची विद्या शिकुनी
हा थोर बोध देणार । विसरा ना कृष्ण कवीला ।।
जा इंग्लंदाला जन हो । भौतिकशास्त्रा आणा हो ।।
देशाचा करि उद्धार । कृष्णकवि नाटकि वदला ।।
'शत्रुच्या पोटि शिरावे । मोहाला झिडकारावे ।।
विद्याहरणाचे सार । नाटकात कविही वदला ।।
'विद्याहरणातील रुपक : (संकलन) म. सा. पत्रिका नाट्याचार्य खाडिलकर विशेषांक अंक १८३ नोव्हेंबर १९७२

प्रा. ना. सी. फडके, प्रा. वा. ल. कुलकर्णी, व. शां. देशाई या खाडिलकरांच्या नाट्यकृतीच्या समीक्षकांनी विद्याहरण नाटकाच्या संदर्भात आपली स्वतंत्र मते मांडलेली आहेत.[१७] येथे नाटककाराची प्रतिभा या कथानकाकडे कोणत्या दृष्टीने पाहते हा विचार लक्षात घ्यावयाचा आहे.

शुक्राचार्यांचे अपत्यप्रेम त्यामुळे निर्माण झालेला पेचप्रसंग 'कच की देवयानी? अपत्यप्रेम की संप्रदाय?' हा आहे. शिवाय शुक्राचार्य 'प्रतिस्पर्ध्याचा विजय माझी वाणी उच्चारीत नसते. शत्रूला मी आशीर्वाद देत नसतो.' या बाण्याचे आहेत. हे शुक्राचार्य खाडिलकरांनी नव्याने रंगविलेले आहेत. संप्रदायातील शिष्याचे प्रिय करावयाचे की पायाशी बिलगलेल्या अपत्याचे-देवयानीचे म्हणणे मान्य करावयाचे असा पेच प्रसंग शुक्राचार्यांपुढे निर्माण झालेला असतो. कच आणि देवयानी मुळापेक्षा वेगळ्या तऱ्हेने येथे साकार केले आहेत.

कचाचे पौरुष, ध्येयनिष्ठा, श्रेष्ठ मूल्याबद्दलचा आदर, प्रेयसापेक्षा श्रेयसाकडे असणारी त्याच्या मनाची साहजिक ओढ, त्याचा प्रबल आत्मविश्वास, या गुणांना खाडिलकरांनी अधिक उजाळा दिला आहे. देवयानीच्या निर्व्याज मनोहर प्रेमाने हे सारे नव्याने उजळले आहे. या पुढील कचोपाख्यानातील साहित्यकृतीत कचदेवयानीच्या प्रेमाला अधिक

---

१७ 'विद्या शिकण्यासाठी आलेल्या कचाला शुक्र ठेवून घेतो हीच मुळी तर्काला पटणारी गोष्ट नाही! 'पुराणकथेत नक्की काय आहे ते सांगता येणार नाही.'
खाडिलकरांच्या नाट्यकृती : प्रा. ना. सी. फडके, प. आ. १९७२ पृ. १३७
'माझ्या मते खाडिलकरांनी दैवीसंपत्ती विरूद्ध आसुरी संपत्ती ह्यांज मधील झगडा दाखविण्याची ही आयती चालून आलेली संधी दवडली.' नाटककार खाडिलकर : एक अभ्यास : ले. वा. ल. कुलकर्णी,
आ. १ ली, १९६५ (पृ. ६१)
'आज आपल्यासमोर येणारा शुक्राचार्य हा संजीवनी विद्या प्राप्त झालेला एक दारुड्या आहे.' नाटककार खाडिलकर : एक अभ्यास :
वा. ल. कुलकर्णी, आ. १ ली, १९६५ (पृ. ६०)

उजाळा मिळालेला दिसतो.

या नाटकाच्या शेवटी कचदेवयानी प्रेमाला आणखी भव्योदात्त स्वरूप देणे विद्याहरणात संभवनीय होते पण खाडिलकरांचे सगळे लक्ष नाटकाचा विषय 'मद्यपाननिषेध' निश्चित करण्याकडे लागले होते त्यामुळे त्यांना देवयानीच्या प्रेमजीवनाची खरी शोकांतिका रंगविताच आली नाही.

पेच प्रसंगात सापडलेले शुक्राचार्य आणि त्यांची द्विधा मन:स्थिती ही खाडिलकरांची स्वतंत्र निर्मिती आहे. देवयानी आणि अधिराज यात कोणाचे प्रिय करावयाचे हा त्यांना न सोडविता येणारा प्रश्न आहे.[20]

देवयानीचे उत्कट प्रेम, शुक्राचार्यांचे देवयानीवरील प्रेम आणि त्यांचे दारुचे व्यसन या गोष्टींची स्वत:ला असलेली अनुकूलता लक्षात घेऊन कचाने संजीवनी विद्येचे हरण केले. महाभारतात शुक्राचार्यांचा असा मद्य संप्रदाय नाही. सहवासातील प्रत्येकाला ते मद्यपानाचा आग्रह धरीत नाहीत. मद्य सेवनाच्या अतिरेकाने त्यांचा असा अध:पात झाल्याचे जाणवत नाही तर वृषपर्वादी (शत्रू) स्वकीय पक्षांनीच केलेल्या विश्वास–घातानेच विद्या गमावण्याचा प्रसंग त्यांच्यावर येऊन ठेपला. महा–भारताच्या उपाख्यानातील शुक्राचार्य मदिरेबरोबरच दानवांच्या या कृत्याला जबाबदार धरतो पण मद्यपाननिषेधाचा प्रश्न खाडिलकरांना महत्त्वाचा वाटला म्हणून त्यांच्या नाटकाचे कथानक स्वतंत्रपणे विकसित झाले.[21] वि. स. खांडेकर जसे ययातीला, केवळ काम भावनेचा प्रतीक

---

20 "अधिराज, हा माझा मुलगा, ही माझी मुलगी. युवराज, तुला दु:खी कष्टी ठेवून मी सुखी रहाणे शक्य नाही. देवयानी, तुझ्या प्राणांबरोबर माझेही प्राण शरीर सोडून बंधमुक्त होतील! अधिराज, मी काय करू? दोघेही हट्टी, आणि यांचा हट्ट अगदी एकमेकांशी विरुद्ध! याला बोल लावता येत नाही, हिला दूर सारता येत नाही. माझा धर्म कोणता हेच मला यावेळी समजत नाही!" विद्याहरण : (पृ. ६५–६६)

21 "कचाचे कारस्थान, स्वजनांचा मुर्खपणा आणि अविश्वास, त्यात भर म्हणून देवयानीवरील त्याचे आंधळे प्रेम आणि तिचा स्त्री हट्ट या सर्वांचा

न मानता सर्वच प्रकारच्या लोभाचा प्रतिनिधी म्हणून चित्रित करतात, त्यातून मूळ उपाख्यान वेगळ्या दिशेने प्रवाहित होऊन महाभारताच्या मूळ कथानकाचा नवा आविष्कार होतो. त्याचप्रमाणे विद्याहरणातही महाभारतातील कचोपाख्यान नवे रूप धारण करते. खाडिलकरांनी 'मद्यपान निषेध' हे एक कथासूत्र गृहीत धरून 'विद्याहरण' लिहिले म्हणून या गोष्टीला येथे विशेष अवसर मिळाला आहे.

तात्पर्य, विद्याहरण नाटकात खाडिलकरांनी कच, देवयानी, शुक्राचार्य या स्वभावचित्रांवर अत्यंत हृदयंगम प्रकाश पाडल्याचे दिसून येते. कचदेवयानीच्या प्रेमकथेला उत्कटतेने चित्रित करून शुक्राचार्यांचे एक अविस्मरणीय स्वभावचित्र रेखाटले आहे.

**'देवयानी अर्थात विद्यासाधन' :–**

'देवयानी अर्थात विद्यासाधन' हे कृ. ह. दीक्षित यांनी १९१३ साली लिहिलेले महाभारतातील कचोपाख्यानावर आधारित पौराणिक नाटक आहे. पौराणिक नाटककार म्हणून दीक्षितांची ख्याती आहे. कृ. प्र. खाडिलकरांप्रमाणेच दीक्षितांची नाटकेही विचारप्रधान आहेत. त्यात भोवतालच्या परिस्थितीचा ठसा उमटलेला आढळतो. खाडिलकरांचे विद्याहरण आणि दीक्षितांचे 'विद्यासाधन' एकाच वर्षात लिहिलेले आहे. पौराणिक कथानकाच्या निवडीपासूनच दीक्षितांवर खाडिलकरांच्या नाट्यवाङ्मयाचा प्रभाव पडलेला जाणवतो.

मद्यपाननिषेधाच्या प्रेरणेने खाडिलकरांचे 'विद्याहरण' प्रामुख्याने जन्मले आहे तर 'विद्यासाधन' नाटकात विद्याहरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

महाभारतात शुक्राचार्यांची भूमिका जेवढ्या प्रकर्षाने ती खाडिलकरांच्या विद्याहरणात किंवा दीक्षितांच्या प्रस्तुत नाटकात आली

---

संकलित परिणाम कचाकडून विद्याहरण होण्यात होतो."
देवयानी आणि शर्मिष्ठा : प्रा. राम मंत्री (लेख) इथे मराठीचिये नगरी : वर्ष १ ले अंक : जून–जुलै : १९७७

आहे. शुक्राचार्य हे आदर्श शिक्षक. कविकुलगुरु होते असे या नाटकात आहे. 'विद्याहरणा'त वृषपर्व्याला एक मदिरा संप्रदायातील अधिराज म्हणून स्थान आहे. कचाला मारण्यात त्याचा हात असतो पण विद्यासाधन नाटकात वृषपर्व्याला अन्यत्र क्वचित आढळणारे महत्त्वाचे स्थान आहे. त्याला महत्त्व मिळावे अशी कामगिरी त्याच्यावर आहे. विद्याहरणातील गौणपात्रे नाटकाच्या संदर्भात अनावश्यक वाटतात व नाट्याच्या लयीत बसत नाहीत. अशा पात्रांचा भरणा 'विद्यासाधन' मध्ये नाही. कारण कथानकाच्या संदर्भात त्यांना कोणतेही महत्त्व लाभू शकत नाही. दारूच्या दुष्ट व्यसनापासून समाजाला अलिप्त ठेवण्याच्या सामाजिक कार्याची महती या कालखंडातील नाटककारांना विशेष जाणवलेली दिसते. म्हणून लोकशिक्षणासाठी त्यांनी आपली नाट्यप्रतिभा योजिली. प्रा. अ. ना. देशपांडे यांनी आपल्या आधुनिक मराठी वाङमयाच्या इतिहासात या प्रवृत्तीची नोंद घेतली आहे.[22] आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेत दीक्षितांनी भवितव्यतेचे चित्रण मनोरंजक व विनोदी पद्धतीने कथन करण्याचा आपला हेतू स्पष्ट केला आहे.[23] मनोरंजक पद्धतीने महाभारतातील उपाख्यान नाट्यरूपातून सांगणाऱ्या नाटकांच्या गटातील हे नाटक आहे. महाभारताधिष्ठित ललित वाङमयात रंजनाची एक प्रवृत्ती प्राधान्याने अर्वाचीन मराठी साहित्याच्या पूर्वार्धात आढळते.

---

[22] 'कृष्णाजी हरि दीक्षित या नावाचे एक जबरदस्त व महत्त्वाकांक्षी नाटककार याच काळात होऊन गेले.'
आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : अ. ना. देशपांडे
(पुनर्मुद्रण १९७४) पृष्ठ २८८

[23] 'रा. दादासाहेब व रा. काळे यांनी बरीच कथानके मला सुचविली पण त्यामध्ये भवितव्यतेचें यथायोग्य चित्र रेखाटता येईल अशी देवयानीच मला व त्यांनाही पसंत वाटली ... यामध्ये शृंगाराचा शक्य तितका अभाव, मनोरंजक विनोदाच्या मर्यादित मिश्रणामुळे भरपूर हास्यरस व स्थलोस्थली सहज ग्रहण होतील असे मनोवेधक चुटके आणण्याचा मी प्रयत्न केला आहे.'
देवयानी अर्थात विद्यासाधन : दीक्षित (प्रस्तावनेतून)

## कच–देवयानी :–

दीक्षितांच्या 'देवयानी अर्थात विद्यासाधन' या नाटकातील देवयानी सर्वांवर आपला तोरा मिरवणारी आणि अधिकार गाजवणारी आहे. कचाची भूमिका मात्र सद्भावनायुक्त उदात्त आहे.[24] तो 'संजीवनी साधन' मानतो. हा कच 'संसार–संजीवनीसाठी' आलेला नाही. महाभारतातील उपाख्यानातून मिळालेली सूचना घेऊन त्याला स्वतःच्या कल्पनेनुसार रंगविण्याच्या प्रेरणेतून असे हे भडक रंग व्यक्तींच्या स्वभावाला आणि आधाराला नाटककार प्राप्त करून देतात. म्हणूनच या नाटकात 'देवयानी करील ती पूर्व दिशा आहे' स्वतःच्या दिमाखात ती कचाला व्रात्य संबोधते. खाडिलकरांच्या विद्याहरणातील 'देवयानी' कचाचे नाव सुद्धा पतीच्या आदरभावाने घेत नाही, ही गोष्ट येथे कचाच्या व्यक्तिरेखेला मारक आहे. 'विद्या साध्य करणं हे ज्याच्या त्याच्या कर्तबगारीवर आहे. त्यासाठी फार मोठे दिव्य करावे लागते' ही कचाची उदात्त भूमिका आहे. वृषपर्वाही आपल्या भूमिकेला उदात्त-रूप येथे प्राप्त करुन देऊ इच्छितो. देव स्वार्थी म्हणून हा लढा आम्हाला द्यावा लागतो. आमच्या गुरुजींना या देवयानीच्या मायाजालाने पूर्ण जखडून टाकलं आहे'[25] ही त्याची खरी व्यथा आहे. देवकार्य करण्यासाठी आलेला कच मात्र संपूर्णपणे देवयानीच्या मोहजालात गुरफटला आहे.

या नाटकात वृषपर्वा स्वतःच कृतघ्नपणे कचाला नष्ट करण्यात पुढाकार घेतो. स्वतः त्याची राख तो शुक्राचार्यांना पाजतो. त्याला राजदंडाचा विशेष अभिमान आहे. वृषपर्वा आणि शुक्राचार्य यांच्यातील संघर्षाला या नाटकात राजदंड आणि धर्मदंड यातील संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. दोन्हींचा उत्तम मेळ असावा. यापैकी एका गोष्टीने भागणार

---

[24] 'देव दैत्यांची एकी व्हावी, दोघांच्या संमिश्रित बलाचा जगाच्या उद्धाराकडे उपयोग व्हावा. शांतिदेवीच्या कृपापूर्ण दृष्टीने हे अखिल जगत सदैव सुखपूर्ण असावे हा तर माझा हेतू.'
देवयानी अर्थात विद्यासाधन : अंक १ पृ. ५

[25] देवयानी अर्थात विद्यासाधन : दीक्षित, अंक १, पृ. १५

नाही. हे यातून सूचित केले आहे. हा एक नवाच प्रश्न या नाटकात निर्माण केला आहे. महाभारतातील या उपाख्यानाला किती विविध तऱ्हेने विचारात घेता येते याची कल्पना येथे येते. वृषपर्व्याला आपण बाहुबल संपादिले पण बुद्धिवैभवापासून वंचित राहिलो याची खंत आहे. म्हणून आवेगाने तो म्हणतो, 'एकदा इंद्रपद हातीं आलं की या धर्मदंडाला काडकन् मोडून फेकून देतो.'[26] वृषपर्वा आणि शुक्राचार्य यांचा संघर्ष संपूर्णपणे नव्याने येथे प्रखर बनविला आहे.

## भडक रंजन :–

येथे रंजनाच्या अवलंबातून चमत्कृतीला आणि अवास्तवतेलाही थारा मिळतो. देवयानी पुरुषवेषात वावरते आणि शर्मिष्ठा छद्मवेशी राक्षसाला मायावी स्त्रीचे रूप घेऊन आपण कचाची पत्नी आहोत असे खोटे सांगून देवयानीचा गैरसमज करविते. दैत्यकन्येला साजेसे शर्मिष्ठेचे वागणे येथे आहे. कचाला स्वतःकडे आकर्षित करून घेण्याचा ती प्रयत्न करते. हे सगळे महाभारताच्या कथानकाला सोडून आहे. कच तिला सांगतो, की एकट्या देवयानी व्यतिरिक्त सर्व स्त्रिया मला तारामाते–समान आहेत. तो तिचा डाव तिच्यावरच उलटवितो.

कच तिला 'दासीपणा' चा शाप देतो. अगदी वेगळ्या तऱ्हेने कथेचा विकास येथे झालेला दिसतो. कलात्मक दृष्ट्या या कथानकाच्या विकसनाला फारसा अर्थ नाही. उलट या कपटनाट्याच्या योजनेमुळे नाट्य हरपते. भडक रंजनापलिकडे काही साधत नाही.

## वृषपर्वा आणि शुक्राचार्य :–

वृषपर्वा कचाचें दहन करून त्याची राख मद्यातून शुक्राचार्यांना पाजतो या गौप्याचा स्फोट 'विनोद' जेंव्हा शुक्राचार्यांजवळ करतो त्यावेळीं त्यांना वृषपर्व्याचें खरे रूप उमगते. वृषपर्वा आणि शुक्राचार्य यांच्या वरवरच्या संबंधाचें रूप येथे स्पष्ट होते. हा एक लक्षणीय मुद्दा आहे. वृषपर्वा स्वतः घमेंडीत खाडिलकरांच्या कीचकाप्रमाणेच उद्गारतो,

---

[26] देवयानी अर्थात विद्यासाधन : दीक्षित, अं. ३ पृ. ६०

'राजदरबारी राजा तो राजा व पुरोहित तो पुरोहित?'[27] या उद्गाराने संतापून शुक्राचार्यही– 'तुम्हाला इत:पर इंद्राचं सिंहासन केव्हाही मिळणार नाही.' असा धिक्कार करून निघून जातात. हे वृषपर्वा आणि शुक्राचार्य यांचें संबंध नाटककाराच्या स्वतंत्र कल्पनाशक्तीने पटण्याजोगे चित्रित केले आहेत.

**विचित्र मांडणी :–**

कचाला नाहीसे करण्यात शर्मिष्ठेचाही हातभार आहे हे प्रथमच या नाटकात आले आहे. याचा अर्थ शर्मिष्ठा ही दानवपक्षातील असुरकन्या असल्यामुळे ती यात सहभागी झाली असावी. पण याचा एक दुष्परिणाम लगेच जाणवतो तो म्हणजे मूळ महाभारतातील उपाख्यानाला तर तडा जातोच पण देवयानी आणि शर्मिष्ठा यांच्या संबंधालाही याचवेळी तडा जातो. 'भवितव्यता बलीयसी' या न्यायाने कच शेवटी विद्या संपादन करतो. यावेळी शुक्राचार्य पिता आणि देवयानी भगिनी सहोदरत्वाने बनते पण देवयानीला हे नाते रुचत नाही. कच नाइलाजाने ते स्वीकारावे म्हणून आग्रह धरतो पण देवयानी त्याला बोल लावते.[28]

'धर्माला धाब्यावर बसवून गुरुपत्नीशी निर्लज्जपणे गमन करणाऱ्या चंद्रापासून तुझी उत्पत्ती असली पाहिजे' असेही कचाला बोलण्यास देवयानी कचरत नाही. प्रियकर प्रेयसीच्या उदात्त प्रेमाला यामुळे निश्चितच तडा जातो आणि या विचित्र मांडणीमुळे नाटकातील औचित्य भंग होतो. महाभारतातील उपाख्यानांवर आधारित साहित्यकृतीतील बदल अशी मौलिक भर घालतो. तशीच काही वेळा हा बदल रसहानीही करतो याचे उदाहरण म्हणून हे नाटक उल्लेखिता येईल.

---

27 देवयानी अर्थात विद्यासाधन : कृ. ह. दीक्षित, १९१३ (अं. ४ पृ. ९४)

28 'भवितव्यतेच्या झिरझिरीत पडद्याआड उभं राहून आपण आपल्यावरची जबाबदारी टाळूं पाहतां, पण असली ती भवितव्यता कोणती आणि ती आपल्या पूर्वीच्या उद्देशाआड येते तरी कशी?" देवयानी अर्थात विद्यासाधन : कृ. ह. दीक्षित, (१९१३) अंक ५, प्र. २, पृ. १०३

शिरवाडकरांनी 'ययाति आणि देवयानी' नाटकात कच देवयानी हा समास काळाला ही न तोडता येणारा दाखविला आहे. आणि येथे मात्र देवयानी कचाशी असलेले नातेच जणू अव्हेरते. या दुराव्याचे पर्यवसान महाभारतानुसारच होते. हट्टी व क्रोधाधीन झालेली देवयानी कचाला प्राप्त केलेली विद्या फलदायी न होण्याचा शाप देते. कचही 'तुला कोणीही ब्राह्मणकुमार वरणार नाही' असा शाप देतो. एवढ्यावर महाभारत, 'कच स्वर्गलोकी निघून गेला' असे सांगते पण या नाटकातील कच पुढील भाकीत व्यक्त करणारा मुळात नसलेला शाप देतो.[29]

एकूण या नाटकात वृषपर्व्याला मुळातील चित्रणापेक्षा अधिक महत्त्व दिले आहे. अवास्तव वातावरणाने या नाटकात मूळ उपाख्याना-तील सजीव व कणखर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होत नाही. या नाटकाला खाडिलकरांच्या प्रमाणे एखादे उद्बोधनाचे सूत्रही गवसले नाही किंवा कोणताही कलात्मक वापर या कचोपाख्यानाच्या नाटककाराला करणे साधले नाही.

## सं. संजीवनी नाटक :–

शा. रा. वन्दे यांनी सं. संजीवनी नाटक हे १९३२ साली प्रकाशित केले. कचोपाख्यानावर आधारित नाट्यनिर्मितीचा हा प्रयत्न आहे. सामान्य नाट्यकृती म्हणून जसा या नाटकाचा उल्लेख केला जातो तसेच मामा वरेरकरांचेही 'सं. संजीवनी' याच नावाचे एक सुमार दर्जाचे नाटक आहे. या प्रयत्नांचा विस्ताराने परामर्श घेणे फारसे फलदायी नाही म्हणूनच येथे संक्षेपाने विचार केला आहे.

## स्त्रीपात्र विरहित नाटक :–

या नाटकाची प्रथमतः लक्षात येणारी मौज अशी आहे की

---

[29] 'तुझं पाणिग्रहण क्षत्रियाकडून होईल, व तिथंही ती तुझी नष्ट सखी शर्मिष्ठा तुझी दासी होऊन शेवटी तिच्या योगानं तुम्ही दोघीही पतिसह वर्तमान आजन्म दुःखी कष्टी व्हाल.'
देवयानी अर्थात विद्यासाधन : कृ. ह. दीक्षित, १९१३ अंक ५ पृ. १०४

'संजीवनीहरण' कथेवरील हे पौराणिक नाटक असूनही ते स्त्रीपात्र-विरहित आहे. त्यामुळे या कथानकातून देवयानीचा प्रवेश संभवनीय असूनही वगळलेला आहे. देवयानी विरहित संगीत संजीवनीहरण हा एक अभूतपूर्व प्रयोग म्हणावा लागेल. या गृहीतामुळे कथानकावर ज्या मर्यादा पडल्या त्यातून महाभारतांतील उपाख्यानाला कोणते रूप प्राप्त झाले हे येथे पाहावयाचे आहे.

उघडपणे एक शाळकरी स्वरूपाचे हे नाटक झाले[30] महाभारतांतील अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या या उपाख्यानाचे केवढे कृत्रिम आणि विकृत चित्रण येथे पाहावयास मिळते. कलाबाह्य प्रेरणेने हे लेखन झालें आहे, त्याचा तो अपरिहार्य परिणाम आहे.

शुक्राचार्य, वृषपर्वा, कच आणि अप्रत्यक्ष वावरणारी देवयानी या व्यक्तिरेखा सोडून अन्य सर्व काल्पनिक आहेत.[31] भडक विनोद निर्मितीसाठी हा पात्रांचा भरणा आहे तो नाट्यनिर्मितीत अपरिहार्य वाटत नाही, आणि उपाख्यानातही रंग भरीत नाही. खाडिल-करांच्या विद्याहरणाच्या प्रभावळीतील हे नाटक आहे. येथेही विद्याहरणातील शुक्राचार्यांचा ठसा आहे. खाडिलकरांच्या नाटकाप्रमाणेच येथेही शुक्राचार्यांचा संप्रदाय मद्यप्यांचाच आहे. त्याला, कचाचा आणि आणि कचाच्या प्रेमात पडलेली त्याची प्रेयसी म्हणून देवयानीचा विरोध आहे.

देवयानीला सरस्वती कल्पून मद्याचा नैवेद्य तू दाखविला पाहिजे व हे झाले नाही तर तुला घालवून देण्यात येईल असे शुक्राचार्य कचाला बजावतात आणि कच सुद्धा निर्वाणीच्या शब्दात सांगतो,

---

[30] 'हे नाटक शाळेतील सभा, संमेलने व उत्सव या प्रसंगी मुलांना करतां यावे म्हणून यात स्त्री पात्रे ठेवतां आली नाहीत.'
सं. संजीवनी नाटक : शा. रा. वन्दे, १९३२ मानस (प्रस्तावना) पृ. १

[31] 'मधुप' 'युवराज' 'उन्माद' 'उपहास' 'उद्वेग' ही श्री. वन्दे यांची काल्पनिक पात्रे आहेत.

'हा गेला जरी मम प्राण । तरीही जाण ।
झुकणार नाही ही दारू पुढती कल्पांतीही मान' ।। धृ।।

दारूचे दुष्परिणाम सांगण्याचें साधन म्हणून शुक्राचार्यांकडे आणि या उपाख्यानाकडे नाटककाराने पाहिले आहे. येथे मराठी प्रतिभावंतांच्या महाभारताच्या कलात्मक आविष्काराला फार मोठी मर्यादा पडलेली स्पष्ट होते महाभारतकाराच्या प्रतिभेचा उत्तुंग आविष्कार येथे नाहिसा होतो.

**ज्ञानसाधना :–**

नाटककाराने 'ज्ञानसाधनेसाठी इच्छुक कधीच वंचित राहू शकत नाही' असे प्रतिपादन करून एक वेगळीच कलाटणी या उपाख्यानाला दिली आहे. प्रयत्नाने विद्या सर्वांना निश्चित लाभू शकते. येथे एका अकल्पित वळणाने कथानक प्रवाहित झाले आहे [32] स्वत:चे मत आपल्या वास्तव अनुभवासह महाभारतीय उपाख्यानावर लादण्याचा येथे प्रयत्न आहे. या आरोपातून कथेला एक नवा सूर लाभतो. मदिरा सम्प्रदायावर टीका करतांना कच, नव्हे कचाच्या मुखाने जणू नाटककार बोलतो .. 'बाबांनो! तुम्ही आजपर्यंत पायाखाली तुडविलेला समाज तुमच्या ह्या अमंगळ कृतीनें तुम्हास कनिष्ठ समजून उद्यां तुमच्या डोक्यावर नाचण्याचा प्रयत्न करू लागला तर त्यांत त्याला विरोध कोण करू शकेल? '[33]

या सामाजिक आशयाच्या अभिव्यक्ती बरोबरच कचदेवयानी यांच्या उत्कट प्रेमाची महती नाटककाराने स्पष्ट शब्दात सांगितली आहे. श्री. वन्दे यांच्या संजीवनीहरणातील कच या उत्कट प्रेमाची ग्वाही

---

[32] कच १ ल्या अंकाच्या शेवटी म्हणतो, "मधुप, संजीवनी ही विद्या आहे, आणि कोणत्याही विद्येचा मक्ता एकट्याच व्यक्तीकडे असू शकत नाही! जोपर्यंत सामान्य जनतेचे तिकडे लक्ष जात नाही, तोंपर्यंत हे स्वार्थसाधू लोक विद्येचा मक्ता आपणाकडेच काय तो आहे, असे भोळ्या जनतेला सांगून स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी आणि प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्यांना अज्ञानांध:कारात दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असतात. मधुप, वास्तविक तसें नाही, 'विद्या रंकांना, रावांना, पाप्यांना, पुण्यात्म्यांनां संपादन करण्याचा सारखाच हक्क आहे."

[33] सं. संजीवनी नाटक : शा. रा. वन्दे (१९३२) पृ. ५८

शुक्राचार्यांना देतो.[34] यातून 'देवयानी की संजीवनी?' याचा एक विलक्षण पेचप्रसंग कचासमोर उभा राहतो. एकीकडे गुरुप्रसाद म्हणून देवयानीचे पाणिग्रहण करावे ही शुक्राचार्यांची आशा तर दुसरीकडे स्वकीयांच्या उद्धारार्थ संजीवनी विद्येच्या प्राप्तीची केलेली प्रतिज्ञा आहे.

## उद्‌बोधनाची भूमिका :–

सं. संजीवनीहरण नाटक शालेय विद्यार्थ्यांसाठी लिहिले आहे. नाटककाराच्या या उपदेशात्मक भूमिकेचा प्रभाव या नाटकाच्या कथानकावर आहेच. त्यासाठी त्यागाची तयारी या विद्यार्थ्यांनी ठेवली पाहिजे. जणू कच याचा आदर्श आहे.[35] विद्यार्थ्यांसाठी उद्‌बोधन असलेले हे नाटक आहे. कचाच्या उद्‌गारातून याचा वारंवार प्रत्यय येतो. 'सर्वांगसुंदर आयुष्य बनविण्याकरितां जीं कारणीभूत होते तीच ही विद्यार्थी दशा! ह्या विद्यार्थीदशेचे महत्त्व न जाणता जे विद्यार्थी मोहाला बळी पडून कर्तव्य पराङ्‌मुख होतात ते स्वतःच्या अधःपाता बरोबर स्वकीयांचा घात करतात.[36]

मद्यपानाचे दुष्परिणामही उद्‌बोधनाच्या भडक प्रेरणेतून विस्ताराने येथे सांगितले आहेत. प्याला ग्रहण केल्याने कायमचे ग्रहण लागते म्हणूनच–

'सापळ्यामध्ये व्याघ्र सापडे
बायकामुलें मारिती खडे'

---

[34] कच शुक्राचार्यांना म्हणतो, 'देवयानीवरील प्रेम संजीवनीचेच काय पण अखिल ब्रह्मांडाचे मोल देऊनही मिळणार नाही!'... इतकेंहि करून कचाच्या शब्दाचा आपणास विश्वास धरावयाचा नसेल तर हा जेंबिया आणि हे कचाचे हृदय आपणासमोर हजर आहे' त्यांत आपणास खरें काय तें दिसून यावयास विलंब लागणार नाही?'
सं. संजीवनी नाटक : शा. रा. वन्दे (१९३२) पृष्ठ ७३–७४

[35] 'स्वकीयांच्या उद्धारासाठी संजीवनी विद्येची प्राप्ती करून घेण्याची मी जेंव्हा प्रतिज्ञा केली तेव्हाच मी आपल्या हातानें आपल्या सुखाच्या कल्पनांचा चुराडा करून टाकला आहे.' (पृष्ठ ७८)

[36] सं. संजीवनी : शा. रा. वन्दे (१९३२) पृष्ठ ७७

ही अवस्था शुक्राचार्यांची झाली आहे. वृषपर्व्यापेक्षा युवराजाला येथे महत्त्वाचे स्थान लाभले आहे. कचाची राख करण्याचा प्रसंग विस्ताराने वर्णन केला आहे. शुक्राचार्य दारूपायी झालेल्या स्थितीचे वर्णन करतांना म्हणतात, 'राजा, तुझा अविचार आणि माझे व्यसन या दोहोंचा संयोग होऊन त्यामुळे आपली कोण अवस्था झाली.'

नाटकाच्या शेवटाची कलाटणी तर अनपेक्षित आहे. शुक्राचार्य कचाला जिवंत करतात आणि यापुढे तू देवयानीचा भाऊ म्हणून वावरावे असे सुचवितात. यावर कचाचे उद्‌गार काहीही भाष्य करू नये असे आहेत. कच म्हणतो, 'ही देवयानीची ब्याद आपोआपच टळली! ठीक झाले! आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे!!' (सं. संजीवनी : पृ. १२४) आणि या उद्‌गाराने नाटक संपते. कच देवयानीच्या प्रेमाला येथे सुरुंग लावला आहे. नावाप्रमाणे तंतोतंत संजीवनी विद्या प्राप्तीपर्यंतच हे नाटक घडते.

महाभारतातील कथानकाला कोणतेही कलात्मक रूप या नाटकात प्राप्त होत नाही किंवा विशेष लक्षणीय असा महाभारत कथेचा रूपाविष्कारही येथे पहावयास मिळत नाही. पण एक गोष्ट लक्षात येते की महाभारतातील कथानक केवळ उपदेशपर म्हणून येथे राबविले आहे. महाभारताच्या अभ्यासाची किंवा चिंतनाची प्रवृत्ती या सामान्य साहित्य कृतीत दिसत नाही. येथे कथानकाला हवे ते वळण दिले आहे.

## आणखी एक 'सं. संजीवनी' :–

'सं. संजीवनी' हे मामा (भा. वि.) वरेरकरांनी १९१० साली लिहिलेले नाटक 'पौराणिक नाटकांचा सामाजिक नाटकासारखा उपयोग प्रथमच केल्याबद्दल वरेरकरांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच होतील.'[37] स्वत: मामा वरेरकर या नाटकासंबंधी म्हणतात, 'मद्यपान निषेधावर एक सामाजिक कथानक घेऊन नाटक लिहिण्याचा विचार होता. पण जनुभाऊ निमकरांशी मतभेद झाल्यामुळे त्यांना कचदेवयानीचे

---

[37] पौराणिके नाटके : डॉ. वि. पां. दांडेकर (१९४१) पृ. १५७

पौराणिक कथानक घ्यावे लागले.' ही घटना प्रस्तुत संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहे. म्हणून मुद्दाम उद्‌धृत केली आहे. सामाजिक आशयाच्या अभिव्यक्तीसाठी येथे महाभारत उपाख्यान स्वीकारल्याचे नाटककाराने उघडपणे मान्य केले आहे. महाभारतातील कथानके ही अशी सामाजिक समस्या आणि परिस्थितीला समर्थपणे अभिव्यक्त करू शकणारी आहेत म्हणून सामाजिक समस्येच्या प्रचाराच्या प्रेरणेने महाभारतकथा योजिली जाते. मामा वरेरकरांच्या या नाटकात हा प्रयोग आहे.

## प्रचारकी थाट :–

नाटककार मामा वरेरकरांचा पिंड लक्षात घेता विपुल नाट्यलेखन करूनही मामांनी चिरंतन व्यापक मूल्यांना क्वचित स्पर्श केला आहे. 'हाच मुलाचा बाप' किंवा 'भूमिकन्या सीता' वगळता त्यांचे कोणतेच नाटक लक्षणीय ठरत नाही. हे लक्षात घेण्याचे कारण त्यांचे 'संगीत संजीवनी' नाटकही याच कोटीतील आहे. त्यांची प्रतिभा तत्कालीन ज्वलंत प्रश्न आणि त्यावर प्रचारकी थाटाचे नाटक बेतण्यात गुंतलेली आढळते. प्रासंगिक आणि ऐतिहासिक महत्त्व, त्यांच्या या लेखनाला प्राप्त झाले आहे. १९१० साली लिहिलेल्या या नाटकात आपला विशिष्ट दृष्टिकोन धिटाईने मांडण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

पौराणिकतेची आपण जपवणूक केल्याची ग्वाही येथे मामा वरेरकर देतात.[३८] मदिरेचे स्तोम खाडिलकरांच्या 'विद्याहरणा' प्रमाणेच याही नाटकात आहे.

## वरेरकरांची कथायोजना :–

वृषपर्व्याच्या राज्यात वाढलेल्या मदिरेच्या माहात्म्याला देवयानी नाक मुरडते. विद्या संपादनासाठी आश्रमात विद्यार्थी म्हणून आलेल्या

---

३८ 'माझं कथानक पूर्णपणें पौराणिक आहे आणि त्यातील भूमिकांचे स्वभावधर्म पूर्णपणे पौराणिक कथेला धरून आहेत.' असा निर्वाळा मामा वरेरकर नाटकाच्या प्रस्तावनेत देतात.
सं. संजीवनी : वरेरकर (१९६०) (प्रस्तावना)

कचावर प्रथम दर्शनीच मुग्ध होऊन देवयानी भाळते. अमात्याला ही गोष्ट खटकते म्हणून तो राजा वृषपर्व्याला सावध करण्याचा प्रयत्न करतो. 'सामान्य भोजनांत जसे पाणी तशीच राजविलासी भोजनांत मदिरा' यापद्धतीने तो मदिरेकडे पाहतो तर देवयानीची सखी शर्मिष्ठा 'हे मदिरेचं व्यसन म्हणजे मगरीची पकड' हे पित्याच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करते. मदिरा माहात्म्य वाढविणारी वारुणी कचाला नष्ट करु पाहणारे 'द्विजिव्ह' ही पात्रे या नाटकात महत्त्वाची होऊन बसतात.

संजीवनी विद्या शत्रूच्या हाती जाऊ द्यावयाची नाही ही 'द्विजिव्ह' ची प्रतिज्ञा आहे. तर कचाची 'मी अखंड ब्रह्मचारी आहे' ही प्रतिज्ञा, वारुणीसारखी वारांगनाच काय पण कोणत्याही स्त्रीच्या मोहात पडायचे नाही म्हणून आहे. तो व्रतस्थ आहे. वैरभावातून कच लांडग्यापुढे फेकला जातो, त्याची रक्षा करून मदिरेतून ती शुक्राचार्याला पाजली जाते. परिस्थिती अशी गंभीर बनते की शुक्राचार्यांचा देवयानीला प्रश्न आहे. 'पिता की वल्लभ? यातले काय हवे?' एक अनिष्ट वळण या नाटकाच्या कथानकाला कच व शुक्राचार्य जिवंत झाल्यानंतर मिळते.

वरेरकरांच्या 'संजीवनी' नाटकातील 'कच' देवयानीचे कोणतेही देणे लागत नसल्यासारखा तुटक वागतो कच-देवयानी प्रणयरंगाला येथे पार तडा जातो.[39] देवयानी कचाला त्याच्या नव्या जन्माचे स्मरण देते तरीही तो जुन्या बीजांनाच हृदयात जपतांना दिसतो. केवळ विद्या-संपादनासाठीच आपले आगमन होते असे तो सांगतो देवयानी त्याला आता विद्यार्थी–जीवन संपल्याचे सांगते. पण कच हा आपलेच म्हणणे मांडतो.[40] तिच्या भावनेचा विचार करीत नाही. ध्येयनिष्ठ कचापेक्षा

---

39 'तुझ्या प्रेमाचा स्वीकार मी केव्हांच केला नव्हता देवयानी, मला क्षमा कर. मी अखंड ब्रम्ह्मचर्याचं व्रत पत्करलं आहे.'
( अंक ३ प्र. ५ पृ. ९४ )

40 'अशा अनेक विद्या मला प्राप्त करुन घ्यायच्या आहेत. देवयानी, तू या खोट्या मोहात मला पाडू नकोस!' (अंक ३ प्र. ५ पृ. ९५)

जिद्दी कच येथे लक्षात राहतो. 'आपण सहोदर आहोत-सहोदरच काय? दोन वेळा जन्म देऊन तूं माझी माता झालीस.' असा भलताच तर्क वरेरकरांचा कच लढवितो. शेवटी दोघेही परस्परांना महाभारतातील कथेप्रमाणे शाप, वर देऊन अलग होतात.

ही वरेरकरांची संजीवनी–हरणाची कथा महाभारतीय उपा–ख्यानाला वेगळेच वळण लावते म्हणजे वरेरकरांच्या अपेक्षेनुसार रचलेली ही एक नवी पुराणकथा होते.

'तुला माझी विस्मृती होईल अन् तुझ्या आजच्या वृत्तीला शोभणाऱ्या क्षत्रियाचं तूं पाणिग्रहण करशील'[41] असा उमद्या मनाने कच येथे वर देतो. अनेकांनी अनेक तऱ्हांनी या उपाख्यानाकडे पाहिले आहे. कचदेवयानी हा समास येथे तोडण्याचा वरेरकरांनी प्रयत्न असला तरी इतरांनी कचदेवयानी प्रेम अभग. चिरंतन रूजलेले म्हणून वर्णिले आहे. या उपाख्यानाला प्रणयरंगाच्या रंगतीपेक्षा कठोर ध्येय आणि कर्तव्य निष्ठेचेच बळ लाभले आहे. व्यक्तिपरत्वे महाभारताकडे पाहतांना पडणारा फरक म्हणून हे जरी मान्य केले तरी महाभारताला या विविध दृष्टीकोनातून पाहिल्याने अनेक नवे धुमारे फुटल्याचे लक्षात येते ही वस्तुस्थिती आहे.

## श्री. संजीवनीहरण : राष्ट्रभक्त 'कच' :–

खाडिलकरांच्या नाटकांप्रमाणेच तत्कालीन समाजातील ज्वलंत प्रश्न प्रतिपादण्याचा प्रयत्न अर्वाचीन कालखंडात पौराणिक काव्ये लिहिणाऱ्या कवींपैकी वि. गो. साठ्ये यांनी 'श्री. संजीवनीहरण'[42] या काव्यात केला आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेतील निबंधांचे आणि लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य' या ग्रंथाचे सखोल संस्कार त्यांच्या

---

[41] सं. संजीवनी : वरेरकर (१९६०) अंक ३ पृ. ९७

[42] अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये : डॉ. ह. कि. तोडमल (आ. दु. १९७४) पृ. १९०–१९१

मनावर झालेले असल्याने, एका ध्येयवादी कविमनाचा आविष्कार म्हणून या खंडकाव्यावरही त्याचा प्रभाव उमटला आहे. काव्याला जोडलेल्या 'नमस्ते' नामक प्रस्तावनेत ते म्हणतात 'केवळ स्वराष्ट्रोद्धारासाठी संजीवनीहरण हेंच आमच्या कचाचें एकमेव निर्मल ध्येय आहे.' निःसीम राष्ट्रभक्ती पराकाष्ठेचा स्वार्थत्याग, निष्कलंक ब्रह्मचारी व आदर्श विद्यार्थी या गुणांनी युक्त असे उज्ज्वल कचदेवचरित्र त्यांना भारतीय नवतरुणांच्या पुढे आदर्श म्हणून ठेवावयाचे होते पण हे काव्य बऱ्याच उशिरा सन १९४८ मध्ये प्रकाशात आले.

या संजीवनीहरण खंडकाव्याच्या इतिहासावरून उद्बोधनाच्या हेतूने कचोपाख्यानावर आधारित खंडकाव्य निर्मितीचा हा प्रयत्न आहे हे स्पष्ट होते.

'संजीवनीहरण' या खंडकाव्यात 'कच' हाच कवीने केंद्रबिंदू मानला आहे. तो निःस्वार्थी, राष्ट्रभक्त, आदर्श विद्यार्थी आहे. आज अनेक भारतीय तरुण विद्यार्जनासाठी पाश्चातदेशात जातात. त्यांच्यापुढे कवीने तारुण्यसुलभ मोहाला बळी न जाणारा प्रसंगी प्राणपणाला लावून विद्यार्जन करणारा व शत्रुराष्ट्रांत राहून स्वकीयांच्या उद्धारासाठी संजीवनी विद्याहरण करणारा कचदेव हा आदर्श ठेवला आहे. त्यासाठी त्यांनी महाभारतातील कचोपाख्यान निवडले आहे. राष्ट्रीयवृत्तीच्या आदर्श विद्यार्थ्याचे चित्र कचाच्या रूपात त्यांना आविष्कृत करावयाचे होते. कचाकडे एक देवदानव युद्धकालाचा प्रतिनिधी म्हणून केवळ न पाहता त्यांनी त्याला विद्यार्थी म्हणून प्रतीकरूप आदर्श म्हणून घडविला आहे.

## प्रबोधनाची प्रेरणा :–

कचोपाख्यानात कच सर्वस्व पणाला लावून विद्या हस्तगत करतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करतो. कचाप्रमाणेच आधुनिक कालांत अनेक भारतीय तरुण परदेशी जावेत. तेथे त्यांनी इतर सर्व मोह टाळावेत, अर्वाचीन काळातील शस्त्रास्त्रांची विद्या संपादन करावी व भारतमातेच्या सेवेसाठी त्यांनी परत भारतात यावे. त्यांनी आपले राष्ट्र

विद्यासंपन्न व बलसंपन्न करावे व भारतमातेची दास्यशृंखला तोडून तिला स्वतंत्र करावे असे कवीला वाटते. 'कच' विद्यार्थी म्हणून कवीने विचित्र केला आहे. त्याचें व्रतस्थ विद्यार्थी जीवन कवीच्या आकर्षणाचे व चिंतनाचे केंद्र बनले आहे. प्रबोधनाच्या प्रभावी प्रेरणेने हे काव्य भारलेले आहे.

धर्माभिमान, राष्ट्राभिमान व पारतंत्र्याविषयी वाचकांच्या मनात चीड निर्माण व्हावी, मद्यपान निषिद्ध मानले जाणे इत्यादी गोष्टींचे प्रतिपादन अनुषंगिक रीतीने आले आहे. स्वातंत्र्य संपादनाची शिकवण ध्वनित करणारे हे काव्य स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर प्रसिद्ध झाल्याने त्याचा गौरव अपेक्षेप्रमाणे होऊ शकला नाही. अन्यथा आगरकर–टिळकांच्या–खाडिलकरांच्या युगात याही काव्याचा उचित गौरव झाला असता असे त्यातील आशयाकडे पाहून म्हणता येते. आदर्श विद्यार्थी रेखाटण्याची कवीची प्रेरणा उदात्त असूनही हे चिंतन काव्यानुभवाचा अपरिहार्य भाग बनत नाही, त्यामुळे या काव्यातील विचारांना स्वतंत्र मोल प्राप्त होते. हे खंडकाव्य म्हणजे महाभारताच्या उपाख्यानाचा उद्बोधनासाठी वापर कसा केला गेला याचे एक उत्तम उदाहरण आहे.

### श्री. वि. गो. साठेंच्या भावविश्वातील 'कच' :–

श्री. वि. गो. साठे यांनी ज्या वैचारिक भूमिकेतून कचाकडे पाहिले आहे ती भूमिका त्यांनी प्रस्तावनेत मांडली आहे. त्याआधारे कवीच्या भावविश्वातील कचाचे चित्र स्पष्ट होते.

" निःसीम स्वराष्ट्रभक्ती व तिच्यापायी पराकाष्ठेचा स्वार्थत्याग हे या कचदेवाचे मोठे गुण-विशेष आहेत. अभिनव विद्यार्जनासाठी शत्रु–राष्ट्रांतही साहसपूर्वक कुशलपणे प्रवेशून तेथे वर्षानुवर्षे सावधान राहतांना यौवन-सुलभ प्रणयादि दुर्दम्य भावनांना स्वतः मुळीच बळी न पडतां उपस्थित मोह कारणांचाच उपयोग उलट आपल्याच कार्यसिद्धीकडे चतुराईने करून घेणारा–प्राणपणाने जोडलेल्या दुर्लभ स्पृहणीय विद्येची विजय पताका मनोभावानें मातृभूमीच्या पदीं वाहून स्वबांधवाच्या उद्धारासाठी

स्वगृही सुखरूप परतणारा संयमी निष्कलंक, ब्रह्मचारी तरूण कचदेव देवराष्ट्रालाच काय कोणत्याही उदयोन्मुख राष्ट्राला साक्षात देव अवतरला वाटणे साहजिक आहे. असल्या प्रवीण स्वार्थत्यागी ध्येयनिष्ठ विद्याधरांची अत्यंत आवश्यकता आज आपल्या भारतवर्षाला किती महत्त्वाची आहे, हें स्वत: सिद्ध आहे. आणि याचमुळे हे उज्ज्वल कचदेव चरित्र भारतीय नवतरुणांपुढें आदर्श म्हणून मी नवकाव्यरूपाने मुद्दाम आणीत आहे,"[43]

## कचोपाख्यानाचे मराठी अवतार :–

एकूण मराठी ललित साहित्यात अवतरलेल्या कचोपाख्यानाचे स्वरूप पाहता त्यात खाडिलकरांचे 'विद्याहरण' नाटक वगळता फारसे विशेष लक्षणीयत्त्व निर्माण झाले नाही. रंजनाच्या आणि प्रबोधनाच्या, त्यातही प्रामुख्याने उद्बोधनाच्याच प्रेरणेने या संजीवनी विद्याहरणा-पर्यंतच्या उपाख्यानातील कथाभागाचे आविष्करण मराठी ललित साहित्यात झाले आहे. अव्वल इंग्रजी कालखंड आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध म्हणजे १८५० ते १९२५ या कालखंडात ही कथा विशेष लेखक वाचकप्रिय होती असे दिसून येते.

महाभारतातील कच व देवयानी यांच्या व्यक्तिरेखा मात्र कुतू-हलाचा आणि जिज्ञासेचा विषय बनल्याचे आढळते. शिवाय त्यात स्वतंत्र रंग प्रत्येक साहित्यिकांने आपल्या विविध हेतूंनी भरल्याचे आढळते. कचदेवयानी प्रेमाचे विविध तऱ्हेचे आविष्कार व प्रतिपादन या लेखनात दिसते. पुढे ययाती उपाख्यान विशेष लोकप्रिय झाले त्याची बीजें या कचोपाख्यानावरील मराठी ललित साहित्य निर्मितीत दिसतात.

※

---

[43] श्री. संजीवनीहरण काव्य : वि. गो. साठये, १९४८ (नमस्ते : पृ. ११)

# ययाती उपाख्यानातील व्यक्तिचित्रे

**ययाती उपाख्यानातील व्यक्तिचित्रे :-**

कचोपाख्यानात कचाने संजीवनी विद्याहरण केली हा कथाभाग आला आहे. ययाती देवयानीचे पाणिग्रहण करतो या कथाभागापासून ययाती उपाख्यान सुरू होते. कचोपाख्यानापेक्षा ययाती उपाख्यान मराठी ललित साहित्यात अधिक प्रभावीपणे चित्रित झाले आहे. त्याची रंगत अधिकच वाढली आहे. या उपाख्यानाला रसिकप्रिय करण्यात वि. स. खांडेकर यांच्या 'ययाति' कादंबरीचा निर्विवादपणे सिंहाचा वाटा आहे.

अर्थात 'ययाति' कादंबरीच्या निर्मितीपूर्वीही या उपाख्यानावर आधारित साहित्यकृती निर्माण झाल्या आहेत. अर्वाचीन मराठी साहित्यातील पौराणिक नाटकांच्या युगात या कथाभागावर आधारित नाटके लिहिलेली आढळतात.

ययाती उपाख्यानात ययाती. देवयानी, शर्मिष्ठा, शुक्राचार्य, पुरू या व्यक्तिचित्रांना महत्त्वाचे स्थान लाभते. ययाती व देवयानी यांच्या विवाहानंतर शर्मिष्ठा दासी म्हणून तिच्याबरोबर जाते आणि पेचप्रसंग निर्माण होतो. ययाती, शर्मिष्ठा परस्परांच्या अधिक जवळ येतात. आणि उत्कट प्रेम करू लागतात. त्यामुळे देवयानीची शर्मिष्ठेविषयीची सूडाची भावना अधिकच तीव्र बनते. तिच्या तिरस्काराला शर्मिष्ठा आणि ययाती दोघांनाही सामोरे जावे लागते. यातून पुढील नाट्यमय कथानक जन्मते. शुक्राचार्यांच्या आधाराने देवयानी स्वतःच्या अहंकाराला धक्का लागू देत नाही. उलट आपल्या अहंकाराला ती जपते. अधिकच फुलविते. त्यामुळे ययातीपासून आणखी दूर जाते. तिच्या सूडाच्या भावनेचा भडका उडतो.

या कथानकात स्त्रीच्या स्वभावाचे, पुरुषीवृत्तीचे आणि एकूण

जीवनव्यवहाराचे सखोल दर्शन घडते. शुक्राचार्यांच्या शाप व उःशापाने कथानकातील नाट्य तीव्र बनते. म्हणून या उपाख्यानाचे मराठी प्रतिभेला विशेष आकर्षण आहे. १९५९ साली प्रसिद्ध झालेल्या ययाती कादंबरीने साऱ्या मराठी रसिकांचे लक्ष ययाती उपाख्यानाच्या रगतदार कथानकाकडे खेचून घेतले आहे.

ययाती आणि शर्मिष्ठेच्या उदात्त व उत्कट प्रेमाला या कथेत प्राधान्य मिळाले आहे. येथे देवयानी, शर्मिष्ठा यांच्या स्वभावातील आणि आचरणातील दोष जाणवतात. या कथानकात देवयानी आणि शर्मिष्ठा, कच आणि ययाती या व्यक्तिरेखा समसमांतर असून, त्या परस्परांच्या गुणदोषांवर प्रकाश टाकतात. सवतीमत्सराची भावना येथे मानवी पातळीवरून व्यक्त होते. खऱ्या प्रेमाची पुरुषाला असलेली तहान ययातीच्या रूपात पहायला मिळते. शुक्राचार्यांच्या रूपात जीवनातील भयानक तपश्चर्येची उग्रता जाणवते. ययातीला मिळणाऱ्या शापात कारुण्य आहे. कामी माणसाच्या जीवनाची शोकांतिका त्याला मिळालेल्या वार्धक्याच्या शापापेक्षा भयानक असू शकत नाही. ययातीचे वार्धक्य ही त्याच्या शोकाची परिसीमा आहे. कचाच्या उदात्त व्यक्तिमत्त्वाने संयमाचे जीवनातील महत्त्व येथे स्पष्ट होते. पुरूच्या महान त्यागाला तुलना नाही. या उपाख्यानात हे जे मानवी स्वभावाचे अनेकविध पैलू आपल्यासमोर उलगडले जातात आणि जीवनाचे अत्यंत सखोल व मार्मिक दर्शन घडते, त्यामुळेच साहित्यिकांना या कथानकाचे लालित्यपूर्ण निर्मितीसाठी फार मोठे आकर्षण आहे. आठवले, श्रीखंडे, माडखोलकर, वि. स. खांडेकर, शिरवाडकर, पाडगावकर, शेंडे या साहित्यिकांनी आपल्या दृष्टीकोनातून या कथानकाला साकार केले आहे. नव्याने या कथेचा समर्थ आविष्कार केला आहे.

## 'सं. देवयानी पाणिग्रहण नाटक' :–

श्री. भि. ग. आठवले यांनी आपण या कथानकाकडे कां वळलो हे प्रस्तावनेत सांगितले आहे. 'हे कथानक सुरस असून संस्कृत भाषेत नाट्य रचना नाही.' 'जलपयन्यायाने' त्यांनी या कथानकाची निवड केली

आहे.[1] शृंगार आणि करुणरसनिर्मिती लेखकाला येथे अभिप्रेत आहे.[2] नाट्यापेक्षा पद्यमय संगीतकासारखेच स्वरूप या नाटकाचे आहे. संघर्षाला येथे अवसर मिळत नाही. दुसऱ्या अंकात कचाने संजीवनी विद्या संपादन केल्याचा उल्लेख आहे. नावावरून या नाटकाचा प्रतिपाद्यविषय 'शुक्र-कन्यादेवयानी हिचा ययाती राजाशी विवाह' (पृ. ४१) हा आहे.

या नाटकात देवयानीच्या विरहिणीच्या स्थितीला विशेष अवसर मिळालेला आहे. नाटककाराने तिची ही विरहिणीची अवस्था मोठी समरसून वर्णन केली आहे.[3] कल्पकतेला पुरेपूर वाव येथे मिळाला आहे. उदाहरण म्हणून देवयानीच्या झोपेतील बडबडण्याचा उल्लेख करता येईल. ही अतिरंजित वर्णने आहेत.

## स्वैर कल्पनाविलास :–

शिकारीच्या निमित्ताने बाहेर पडलेल्या ययातीला देवयानी भेटते. ते दोघे परस्परांवर अनुरक्त होतात. शर्मिष्ठाही ययातीवर लुब्ध होते. नाटककाराने हे अद्‍भुतरम्य वातावरणाने युक्त कथानक स्वतःच्या कल्पकतेने पुढे रंगविले आहे. महाभारतापासून ही कथा स्वतंत्र बनते.

येथे शर्मिष्ठा आणि देवयानी यांच्या जलविहाराचे विस्तृत चित्रण शृंगाररसाच्या निर्मितीसाठी येते. (पृ. ७५) देवयानी आणि शर्मिष्ठा यांच्या नेसावयाच्या वस्त्रातील हे बदलाचे असे सुरम्य व रंगतदार वर्णन याच नाटकात आढळते. देवेंद्राच्या व्यक्तिरेखेला या नाटकात स्थान दिले

---

1 'स्वकपोलकल्पित नवीन नवीन संविधानके बसवून त्यांजवर अशा प्रकारची रचना करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा तो आपल्या पौराणिक कथांवर केला असता अधिक श्रेयस्कर होईल असे माझे तर मत आहे.'
(प्रस्तावना : पृ. १)

2 'देवयानि पाणिग्रहणाख्यचि नाटक
रसिं शुचि कारुण्यी ।।
गणेशसूते रचिले... ...' (पृ. ४)

3 'सं. देवयानी पाणिग्रहण नाटक' : भि. ग. आठवले (१८९६)
(पृ. ६३-६४)

असून सगळ्या कलहाच्या मुळाशी तोच आहे हे स्पष्ट केले आहे. वादळाच्या निर्मितीमुळे वस्त्रात अदलाबदल होते. देवयानी आणि शर्मिष्ठा यांच्यात कडाक्याचे भांडण होते (पृ. ८४) शर्मिष्ठेने केलेली भयंकर निंदा सहन न होऊन देवयानी मूर्च्छित पडते. ती वारली असे समजून समळे तेथून पळ काढतात. या अतिशयोक्त वर्णनातून भावनेचा आणि प्रसंगचित्रणाचा प्रकर्ष साधण्याचा अयशस्वी प्रयत्न दिसतो. 'अनेक भोगांगनांशी व विवाहित वधूंशी रममाण होणारा सार्वभौम राजा' ययाती, देवयानीचा शोध घेत असतांना कोणीतरी एक कृत्रिम पुरुष त्याला एक पत्र देतो. पण तो पिशाच्च हे घडवतो या कल्पनेने ययाती वन जाळू इच्छितो एवढ्यात 'तुझी मनो विहारा वेल्हाळी' तुला येथे भेटेल अशी आकाशवाणी होते. आवाजाच्या दिशेने ययाती वेध घेतो तेव्हा त्याला देवयानी कूपात पडलेली सापडते. ती कूपात असतांनाच परस्पर परिचय करून घेतला जातो. या परिचयानंतर उजवा हात धरून ययाती देवयानीला वर काढतो. यावेळी अंतरिक्षातून पुष्पवृष्टी होते.

या प्रसंगाचे चित्रण लेखकाच्या युगाचा धर्म म्हणता येईल असेच आहे. 'पंकिच ही रुतली गाय, मुक्तिच दिधली तिला' पंकात रुतलेल्या गायीची प्रतिमा संकटात सापडलेल्या स्त्रीसाठी वापरण्याचा प्रघात मराठी साहित्यात आढळतो. देवलांची 'शारदा' खाडिलकरांच्या कीचकवधातील 'सैरंध्री' असाच हंबरडा फोडते. उच्चनीचत्वाच्या कल्पनाही येथे ओघात मांडल्या आहेत.[4] देवयानीला ययाती अभय देतो[5] पण या विवाहाच्या निमित्ताने नाटककाराला एक नवा सामाजिक प्रश्न विचारात घ्यावासा वाटतो.

---

4 देवयानी शर्मिष्ठेविषयी ययातीजवळ उद्गार काढते 'वृषपर्वा हा माझ्या बापाचा शिष्य, तेव्हा त्याची कन्या, माझी शिष्या, ती निशाचरकन्या तेव्हा माझी वस्तू तिला सेवन करण्याचा अधिकार नाही.'
सं. देवयानी पाणिग्रहण नाटक : भि. ग. आठवले, पृ. ११०

5 'सोड सखी तू काळजी ।। घेऊ सूडा
अथवा आणवू बांधूनि तिचा काय जी ।। १ ।।
सं. देवयानी पाणिग्रहण नाटक : (नाटकातील पद)

**नवी कलाटणी :–**

ययाती देवयानी यांचा हा विवाह म्हणजे ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा संगम आहे. 'ब्राह्मणाची वस्तू इतरांना असेव्य' असे ययाती, देवयानीला म्हणतो तेव्हा देवयानी काकुळतीला येऊन म्हणते, हे सारे भेद मी मोडण्यास तयार असून त्यासाठी पित्याची आज्ञा मिळवीन.' येथे नाटककाराने आपल्या स्वत:च्या कालखंडात रूढ असलेल्या भेदा–भेदाची कल्पना पुराणकाळावर आरोपित करून एक वेगळी कलाटणी ययाती देवयानीच्या विवाहाच्या प्रसंगाला दिली आहे.

देवयानीचा वाजवीपेक्षा अधिक जिद्दी स्वभाव येथे वर्णन केला आहे. शर्मिष्ठेला शासन केल्याशिवाय घरी परतावयाचे नाही अशी तिची प्रतिज्ञा आहे. शेवटी शुक्राचार्यांनाही निरोप पाठविण्याची जबाबदारी ययाती स्वीकारतो. या प्रसंगाचीही स्वतंत्र निर्मिती आहे. त्यात कमालीची अद्‌भुतरम्यता आहे. या प्रसंगाला महाभारताचा आधार नाही.

देवयानी वनात एकटीच राहणार या कल्पनेने तिचे संरक्षण करू शकेल असा 'वर' ययाती, जातांना तिला देतो. या एका छोटयाशा प्रसंगाच्या निमित्ताने विरहाच्या भावनेचा आविष्कार आणि विप्रलंभ शृंगाररसाच्या निर्मितीचा प्रयत्न येथे नाटककार करतो. तो कोणताही कलात्मक परिणाम साधीत नाही. उलट हास्यापद ठरतो.

'विरह कसा साहू?' अशा भावोत्कट मन:स्थितीत ही देवयानी वनात राहते. देवयानी घरी परत आली नाही म्हणून शुक्राचार्यांची आणि त्यांच्या पत्नीची अवस्था शोकाकुल झाली आहे एवढे महान तपस्वी शुक्राचार्य, पण ते आपल्या एकुलत्या एक लाडक्या कन्येच्या विरहाने व्याकुळ होतात. या भावनेला गहिराई प्राप्त करून देणारे चित्रण, देवयानीच्या विरहाने मूर्च्छित झालेल्या तिच्या आईच्या वर्णनाने आले आहे. अस्वस्थ झालेले देवयानीचे आईवडील शर्मिष्ठेची दासी मंदाकिनी हिच्याकडे देवयानीच्या चौकशीसाठी जातात. तेव्हा मंदाकिनी शर्मिष्ठा तापाने फणफणत असून बडबडते आहे असे खोटे बनावाप्रमाणे सांगते. पण शर्मिष्ठेच्या या बनावाचा, बडबडण्याचा नाटककाराने मोठ्या

सूचकतेने उपयोग या काल्पनिक प्रसंगात केला आहे. अपराधी शर्मिष्ठेने घटलेल्या अरिष्टाला टाळण्यासाठी शोधलेली ही युक्ती मार्मिक आहे.

शेवटी ययाती शुक्राचार्यांना घेऊन देवयानीकडे वनात येतो. पण देवयानी शोधूनही सापडत नाही. औत्सुक आणि चमत्कृतीचा खेळ येथे नाटककाराला करावासा वाटतो. भडक कपटनाटय योजून आठवले यांनी शुक्राचार्यांच्या अंत:करणातील अपत्यस्नेहाची अत्युत्कट भावना चित्रित केली आहे. रहस्यमयतेने अदृश्य झालेल्या देवयानीचा शोध. शुक्राचार्य अंतर्ज्ञानाने घेतात. तेंव्हा घडलेला प्रकार उलगडतो. हा सगळाव भाग कपोलकल्पित आणि चमत्कृतिजनक असून भावाविष्कारासाठी व प्रेक्षकांचे कुतूहल जागृत करण्यासाठीच केवळ योजलेला दिसतो. हे नाटक म्हणजे महाभारताची कथा रंजनासाठी आणि स्वैरकल्पना विलासासाठी कशी राबविली जाते याचा वस्तुपाठच होत. इ. स. १८९६ मधील नाटक म्हणून विचार केल्यास त्याच्या अद्‌भुतरम्य स्वरूपाचा उलगडा होतो.

## ययाती 'विलाप' :–

हरवलेल्या देवयानीविषयी ययातीच्या मनात नाना प्रकारच्या शंकाकुशंका येऊन तो शोकविव्हल होतो. या प्रसंगीचा ययातीचा विलाप रघुवंशातील अज, रामायणातील सीताहरणानंतरचा राम किंवा मेघ–दूतातील यक्ष, यांनी केलेल्या शोकाचे स्मरण करून देतो. हा ययाती मेघाला बक्षिसाचे आमिष दाखवितो, त्याला कोकिलकूजित म्हणजे देवयानी बद्दलची असूया वाटते. हंसाला तो 'मृगनयना' देवयानी आढळली का म्हणून विचारतो. अशा तऱ्हेने भि. ग. आठवले यांनी संपूर्ण पाचवा अंक देवयानीच्या शोधासाठी खर्ची घातला आहे. हे सारेच अतिरेकी, भावविवश नाटय आहे. या अतिरेकामुळे रस निर्मितीएवजी रसहानीच झाली आहे. सर्व गोष्टींच्या मुळाशी कारण असलेल्या इंद्रानेच 'सुशर्मा' नावाच्या गंधर्वामार्फत हे सारे घडवून आणल्याचे शेवटी सिद्ध होते. त्याचा हेतू 'माझ्या या करामतीपासून शुक्र व दैत्येंद्र या दोघांमध्ये अत्यंत विरोध उत्पन्न होईल.' (पृ. १५७) हा स्पष्ट होतो.

श्री. आठवले यांनी महाभारतातील ययाती उपाख्यानाला एखाद्या

बालनाट्याचें अद्‌भुतरम्य स्वरूप प्राप्त करून दिले आहे. ते उपाख्यान आपल्याला हव्या त्या पद्धतीने वापरतात, त्यात घटनाप्रसंगांची चमत्कृतीसाठी स्वैर निर्मिती करतात. रंजनाची प्रेरणा या नाटकाला व्यापून टाकते. पुढे हेमकूट पर्वतावरील गुहेत देवयानीला ठेवल्याचे लक्षात येते पण तेथूनही ती अदृश्य होते. शेवटी ती शंकराच्या देवळात सापडते. शेवटी इंद्र क्षमा मागतो आणि ययाती देवयानीची भेट होते. केवळ नावालाच महाभारतातील उपाख्यानाचा आधार घेऊन रंजनाचा मसाला भाबड्या स्वरूपात आणि मुक्तपणाने भरण्याचा प्रयत्न येथे श्री. भि. ग. आठवले यांनी आपल्या काळाची अभिरुची लक्षात घेऊन केलेला दिसतो.

## वि. गो. श्रीखंडे यांचे सं. ययाती :–

वि. गो. श्रीखंडे यांचें 'संगीत ययाती' हे पाच अंकी नाटक ययाती उपाख्यानावर लिहिलेले आहे या नाटकाचे सूत्र आणि भूमिका प्रारंभीच सूत्रधार आपल्या मंगलाचरणातून व नटीबरोबरच्या संभाषणातून स्पष्ट करतो ययातीचे चरित्र सांगणे ही कल्पना येथे गृहीत आहे.[6] देवयानी व शर्मिष्ठा यांची ही कथा असून शुक्राचार्यांचा कन्यामोह, धृतराष्ट्र व द्रोणाचार्यांना त्यांचा अपत्यस्नेह नडला, तसाच येथेही नडला आहे.

## अपत्यस्नेह :–

नाटककाराने महाभारतीय उपाख्यानातून शोधलेले हे अपत्यस्नेहाचे सूत्र जर पुढे संपूर्ण नाटकभर सांभाळले असते तर प्रारंभीच्या

---

[6] 'पुरुकुली जनित ययाति नृपति गमला
महीवर रविवत जाणा ।
तच्चरित्र सुमना विठ्ठल अर्पित रसिक
सभा जन चरणा ।।'
'लालन योगें बाल बिघडुनी कलंक ये जनकाला ।।
देवयानिनें जेंवि आणिला त्रिभुवन पूज्य पित्याला ।।
म्हणून वदत तुला । लाडान करी कधि बाला ।।
(नटी सूत्रधार प्रवेशातून) सं. ययाती : वि. गो. श्रीखंडे, १८८९ पृ. २

काळात एक समर्थ, अभिनव साहित्यकृती म्हणून या नाटकाचा गौरव झाला असता. शुक्राचार्यांचा अपत्यस्नेह ही खरी महाभारतातून सूचित होणारी एक व्यथा आहे. नाट्याचार्य खाडिलकरांनी याचा पुरेपूर उपयोग 'विद्याहरणा'त करुन घेतला आहे. तेवढ्यासाठी शुक्राचार्य कचाचा डाव ओळखूनही त्याला आश्रमात ठेवून घेतात. मारला तरी पुन्हा जिवंत करतात कारण देवयानीचे जीवनसर्वस्व 'कच' आहे. आणि शुक्राचार्यांची लाडकी एकुलती एक कन्या 'देवयानी' आहे. श्रीखंडे यांनी शुक्राचार्यांच्या अपत्यस्नेहाची ही व्यथा अचूकपणे टिपली आहे. 'बालाविन दुसरें नाही विश्रांतिस्थल पितरांना ॥' लाडक्या लेकीसाठी, हळव्या झालेल्या पित्याची ही मन:स्थिती (२ ऱ्या प्रवेशात) शुक्राचार्य जेव्हा देवयानीचा शोध घेतात, तेव्हा स्पष्ट होते. लेखकाच्या व्यक्तित्वानुसार आणि कल्पनेनुसार पुराणकथा वळण घेतांना येथे दिसते.

जलक्रीडेला गेल्या असतांना शर्मिष्ठा व देवयानी यांच्यात वस्त्रांच्या अदलाबदलीवरून भांडण होते. त्यात शर्मिष्ठा कठोरपणे देवयानीला विहिरीत ढकलून देते. तसेच निर्जन अरण्यात तिला सोडून नगरात परत येते. शर्मिष्ठेच्या या दुष्कृत्याविषयी व पाषाणहृयी होऊन वागण्याविषयी दोष देऊन निदान या प्रसंगी तरी देवयानीला सहानुभूती दाखवायला हवी होती. पण मराठी ललित साहित्यात या गोष्टीचे फारसे चिंतन झाले नाही. याही नाटककाराने थोरांची एक खोडी, (राजकन्येचा एक खेळ) म्हणून या घटनेकडे, देवयानीने दुर्लक्ष करावे असे येथे सांगितले आहे. नाटककाराची स्वतंत्र जाणीव यातून सूचित होते.

'अगं, लहान लहान अज्ञानमुलें अशीच अविचाराने भांडतात व लागलीच एकही होतात.' प्रौढ माणसाने मुलांची समजूत काढावी असाच हा प्रकार आहे. हा शुक्राचार्यांचा समजूत:काढण्याचा प्रयत्न दुबळा आहे.

ग. त्र्यं. माडखोलकरांच्या 'देवयानी' नाटकातील घटनेप्रमाणे या गोष्टीचा निवाडा येथे वृषपर्व्याच्या राजदरबारात होत नाही. देवयानी

शर्मिष्ठेला आपल्याबरोबर दासी म्हणून विवाहानंतर येण्याचें फर्मावतें,[7]' 'देवयानी'च्या या म्हणण्याला शुक्राचार्य येथे मान तुकवितात आणि कन्येच्या इच्छेला सामोरे जातात. [8]

कथानकातील सारे नाटय हरपते व संघर्ष येथे कोठेच आढळत नाही. मिळमिळीत तडजोड येथे आहे. पण नाट्याचा अभाव असला तरी कलामूल्यांची जाण नाटककाराला आहे असे जाणवते.

## प्रणयिनी शर्मिष्ठा :–

राजकन्या असूनही दासी म्हणून जीवन जगणाऱ्या शर्मिष्ठेला पाय दाबण्याचे कामही करावे लागते. 'मम जन्म फुकटचि गेला थोर कुली जन्मुनी।' असे म्हणायची पाळी, तिच्यावर येते.

ययातीने विचारताच या नाटकातील देवयानी शर्मिष्ठेचा एक राजकन्या म्हणून येथे सरळ परिचय करून देते. 'सर्व दैत्यांचा अधिपति जो वृषपर्वा त्याची ही कन्या!'

या ठिकाणी नाटककार रंजनाच्या दृष्टीने कथावस्तूंचा आविष्कार करतो. स्वगतात कामातुर ययाती शर्मिष्ठेच्या लावण्याची स्तुती करू लागतो. ययाती आपण थकल्याचे खोटे भासवितो. या थापेला देवयानी बळी पडते. स्वतः पाय दाबते व शर्मिष्ठेला त्याला वारा घालायला सांगते.

मत्सरी, अहंकारी, देवयानी येथे कोठेही आढळत नाही. नाहीतर

---

[7] 'बाबा, आपणांला माझें एवढेंच सांगणें आहे की त्या विहिरीतून मला वर माझा काढण्याकरितां ज्यांनी माझे पाणिग्रहण केलें त्यांनाच मी हा माझा देह अर्पण केला आहे. या करितां माझ्या दास्यत्वाला शर्मिष्ठा देऊन जर तुम्ही माझी तिकडे पाठवणी करीत असाल तरच मी आतां आपल्याबरोबर येतें, नाही तर मला काही बिलकूल यायचें नाही.'
सं. ययाती : वि. गो. श्रीखंडे : १८८९ अंक १ पृ. १५

[8] 'प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचेही मी ऐकत नाही तर वृषपर्व्याने माझे ऐकलेच पाहिजे.' सं. ययाती : वि. गो. श्रीखंडे, १८८९ १ पृ. १६

तिने कटाक्षाने शर्मिष्ठेला दूर ठेवले असते. ययातीप्रमाणेच शर्मिष्ठाही त्याच्या मोहात पडते. वारा घालतांना भूलून ती म्हणते, 'सुंदर नहुष–कुमारा। मदनाहुनीही अति सुकुमरा। पाहुनि राजीवनयना विसरुनि गेले मी तनु भाना ।। 'मुळीं मम नशिबचि फुटकें' अशी जाणीवही तिला येथे होते. ही शर्मिष्ठा सुद्धा ययातीप्रमाणेच कामातुर प्रणयिनी आहे [१] शृंगाराच्या, विप्रलंभ शृंगाररसाच्या निर्मितीसाठी नाटककराने शर्मि–ष्ठेच्या विरहज्वराचे दुःख उत्कटतेने चित्रित केले आहे. 'मम नाथाची मदन मूर्ति ती' या शृंगारिक भाषेत ती बोलू लागते. मदनिकेजवळ ती आपली व्यथा सांगते तेव्हा 'हंस नेहमी मुक्ताफळेंच भक्षितो' या तिच्या उत्तरात ययाती शर्मिष्ठा प्रेम पूर्णपणे प्रकट झाले आहे.

## अद्‌भुतरम्यतेचा आधार :–

शर्मिष्ठा ययातीवर प्रेम करीत असूनही तिचे मन कातर आहे. पण श्रीखंडे यांनी एका अद्‌भुतरम्य प्रसंगाचा आधार घेऊन रंजनाबरो–बरच शमिष्ठेच्या मनातील कातरता दूर केली आहे. चित्रासुराच्या मदतीने एकांतात शर्मिष्ठा आणि ययाती या दोघांना एकाच मंचकावरती आणून त्यांचे परस्परांविषयीचे प्रेम व्यक्त केले आहे. या प्रसंगाने अण्णा–साहेब किर्लोस्करांच्या 'सौभद्र' मधील घटोत्कचाच्या कामगिरीची आठवण होते. हा प्रसंग कपोलकल्पित आहे. नाटककाराने या प्रसंगाच्या चित्रणाने प्रणयरंगाला उधाण आणले आहे.

ययातीलाही प्रारंभी अशीच भीती वाटते. 'तिजला हा वर योग्य

---

[१] 'परमेश्वरा! बरोबर ज्या तरुणीला ही सौंदर्याची खाण सापडेल तीच युवती धन्य ह्यांत बिलकुल संशय नाही.'
'ते दिवशी देवयानीच्या महालांत त्या प्राणेश्वरास पहिल्यापासून त्यांचा मला अगदी निजध्यास लागून गेला आहे· कुठेही मन रमत नाही.'
'नाथ मूर्तिरुचिर अति मर्जाशि दिसली।
पाहुनि ती संग स्पृहा मनिच उपजली ।।'
'चैन नसे मज प्रिय विरहाने। डाव साधला निष्ठुर मदनें ।।
काय करू सखे मज करमेना.'
सं. ययाती : वि. गो. श्रीखंडे, १८८९ (अंक २, प्र. ३ पृ. २९)

दिसे कां?' कारण तोही संपूर्णपणे तिच्यावर भाळला आहे. 'सखिचा ध्यास मला। निशिदीनीं अंतरी लागुन गेला॥' अशी त्याची स्थिती आहे. मीलनाची याचना किती लीन होऊन ययातीराजा करतो हे पाहिले म्हणजे तो राजा नसून प्रियकर, केवळ एक प्रियकर म्हणून येथे जाणवतो.[10]

हे सगळेच वर्णन अपूर्व आहे. नाटककाराला ययाती उपाख्यानातील सारा संघर्ष बाजूला ठेवून येथे ययाती शर्मिष्ठा प्रेमकथाच रंगवावी असे वाटले आहे.

महाभारतातील उपाख्यानाला व्यक्तिपरत्वे मिळालेले हे वळण आहे. नाटकाचे तीन अंक पूर्ण होऊनही शर्मिष्ठा, देवयानी यांच्यातील वैमनस्य कोठेही प्रगट होत नाही. यावरून नाटककाराचो ययाती उपाख्यानाकडे पाहण्याची, त्यातील फक्त हवे ते स्वीकारून त्याचाच आविष्कार करण्याची भूमिका स्पष्ट होते. येथे श्रीखंडे यांना प्रेमाचे सूत्र या उपाख्यानात सापडले असून त्या सूत्राच्या विस्तारातच त्यांनी नाटक रंगविले आहे.

## नाट्याचा अभाव :

या नाटकाच्या चौथ्या अंकात मात्र देवयानीला ययातीचे चित्त विचलित झाल्याची जाणीव होते.

अन्य मराठी साहित्यकृतीप्रमाणे नागिणीसारखी चवताळून फूत्कार टाकणारी देवयानी येथे नाही. ती आपली असहाय्यता, राग व्यक्त करते. स्वतःच्या नशिबाला दूषण देते. उलट तिची मैत्रीण सखी रदनिका तिला अशावेळी शुक्राचार्यांची मदत घ्यायला सुचविते. महाभारतातील नाट्यात्म कथेतून हे एक नाट्यहीन नाटक जन्मले याचे आश्चर्य वाटते.

---

10 कर जोडुनि मी नमुनि वदतों तव पादांशी॥ (पृ. ४७)
यानंतर नाटकात कंसात चक्क नोंद आहे.
(ती येऊन बसते व ययाति तिचे चुंबन घेतो.)
सं. ययाती : वि. गो. श्रीखंडे (१८८९) अंक ३ पृ. ४८

त्यात संथपणा जाणवतो.

पुढे विदूषकाच्या हाताने देवयानी आपल्या पित्याला पत्रिका पाठविते. या नाटकातील शुक्राचार्यसुद्धा बोलावल्याप्रमाणे उपस्थित होतात, ते 'ईश्वरी सूत्रानुसार सगळे घडते, असा भाबडा, पोक्त विचार करीतच! शुक्राचार्यांचा क्रोध येथे मात्र आढळत नाही. शर्मिष्ठा आणि ययाती दोघेही पुढे काय होणार या धास्तीने 'कांहि कळेना मम चित्ताला ।।' अशा स्थितीत आहेत. पण अनपेक्षितपणे ययाती देवयानीच्या मंदिरात उपस्थित होतो आणि एक तीव्र संघर्ष येथे सौम्यरूप धारण करतो. ययाती–देवयानी यांचे संभाषण निर्जीव होते. जणू फारसे काही घडलेच नाही अशातऱ्हेने सखी रदनिकेच्या आश्रयाने देवयानी आपला कृतककोप व्यक्त करते. ययातीसुद्धा 'प्रिये, अशी मजवर रागावून वाकडेंच कां बरे बोलतेस?' असे पतिपत्नीच्या सहज भांडणासारखे बोलतो. सौभद्र नाटकाची छाप या नाटकातील पदावरही दिसते (उदा : 'नको धरू रागा । मजवरी करी अनुरागा ।। धृ ।। ) शेवटी ययाती शर्मिष्ठा दोघेही शरणागती पत्करतात आणि संघर्षावाचून नाटक घडते.[11] ययाती आणि देवयानी यांच्यात सख्य जुळते आणि नाटकाची रंगतच संपुष्टात येते. नाममात्र शुक्राचार्यांचे आगमन होते. सगळे त्यांच्या चरणी लागून आशीर्वाद घेतात. शापा ऐवजीं वरदान मिळते. ('शुक्राचार्य-वत्सा ययाते' तुला आणखीं कांही इच्छा असल्यास मागून घे.'

तात्पर्य, १८८९ साली केवळ मनोरंजक साहित्यकृती म्हणून श्रीखंडे यांनीं ययाती उपाख्यानावर आधारित सं. ययाती नाटकाची उभारणी केली. रंजनासाठी महाभारतातील कथानकाचा वापर कशा

---

[11] ययाति म्हणतो, 'कर जोडोनि प्रार्थितसें मी ।।,' तर पश्चाताप–दग्ध शर्मिष्ठा म्हणते,–
'राग नसावा ह्या दासीवर । मागतें हें तुज पसरूनि पदर ।
तव ताताच्या सहजचि नमनें होऊनि जाईल ही तनु चूर ।। '
'सेवक मी तव पदाचा' म्हणून ययातीने येथे शुक्राचार्य येण्यापूर्वीच देवयानीला प्रसन्न करून घेतले आहे.
सं. ययाती : वि. गो. श्रीखंडे, १८८९

रीतीने केला गेला याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून श्रीखंडे यांच्या या नाटकाचा निर्देश करता येतो. मनोरंजनाची प्रेरणा प्रभावी ठरल्यानंतर महाभारतातील कथोपकथांचा लेखकाच्या दृष्टिकोनातून कसा आविष्कार होतो आणि महाभारतातील कथोपकथांना कसे रूप प्राप्त होते याची साक्ष हे नाटक देते. रंजनासाठी आवश्यक तेवढा कथाभाग स्वीकारून त्यात मन:पूत बदल आणि स्वच्छंदपणे प्रसंगाची निर्मिती करण्याचे स्वातंत्र्य नाटककाराने येथे घेतले आहे. महाभारतावर आधारित ललित साहित्यकृतीचा अभ्यास करतांना ही प्रवृत्तीही लक्षात घेणे आवश्यक होते.

## वि. स. खांडेकरांची 'ययाति' कादंबरी :–

ययाती उपाख्यानावरील सर्वोत्कृष्ट मराठी ललित साहित्यकृती म्हणून वि. स. खांडेकरांच्या 'ययाति' कादंबरीची विस्ताराने चर्चा प्रस्तुत ठिकाणी करणें आवश्यक आहे.

'ययाति' सारख्या कादंबरीनेच प्रस्तुत अभ्यास–विषयाला विशेष चालना दिलेली आहे. जे ययाती उपाख्यान विविध रसनिर्मितीसाठी (शृंगार, करुण, हास्य, अद्‌भुत इ.) पूर्वी साहित्यिकांनी स्वीकारले होते. त्या ययाती उपाख्यानाचे सामर्थ्य वि. स. खांडेकरांनी अचूकपणे हेरून त्याची कलात्मक अभिव्यक्ती 'ययाति' कादंबरीच्या रूपात केली आहे.

या कादंबरीचा विषय खांडेकरांच्या मनामध्ये लहानपणीच रूजला होता. पुढे तो कितीतरी काळपर्यंत त्यांच्या मनामध्ये सतत घोळत होता. या कालावधीत या विषयाने त्यांच्या मनामध्ये कितीतरी वळणे घेतली. त्यांना विविध तऱ्हेने तो जाणवला.

प्रारंभी ययातिशर्मिष्ठा यांची अजोड प्रीतिकथा म्हणून ययाती उपाख्यानाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. एक नवे सूत्र आणि नवे आकृतिबंध या उपाख्यानातून त्यांनी शोधले. सखोल चिंतन केले.

सभोवतालच्या परिस्थितीचा संस्कार वि. स. खांडेकरांच्या मनावर प्रभावीपणे होत होता. या उपाख्यानाला नव्या वातावरणातून नवे

आकार प्राप्त होत होते. अगदी सुरुवातीला त्यांना ययाती केवळ कामी पुरुष म्हणून जाणवला. पण दोन महायुद्धानंतरची परिस्थिती ययातीला अधिक व्यापक करण्यास कारणीभूत ठरली. नुसत्या कामभावनेचा प्रतीक म्हणून, पुढे हा ययाती राहिला नाही तर सर्वच प्रकारच्या प्रलोभनाचा, कधीही न संपणाऱ्या हावरटपणाचा, लोभी मनोवृत्तीचा आणि सर्व प्रकारच्या मोहाचा तो प्रतिनिधी झाला. महाभारतातील कथानकाचे साहित्यिकांनी अंतर्मुख होऊन सतत चिंतन केल्याने किती विविध अर्थ निर्माण होतात. नवी संगती अनुभवाला येते याचे मूर्तिमंत उदाहरण आहे 'ययाति' कादंबरी. या कादंबरीची निर्मिती-प्रक्रिया आणि खांडेकरांनी या कथानकात भरलेला नवा, जिवंत आशय पाहिला म्हणजे मराठी ललित साहित्यिकांचे सामर्थ्यही प्रत्ययाला येते. मराठी प्रतिभेने महाभारतात काही मौलिक भर टाकली. त्यातील व्यक्तिरेखा आणि घटना–प्रसंगांना, कथानकाला सुविकसित केले असे येथे दिसून येते.

## 'ययाति' कादंबरीची पार्श्वभूमी :–

या कादंबरीची पार्श्वभूमी विशद करतांना स्वत: खांडेकरांनी अतिशय महत्त्वाचें निवेदन केले आहे. ते म्हणतात, 'या कादंबरीचा पुराणाशी केवळ नावापुरता संबंध नाही. एका प्रसिद्ध पौराणिक उपाख्यानाचे धागेदोरे घेऊन ते मी स्वतंत्र रीतीने गुंफले आहेत.'[12]

एका अलक्षित राहिलेल्या महाभारतीय उपाख्यानाकडे खांडेकरांनी साऱ्या मराठी वाचकांचे आणि अन्य भाषांतील रसिकांचे लक्ष 'ययाति' कादंबरीच्या निमित्ताने वेधून घेतले आहे. या उपाख्यानाच्या आधाराने त्यांच्या दिव्य प्रतिभेचा साक्षात्कार घडतो. त्यांचे हे ययाती उपाख्यानाचे आकलन प्रतिभाजनित आहे. त्या आकलनात कालातीतता आहे म्हणूनच काव्यात्मताही अवतरली आहे. 'अद्‌भुतरम्यतेच्या धुक्यांत पूर्णपणे झाकोळून गेलेल्या काळाचा' म्हणजेच पुराणकाळाचा त्यांनी आधार घेतला. मोठ्या आत्मविश्वासाने ते या महाभारतातील ययाती उपाख्यानाकडे

---

[12] ययाति : वि. स. खांडेकर, चवथी आवृत्ती, १९६७ (पृ. ४४७)

पाहतात, त्याचा शोध घेतात आणि त्यातून नवनिर्मिती करतात.[13]

## खांडेकरांचे श्रेय :–

ययाती उपाख्यानाला मराठीत ललित साहित्यात लोकप्रिय[14] आणि कलात्मक स्वरूपात साकार करण्याचे श्रेय प्रथमत: वि. स. खांडेकरांचेच आहे.

संस्कृत साहित्यात या काव्यात्म आणि नाट्यात्म उपाख्यानाचा आधार घेऊन ललितसाहित्यनिर्मिती झालेली आढळत नाही. खांडे–करांची प्रतिभाशक्ती आणि कलादृष्टी या पार्श्वभूमीवर उठून दिसते. कुसुमाग्रजांनी आपल्या 'किनारा' या काव्यसंग्रहात 'उषा–स्वप्न' या कवितेत एक पौराणिक कथानक भावपूर्ण, अत्यंत तरल आणि नाजुक छटांसह समर्पक शब्दात रंगविले आहे. या उपाख्यानाकडे मराठी रसि-कांचें लक्ष वेधल्याबद्दल खांडेकर 'शिरवाडकरांना' जे मानाचे पान देऊ इच्छितात तेच ययाती उपाख्यानाच्या संदर्भात त्यांचे श्रेय आहे.

सामाजिक कादंबरीचे क्षेत्र वि. स. खांडेकरांसारख्या गरुडाच्या भक्कम जीवनवादी पंखांना विहार करण्यास अपूर्ण वाटू लागले 'पुष्क–रणीच्या तरंगात सागर लाटांची प्रक्षुब्धता कशी असेल?' म्हणून ते पौराणिकतेकडे वळले. पौराणिक कथा नुसते मानवी जीवन साकार करीत नाहीत तर आणखी काहीतरी अगम्य, चिरंतन तत्त्व त्यातून सूचित होत असते. खांडेकरांच्या प्रतिभेला आपले खरे क्षेत्र या कथेच्या

---

13 'आपल्या पुराणकथा या साहित्यिकाच्या दृष्टीने सोन्याच्या खाणी आहेत. ग्रीक पुराणकथांनी सोफोक्लज पासून युजिन ओनीलपर्यंत अनेक कलावंत प्रतिभेला आवाहन केले आहे. मानवी भावनांच्या आणि वासनांच्या संघर्षांनी रसरसलेले साहित्य नवनिर्मितीकरता त्यांच्या हाती दिले आहे. भारतीय पुराणकथांतही हें सामर्थ्य नि:संशय आहे.'
ययाती : वि. स. खांडेकर, १९६७ (पृ. ४४९)

14 रसिकप्रियतेचा उच्चांक या कादंबरीने मराठी साहित्यात गाठला आहे. आजवर 'ययाति' कादंबरीच्या ३४००० प्रती खपल्या. प्रस्तुत कादं–बरीची ४ थी आवृत्ती १६००० प्रतोंची होती. या संख्यात्मक आलेखा–तून याची कल्पना येईल.

निमित्ताने सापडले. खांडेकरांच्या प्रतिभेची सारी वैशिष्टये 'ययाति' कादंबरीत गुणांमध्ये रूपांतरित झाली आहेत. येथे जणू काही कस्तुरी मृगाला 'कस्तुरी' चा शोध लागला आहे. 'ययाति' कादंबरीने पौराणिक कादंबरीच्या एका नव्या पर्वाला सुरवात केली आहे.[15]

पौराणिक ललित साहित्याची निर्मिती करणाऱ्या साहित्यिकाला मूलतःच काही अनुकूलता प्राप्त होते. म्हणजे ती पुराणकथा जनमानसात रुजलेली असल्याने, ज्ञात असल्याने, आपोआपच जनरुचिसंवाद साधला जातो. त्याचप्रमाणे कधी कधी जनरुचिसंवादाऐवजी विसंवादालाही त्याला सामोरे जावे लागते. पौराणिक तपशिलात बदल करतांना त्या साहित्यिकाच्या मनात धास्ती असते. शेवटी कलावंताने कलानिष्ठ राहून अंतर्गत सुसंगती असलेला नवा कलात्मक आकृतीबंध शोधणेच अपेक्षित असते. वि. स. खांडेकरांच्या याच कलादृष्टीने ययाती कथेला नवे रूप प्राप्त करून दिले आहे.

महाभारतातील ययाती उपाख्यानाचा या कादंबरीत केवळ संक्षेप विस्तार होत नाही तर आपल्या प्रतिभासामर्थ्याने खांडेकरांनी एक नवी अर्थपूर्ण कलाकृती निर्माण केली आहे. प्रबोधनाच्या प्रेरणेने ती जन्माला आली असून रंजकही झाली आहे. 'ययाति' कादंबरीने रंजन आणि प्रबोधन या दोन्हीही प्रेरणांवर मात करुन अंतिमतः कलात्मक रूप धारण केले आहे.

## महाभारतातील ययाती उपाख्यान :-

महाभारतात या उपाख्यानाचे एकूण तीन भाग पडतात. पहिला भाग म्हणजे 'कचोपाख्यान' (यात कचाच्या संजीवनी विद्येच्या हरणा- पर्यंतचे कथानक येते.) दुसरे 'ययाती आख्यान' (यात ययाती देव- यानीच्या पाणिग्रहणापासून पुरूने ययातीचे स्वीकारलेले वार्धक्य दूर केले व त्याला पुन्हा यौवन प्राप्त झाले येथपर्यंतचा भाग येतो.) तिसरे

---

15 प्रदीर्घ पौराणिक, चरित्रात्मक कादंबऱ्या व विशेषतः ययाती उपा- ख्यानावरील नाटकांना या कादंबरीने प्रेरणा दिली आहे.

'उत्तरयायात' (यात ययातीचे स्वर्गात जाणे, अधःपतन होणे ही कथा यात आली आहे.)

प्रस्तुत ठिकाणी फक्त ययाती उपाख्यानाचाच विचार करावयाचा आहे.

शुक्राचार्यांच्या संमतीनेच ययाती देवयानी विवाह होतो. देवयानी, तिला अरण्यातील विहिरीत ढकलून निघून जाण्याचे निर्घृण कृत्य करणाऱ्या शर्मिष्ठेला, राजकन्या असूनही दासी करून बरोबर घेते देवयानीचा अक्षम्य अपराध शर्मिष्ठेने केल्याचे येथे जाणवते. कारण ययातीने जणू देवयानीला विहिरीतून उजवा हात धरून वर काढून पुनर्जन्म दिला. शर्मिष्ठा राजकन्या आहे. हे ययातीला माहीत आहे. शुक्राचार्यांनी त्याला जाणीव करून दिली आहे, की 'कधीही शर्मिष्ठेला सहशयनाला बोलावू नकोस.' शर्मिष्ठेला, देवयानीला विहिरीत लोटण्याच्या दुष्कृत्यामुळे हे शासन भोगावे लागणार होते. तिचे हे कृत्य 'स्त्रीत्वा' ला साजेसे नाही.

तत्कालीन सामाजिक संकेतानुसार शर्मिष्ठा आपला डाव टाकते. 'राणीबरोबर तिची दासीही राजाला भोग्य असते अशा दासीची इच्छा पूर्ण, करणे राजाचें कर्तव्यच असते, असे पटवून देऊन शर्मिष्ठा गांधर्व विवाह पद्धतीने ययातीशी विवाहबद्ध होते. शर्मिष्ठेला ययातीपासून धर्मविधीने 'द्रुहयू', 'अनु' व 'पुरू' ही तीन अपत्ये होतात. देवयानीला मात्र दोनच 'यदु' आणि 'तुर्वसु' ही मुले होतात. येथेही पुन्हा तत्कालीन संकेतानुसार सवतीमत्सर उफाळून येतो. मुलांची संख्या हे सवती मत्सराला कारण होते. ययातीच्या चेहऱ्याशी असलेल्या साम्यातूनच देवयानी शर्मिष्ठेला ययातीपासून मुले झाल्याचे ओळखते. शरीरविज्ञानाच्या, क्षेत्रातील नैसर्गिक सत्याचा मनोज्ञ आविष्कार महाभारतात आहे, हे येथे लक्षात येते. हा उलगडा जास्त सुसंगत व पटण्याजोगा आहे.

या एकूण प्रकाराने देवयानीचा प्रकोप ओढवतो आणि ती

---

[16] ययाती उपाख्यान : महाभारत : आदिपर्व, अध्याय (१७ ते २५) पृ. १८७

ययातीला, शुक्राचार्यांकडून वार्धक्य प्राप्तीची शिक्षा देवविते. ययातीची प्रवृत्ती लक्षात घेता त्याच्यासाठी या शापाहून अन्य कोणताही शाप भयानक असू शकत नाही. शेवटी 'ही जरा आपल्या कुलातील माणसाला देता येईल' हा उःशाप शुक्राचार्य देतात. या कसोटीला फक्त त्याच्या प्रिय शर्मिष्ठेचा 'पुरू' उतरतो. तोच पुढे राज्याधिकारी होतो. त्यावरूनच या वंशाला 'पुरू' हे नाव मिळालें आहे. देवयानीच्या तृप्तीसाठीच ययातीने हे तारुण्य पुन्हा मिळविलेले असते. पुरू शिवाय अन्य चारही पुत्रांना ययाती शाप देतो.[16]

## 'ययाती' कादंबरीची जन्मकथा :–

वि. स. खांडेकरांना मनापासून पुराणकथेंचे आकर्षण आहे. आपल्या साहित्यात ते पौराणिक रूपके–प्रतीके आणि दृष्टांतांची योजना सर्रास करतात. त्यांच्या प्रतिभाविश्वातूनही हेच जाणवते. इ. स. १९५९ साली खांडेकरांनी 'ययाति' कादंबरी लिहिली असली तरी हे ययातीउपाख्यान १९१४ सालापासूनच त्यांच्या मनात रूजलेले होते. म्हणजे १९१४ ते १९५९ या ४५ वर्षांच्या कालावधीत त्यांच्या मनात या विषयाचे चिंतन चालू होते असे दिसते. म्हणूनच 'ययाति' ही खांडेकरांच्या प्रतिभेचा एक परिपक्व आविष्कार आहे. या प्रदीर्घ चिंतनाच्या कालावधीत ययाति कथेची भिन्न भिन्न रूपे त्यांना जाणवली आहेत.

खांडेकरांना महाविद्यालयीन जीवनात 'अभिज्ञान शाकुन्तलम् ।' अभ्यासाला होते. सासरी जाणाऱ्या शकुंतलेला कण्वाने दिलेला 'ययातीला शर्मिष्ठा जशी प्रिय झाली तशी तू आपल्या पतीला प्रिय हो!'[17] हा आशीर्वाद त्यांच्या मनात ठसला. कालिदासाच्या या उक्तीचे त्यांनी सखोल चिंतन केले. या चिंतनातून ययाती–शर्मिष्ठेची प्रेमकथा त्यांना

---

[17] ययातेरिव शर्मिष्ठा भर्तुर्बहुमता भव ।
सुतंत्वमपि सम्राजं सेव पुरूमवाप्नुहि ।।
अभिज्ञानशाकुन्तलम् : कालिदास : अंक ४ : श्लोक ७
: सं. अ. बा. गजेंद्रगडकर, १९३४ (पृ. ८८)

उलगडली. पण १९४२ नंतरच्या चिंतनाने या प्रणयकथेचे रंग पुन्हा बदलले. प्रारंभी शर्मिष्ठेची प्रणयकथा म्हणून ही कादंबरी लिहिण्याचा त्यांच्या मनाचा कौल होता, पण नव्या परिस्थितीने त्याला कलाटणी मिळाली. वि. स. खांडेकरांना दोन महायुद्धानंतर बदललेल्या परिस्थितीची, यंत्र, विज्ञान आणि अंतराळ युगातील नव्या माणसाच्या संयमविहीन सुखलोलुपतेची चाहूल लागली. माणसाच्या अनिर्बंध भोगलोलुपतेची जोड या कथेच्या चिंतनाला मिळाली. समाजात 'कच थोडे, ययाती फार' हे चित्र त्यांच्या दिव्यप्रतिभाचक्षूला दिसू लागले. या कथाबीजाला नवे धुमारे फुटले. खांडेकरांना, अनिर्बंध मनाला संयमाचा लगाम घालण्याची आवश्यकता जाणवली. त्यातूनच 'ययाति' कादंबरीचा आविष्कार झाला. पुराणकथा बरेच काही नवे सांगू शकते या जाणिवेने ययाती कथेची खांडेकर प्रणीत नवी घडण झाली.

**कथावस्तूतील बदल :-**

ययातीच्या चरित्रावरून उद्याच्या जगाचे भीषण भवितव्य जाणवावे ही खांडेकरांची अपेक्षा आहे. मनाला संयमाने आवर घालणे मानवतेसाठी इष्ट आहे, हे येथे ध्येयवादी खांडेकरांना सांगायचे आहे. 'ययाति' कादंबरीचा घाट (Form) या पार्श्वभूमीने सिद्ध केला आहे. हे खांडेकरांची ही अनुभूती ययाती उपाख्यानाशी निगडित होऊन तदाकार झाली आहे. या समरसीकरणातूनच मूळ कथेत स्वानुकूल बदल करण्याचे सामर्थ्य साहित्यिकाला प्राप्त होते. म्हणूनच खांडेकरांनी कथा नव्याने अभिव्यक्त केली. त्यासाठी स्वतःचे एक समर्थन खांडेकर देतात.

'उपाख्यान म्हणजे मूळ कथा नव्हे म्हणून तीत नक्कीच, बदल करण्याचे स्वातंत्र्य घता येईल.' पण युक्तिवादाचीही आवश्यकता नाही पुराणकथा (Myth) हव्या तशा आकार धारण करू शकतात याचा भास, कालिदास, भवभूती यांनी जणू वस्तुपाठच घालून दिला आहे. पुराणकथा ललित साहित्यिकाच्या अनुभूतीचा भाग बनली म्हणजे ययाती सारखी नवनिर्मिती संभवते.

पुराणांतल्या एका उपाख्यानांतील कथासूत्राचा आधार घेऊन

लिहिलेली 'स्वतंत्र कादंबरी' असे जे खांडेकरांनी या कादंबरीचे वर्णन केले आहे त्या स्वतंत्रतेचा प्रत्यय 'ययाति' मधून येतो.

सुखोपभोगाकडे धाव घेणारा, कामुकांचा प्रतिनिधी बनलेला, शर्मिष्ठेच्या सौंदर्याला, सुरेख आवाजाला आणि उदात्त प्रेमाला भाळलेला, आसक्तीचा प्रतीक 'ययाती' उदात्त, उत्कट, जिवापाड प्रेम करणारी, समर्पणशील वृत्तीची गुणी 'शर्मिष्ठा'; गर्विष्ठ, दुष्ट आणि अहंकारी 'देवयानी'; परिणत प्रज्ञ, धीरोदात्त, कमालीचा ध्येयनिष्ठ एकाग्र-चित्ताचा पण सहृदयतेने प्रेम जागविणारा 'कचदेव' अध्यात्माच्या अतिरेकाने बेताल झालेला 'यती'; या साऱ्या व्यक्तिरेखा खांडेकरांच्या 'ययाति' कादंबरीत नव्याने साकार झाल्या आहेत. कच, यती यांना वि. स. खांडेकरांनी नव्याने महत्त्व दिले आहे.

## खांडेकरांचा प्रतिभेचास्पर्श :-

'ययाति' कादंबरीमध्ये खांडेकरांच्या प्रतिभेचा स्पर्श कथानकातील कलात्मक बदलातून, नव्या कल्पकतेतून आणि शृंगार या रसराजाच्या निर्मितीतून जाणवतो.

खांडेकरांची 'ययाति' कादंबरी ही आधुनिक माणसाच्या नव्या आकांक्षेची कथा आहे.

खांडेकरांनी कच-देवयानी उपाख्यान आणि ययाती-शर्मिष्ठा उपाख्यान प्रथमतः नव्याने एकत्र गुंफले आहे. त्यामुळे कादंबरीचा विस्तार वाढला व कक्षा रूंदावल्या शिवाय खांडेकरांना कलांतर्गत सुसंगती प्रस्थापित करता आली. या अनुभवाला त्रिविध परिमाणे प्राप्त करुन देता आली. महाभारत उपाख्यानाच्या निमित्ताने एक प्रचंड जीवनानुभव व्यक्त करणारी ही कादंबरी झाली.

शर्मिष्ठेला कचाविषयी वाटणारे उत्कट अनोखे प्रेम, नव्यानेच येथे आले आहे, ते स्वाभाविक वाटते कारण शुक्राचार्यांच्या आश्रमात कच, देवयानी, शर्मिष्ठा सगळेच एकत्र वावरले आहेत. 'सगळ्याच

काही राजकन्या जन्मत नाहीत' या खांडेकरांच्या पोक्त विचाराने या कादंबरीत शर्मिष्ठा दास्य पत्करते. शुक्राचार्यांचा 'देव' कचाने विद्ध केला आहे. 'मनात प्रथम रुजलेले प्रेमच खरे' या कल्पनेने कचाला देवयानी या कादंबरीत शेवटी कां होईना पण मानते.

शर्मिष्ठा देवयानीला वस्त्रांच्या अदलाबदलीतून निर्माण झालेल्या भांडणाच्या झटापटीत विहिरीत ढकलते, नव्हे, ती ढकलली जाते. खांडेकरांनी केलेल्या या बदलातून शर्मिष्ठेविषयीची सहानुभूती व्यक्त होते. देवयानीला सोडून ती निघून जाते. यापुढील गोष्टीविषयी खांडेकर मौन पाळतात.

आकाशात दोन विजा एकदम येऊन आपटाव्यात तशी सासू सुनेची पहिली चकमक, ययातीची आई, शर्मिष्ठेला मैत्रीण म्हणते. त्यावरून झडते. ही चकमक देवयानीच्या स्वभावाविषयी पुष्कळसे सुचवून जाते. तिचा अहंकार येथे स्पष्ट होतो.

राजवाड्यात नव्याने आणलेला ज्योतिषी आणि त्याने उठवून दिलेले काहूर मोठे लक्षणीय आहे. 'देवयानी व शर्मिष्ठा दोघींनाही पुत्र प्राप्ती होईल पण त्यात शर्मिष्ठेचा पुत्र सिंहासनाधिकारी होईल' असे भाकीत करून तो ज्योतिषी निघून जातो. पण त्याचे पडसाद कादंबरीभर उमटतात ययाती-देवयानीच्या मधुमीलनाच्या पहिल्याच रात्री केवढी दाणादाण होते. शर्मिष्ठेला तबकात विडे घेऊन उभे केल्याचा तो तळतळाट असावा असे वाटते. कारण शर्मिष्ठा ही एक सोशिक, अतृप्त प्रणयिनी होती. देवयानीच्या मद्याविषयीच्या तिटकाऱ्याने ययाती-देवयानी संबंध दुरावतात. खाडिलकराच्या 'विद्याहरणातील शुक्राचार्यांच्या मदिरासंप्रदायातील' ही देवयानी नाही. तिचा मद्याविषयीचा हा तिटकारा मूळकथेत एवढा तीव्र नाही.

ययातीला देवयानी ओवाळणार एवढ्यातच दूत येऊन शुक्राचार्यांचा निरोप सांगतात. शेवटी मुहूर्त टळू नये म्हणून ययातीची आई शर्मिष्ठेला ओवाळण्यास सांगते. शर्मिष्ठेच्या मनःपूर्वक ओवाळण्यानेच

खरी ययातीची प्रेमाची तहान भागते. एक अप्रतिम कलात्मक प्रसंग खांडेकरांच्या प्रतिभेने येथे निर्माण केला आहे. 'कीचकवध' नाटकात कीचकाला सैरंध्री ओवाळते आणि नंतर कीचक सैरंध्रीचा घास घेतो. प्राचीन कालखंडात स्त्रियांच्या या ओवाळण्यात मोठी सूचकता होती. तोच अर्थ येथे व्यक्त झाला आहे. तो पत्नीचा अधिकार असतो. स्निग्ध ज्योतीच्या प्रकाशात, लावण्यवती शर्मिष्ठा अधिकच उजळते. पुढील कथाभागात देवयानीच ययातीला श्रृषीचे सोंग वठवायला लावून शर्मिष्ठेचा सूड घेऊ इच्छिते पण या कृत्याने आपल्या स्वतःच्याच पायावर धोंडा पडणार हे तिच्या गावीही नाही. ययाती भुयारमार्गाने येऊन शर्मिष्ठेला भेटतो ही खांडेकरांची स्वतंत्र प्रसंग-निर्मिती आहे. या योजनेने प्रणयिनी शर्मिष्ठा सारे नशिबाचे भोग भोगूनही 'सारे भरून पावते.' यदु आणि दस्यु यांच्यातील युद्ध, त्यातून पुरु, यदुची सुटका करतो हा प्रसंगही खांडेकरांच्या स्वतंत्र कल्पनेतून निर्माण झाला आहे. त्यामुळे शेवटी देवयानी द्रवते आणि शर्मिष्ठेशी सख्य जोडण्याचा प्रयत्न करते, यदूच्या पराभवाच्या वार्तेने महाराणीपदापेक्षा मातृत्वपद देवयानीला महत्त्वाचे वाटते. वि. स. खांडेकरांनी या चित्रणात देवयानीचा दारूण पराभव साकार केला आहे. कादंबरीचा शेवट संपूर्णपणे खांडेकरांचाच आहे. या सर्व खांडेकरकृत बदलांना कलांतर्गत न्यायात संगती आहे.

## स्वतंत्र कल्पकता :-

वि. स. खांडेकरांच्या प्रतिभेने हे असे विपुल बदल महाभारतातील ययाती उपाख्यानात केले आहेत. या ठिकाणी ते बदल लक्षात घेतल्यानंतर आता खांडेकरांच्या स्वतंत्र कल्पकतेचा विलास आणि त्यांनी या कादंबरीत केलेला शृंगाररसाचा आविष्कार येथे पहावयाचा आहे. खांडेकरांनी एकूण संपूर्ण ययाती उपाख्यानाची नवी संगती लावली आहे. नवी उभारणी केली आहे.

या कादंबरीतील शुक्राचार्य कच ययाती यांच्या आगमनाने व पुनरागमनानेही कलात्मकतेचा प्रत्यय येतो. या कादंबरीची निवेदनशैली

ययाती उपाख्यानाच्या नव्या मांडणीला अपूर्व यश मिळवून देते. एवढी अजोड कल्पकता, खांडेकरांच्या या पात्रमुखी आणि तरीही एकसंध अनुभवाचा प्रत्यय देणाऱ्या निवेदन-पद्धतीत आहे. नंतर मराठी ललित साहित्यात या निवेदन पद्धतीचे जे अनुकरण झाले त्यात विस्कळित-पणाचा दोष आढळतो. खांडेकरांच्या ययातीसारखा एकात्म अनुभवाचा प्रत्यय 'मृत्युंजय' कादंबरीतून येत नाही. खांडेकर जागोजाग व्यक्तींचें मनोविश्लेषण करतात ते मोठे मनोवेधक आणि लक्षणीय झाले आहे. स्वतंत्र प्रतिभाशक्तीचा येथे विलास दिसतो. ययातीचे बालमन, शर्मि-ष्ठेची गर्भावस्था त्यावेळची तिची मनःस्थिती, 'पुरू'च्या जन्मानंतरची जाणीव सारेच अपूर्व आहे. या खांडेकरकृत बदलातून आणि स्वतंत्र कल्पकतेतून महाभारताची अनेक अंगानी वाढ झाली असे लाक्षणिक अर्थाने म्हणता येते. ययातीला बालपणापासून असलेला फुलांचा ह्व्यास कामीवृत्तीचा द्योतक आहे, शृंगारानुभवाची सूचना देणारा आहे. 'आईने मुलाला पाजायचे असते' हा या ययातीच्या बालमनाचा सरळ हिशेब आहे. 'यती' गमावल्याचे आईचे दुःख ययातीला उमगते म्हणूनच कोवळा ययाती प्रवृत्तीवर जीवन जगण्याची प्रतिज्ञा करतो. हळुवार नाजुक मनाचे हे विश्लेषण निःसंशय कलात्मक आहे. साध्या पक्षिणीच्या वधाने हळहळणारा ययाती भोगाचे, शक्तीचे तत्त्वज्ञान हळूहळू पचवितो.

शर्मिष्ठा आपण आई होणार या कल्पनेने सुखावते. तिच्या विविध भाव-भावनांवर येथे लक्षणीय प्रकाशझोत खांडेकरांनी नव्याने टाकला आहे. महाभारतातील व्यक्तींच्या मनातील धागेदोरे येथे नीट उलगडतात. त्यांच्या व्यक्तित्त्वाच्या, गाभ्याला स्पर्श होतो आणि महाभारत फुलते ते अशा ठिकाणीच. ययातीने पुरूचे चुंबन घेतल्यानंतर पुन्हा पुरूचे चुंबन घेतलेल्या शर्मिष्ठेला आनंदात न्हाल्यागत वाटते. 'पुरू'चा एकाक्षरी 'त-त' मंत्र (तात सूचक) देवयानीसमोर चालू होताच शर्मिष्ठेला धस्स होते. क्रूर देवयानी काय करील याचा नेम नाही हा थरारक प्रसंग कल्पनेचा विलास आहे. माणसाच्या 'माणूसपणा' चे चित्रण आहे.

ययातीला समोरचा 'आरसा' डोक्यातील पहिला पांढरा केस

दाखवितो. 'भाऊबंदकी' नाटकासारखाच हा आरसा येथे काम करतो. ययातीला त्या पांढऱ्या केसामुळे आपल्या वार्धक्याची जाणीव होते. आवश्यकतेनुसार पात्र योजना होते. येथे फक्त 'यदू' आणि 'पुरू' या दोन मुलांचाच उल्लेख खांडेकरांना पुरेसा वाटतो. कविगत न्यायात आणि काव्यात्म अनुभवात जेवढे बसते तेवढेच त्या साहित्यिकाचे भाव-विश्व असते याचा प्रत्यय पौराणिक साहित्यकृतीत नेहमीच येतो. शिरवाडकरांच्या 'ययाति आणि देवयानी' या नाटकात शुक्राचार्य पुन्हा येत नाही. देवयानीत शाप देण्याचे सामर्थ्य आहे. 'ययाति' कादंबरीचा शेवटही असाच खांडेकरकल्पित आहे.

कच 'पुरू'चे वार्धक्य दूर करतो. पुरू यदूला राज्य देतो या सख्याच्या कल्पनेने देवयानी विरघळते शेवटी सगळा आनंदीआनंद होतो. देवयानी-शर्मिष्ठा ययातीची सेवा पंख्याने वारा घालून आणि पाय दाबून करीत असल्याचे चित्रित केले आहे. येथेही सवतीमत्सर नको म्हणून या कामात सूचक अदलाबदल करतात कादंबरीच्या शेवटी पुरूच्या त्यागानेच कुरूवंश झाला असे सांगितले आहे.

वि. स. खांडेकरांनी या कथानकाचा एक धागा आपल्या कल्प-कतेने ययातीचा पूर्वज 'नहुष' याच्या अतृप्तीशी आणि उद्दामपणाशी जोडला आहे. 'कर्णायन' मध्ये गो. नी. दांडेकर यांनी जसा कर्णाचा संबंध दुर्वासाशी प्रस्थापित केला, तसा येथे नहुष कथेचा कलात्मक संबंध खांडेकरांनी प्रस्थापित केला आहे येथे ययाती नहुषाचा वारस शोभतो

या असंख्य कल्पनाचित्रांनी खांडेकरांची ययाति कादंबरी एक 'स्वतंत्र' कादंबरी होते. महाभारतातील ययातीकथेचे एक अमर विकसन म्हणून 'ययाति' कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.

## शृंगारिक कल्पनांची पखरण :-

खांडेकरांनी 'ययाति' कादंबरीत रसराज शृंगाराचा आविष्कार स्वतंत्रपणे केला आहे. कामी ययातीच्या चित्रणासाठी या रसाचा परिपोष त्यांना आवश्यक वाटला असावा. या कादंबरीतील व्यक्तींचे

भावविश्व लक्षात घेता असे होणे अपरिहार्य होते असे वाटते.

'ययाति' कादंबरीतील कचाला त्याग प्रिय आहे. तर ययातीला लहानपणापासून फुलांचा हव्यास आहे. पुढे हाच ययाती रतीच्या रमणीय मूर्तीची लाख चुंबने घेणारा ययाती होतो. आपल्या वडिलांच्या मृत्यूचे दुःख विसरण्यासाठी तो मुकुलिनाला जवळ घेतो. 'कोण कुणाच्या मिठीत हे मदनालाही सांगता येणार नाही.' असे त्यांच्या घट्ट मीलनाचे वर्णन खांडेकर करतात. युवतीच्या मधुर उन्मादक सहवासाने आलेली ती मधुर मूर्च्छा असते. खांडेकरांनी या कादंबरीत 'माधव' च्या भावाचे काव्य वाचण्याच्या निमित्ताने मनसोक्त कल्पनांची सुंदर वलये निर्माण केली आहेत. 'गालावरची लाली लज्जेतून उद्भवत नाही, तर विर–हिणीच्या, जागरणाने लाल झालेल्या डोळ्यातील लाली प्रियदर्शनाने आलेल्या आनंदाश्रुतून गालावर ओघाळते अशी ही मनोरम शृंगारिक कल्पना आहे. येथे 'रजनीस्तोत्र' ही असेच आलेले आहे. देवयानीला विहिरीतून वर काढतानाही तिच्या ओलेतीच्या रूप सौंदर्याचे आणि युवराजांच्या प्रणयाचे चित्र रेखाटले आहे.

देवयानी आत्मकेंद्रित आहे. ती स्वतःसाठी जगते. ययातीचे देवयानीशी म्हणूनच बिनसते. 'एकवेळ खायला मिळाले नाहीतरी चालेल, एकमेकांच्या ओठातल्या अमृतांवर जगू' असे सांगणारी मैत्रीण राजा ययातीला हवी होती. ती शर्मिष्ठेच्या रूपात त्याला मिळाली आणि त्यांचा 'विडा' चांगलाच रंगला आहे. या कादंबरीत शृंगाररसाची खांडेकरांनी केलेली ही पेरणी ययातीच्या भोगी, सुखलोलुपतेच्या चित्रणासाठी आवश्यक होती म्हणूनच एवढ्या विस्ताराने ती या ठिकाणी चित्रित झाली आहे. 'मधाचा आस्वाद घेतांना, मधमाशांचे मोहळ उठते.' ययातीला, त्याच्या कामीवृत्तीने त्याच्याबद्दल उठलेल्या अशाच एका मोहळाला तोंड द्यावे लागले. ययाती महाराजांच्यासाठी सूर्यफूल झालेली शर्मिष्ठा 'ययाती–शर्मिष्ठा' प्रेमाचा साक्षात्कार घड–विणारी आहे. 'सूर्यफूल' होऊन ती या सूर्याची आराधना करते तर दुसरीकडे 'झुळझुळते पाणी गोठून जावे अशी देवयानी माझ्या बाहु–

पाशात भावशून्य का बनते? ' हे ययातीचे दुःख आहे. समर्थ अर्थवान प्रतिमांच्या योजनेतून 'ययाति'त खांडेकरांच्या प्रतिभेचा आविष्कार झाला आहे.

## समाजचिंतन व जीवनदर्शन :–

खांडेकर हे समाजाचे लेखक आहेत. त्यांच्यातील शिरोड्याचा शिक्षक सदैव जागृत असतो. आणि तोच त्यांच्या साहित्याला समाज चिंतनाच्या आविष्कारांची प्रेरणा देतो. 'ययाति' कादंबरीच्या निर्मिती प्रेरणेत व त्यांच्या प्रबोधन कार्याची आणि मानवी जीवनदर्शनाच्या तळमळीची कल्पना येते. पायाखालची वाट दिसत नाही तेव्हा शुक्राच्या चांदणीची सोबत महत्त्वाची मानणारे खांडेकर आहेत.

समाजात 'कच थोडे, ययाती फार' ही स्थिती जेंव्हा त्यांच्या लक्षात येते तेंव्हा ते कचाच्या निमित्ताने संयमाचे आणि ययातीच्या निमित्ताने मानवी भोगवादी प्रवृत्तीचे चित्रण करतात. या प्रतीकातून त्यांना 'शरीर भोगासाठी आहे पण जागृत आत्म्याचे बंधन त्याला असले पाहिजे' असे सांगावयाचे आहे. या जगात गोड फळांनाच कीड लागण्याचा संभव अधिक असतो म्हणून ते सावधानतेची सूचना देतात. धर्माचे उल्लंघन न करणाऱ्या मर्यादित भोगात पाप नाही. सगळेच जीवनात सुसंयत असावे हे मार्मिक जीवनविषयक तत्त्वज्ञान येथे खांडेकर व्यक्त करतात. ययातीचे चित्रण प्रत्यक्ष जीवनातील अनुभूतीशी संलग्न आहे तर कच त्यांच्या ध्येयवादी स्वप्नाशी निगडित आहे. एकीकडे फुलांना हुगत सुटणारा 'ययाती' तर दुसरीकडे कोमेजणाऱ्या फुलांना पुन्हा उमलविणारा उदात्त 'कच' आहे. त्यांना मानवी जीवनातील वासना ही एखाद्या महापुरासारखी आणि भावना शरदऋतूतील संथ नदीसारखी भासते. देव आणि नियतीपेक्षाही माणसाचा शत्रू माणूसच असतो, त्या माणसातील पशू असतो. या गोष्टीवरील खांडेकरांचा विश्वास येथे व्यक्त होतो. नियतीचे सर्वत्र स्तोम माजवून माणसाची प्रत्येक गोष्टीतील असहायता व्यक्त करणाऱ्यांना त्यांनी या कादंबरीत चोख उत्तर दिले आहे.

निरपेक्ष प्रेम ही आत्म्याच्या विकासाची पहिली पायरी आहे याच दिशेने जीवनाची वाटचाल करायला पाहिजे. 'त्याच्या जागी आपण आहोत' अशी क्षणभर कल्पना केली तर दुसऱ्याच्या सुखदु:खाशी समरस होता येते. विचारांच्या साहाय्याने विकारावर विजय मिळवावा. काम आणि अर्थ हे महान प्रेरक पुरुषार्थ आहेत पण धर्माच्या हाती लगाम असावा. त्यासाठी एक रूपक या कादंबरीत अतिशय प्रभावीपणे योजिले आहे. उपनिषदात हे मूळात आलेले आहे. आत्मा रथी, शरीर रथ, बुद्धी सारथी, मन लगाम, 'रथाचें घोडे इंद्रिय' आणि वाटा 'उपभोगाच्या' अशी ही कल्पना आहे. 'इंद्रिय रूपी घोड्यांना मनाचा लगाम असला पाहिजे तो लगाम बुद्धिरूपी सारथ्याच्या हाती असावा. बुद्धी आणि मन यांनी मिळून संयमाने हा शरीररूपी रथ चालवावा लागतो. अन्यथा भोगाच्या धुंदीत हा लगाम निसटून इंद्रियरूपी घोडे, उपभोगाच्या वाटेवर उन्मादाने उधळून रथाचा, रथ्याचा आणि सारथ्याचा बरोबरच चक्काचूर होतो.

रक्ताची वाघाला जशी चटक असते तशी काम भावनेची चटक माणसाला लागते. जस जशा जास्त आहुती पडत जातात तसतसा कामाग्नी भडकतच जातो.

वि. स. खांडेकरांना या कादंबरीतून 'मंदार'च्या फुलपाखरा-सारख्या क्षणभंगुर, चालू क्षणाच्या अध:पाताच्या तत्त्वज्ञानापेक्षा कचाचे गरुडाचे अमृतकुंभ मिळविणारे तत्त्वज्ञान येथे पटवून द्यावयाचे आहे. खांडेकरांची 'ययाति' कादंबरी 'एकाच वेळी भावनात्मक आवाहन करते मानवीजीवनाचे दर्शन घडविते, समाजाला सुयोग्य शिकवण देते. आणि कलात्मक रंजनही करू शकते.' हे सामर्थ्य या महाभारतातील उपाख्यानाच्या स्वतंत्र चिंतनातून निर्माण झाले आहे. त्यातील व्यक्ती जिवंत आणि प्रतीक बनून अवतरलेल्या आहेत.

ययातीची भोगकथा, शर्मिष्ठेची प्रेमकथा, देवयानीची संसारकथा आणि कचाची त्यागकथा या कादंबरीत साकार झाली आहे. खांडेकरांना कामवासना, कामभावना, प्रीतिभावना आणि भक्तिभावना असे हे

एकाच भावनेचे परिणत होत जाणारे रूप येथे आढळते. ययातीच्या रूपात आसक्तीकडून विरक्तीकडे जाणारा दीपस्तंभ त्यांनी उभा केला आहे. मानवतेसाठी या मूल्यांची प्रतिष्ठापना होणे अगत्याचें आहे, असे खांडेकरांनी सूचित केले आहे. खांडेकरांचे हे चिंतन समकालीन, वर्तमानकालीन तर आहेच, पण त्याबरोबरच कालातीतही आहे. मानवी प्रवृत्तीवर ययाती उपाख्यानातून शोधलेल्या सूत्राच्या आधाराने खांडेकरांनी येथे प्रकाश टाकला आहे.

कथा, काव्य, मनोविश्लेषण आणि तत्त्वज्ञान यांच्या मनोज्ञ मीलनाचा अपूर्व सांक्षात्कार या पुराणकथेतून खांडेकरांनी घडविला आहे. पुराणकथेचे एका प्रतिभावंत मनाने केलेले हे सर्जन पाहिले म्हणजे महाभारताचे मराठी ललित साहित्यिकांनी केलेल्या नव्या आविष्काराचे मोल लक्षात येते. ययाती उपाख्यानातील एकेका व्यक्तीत खांडेकरांनी नवा प्राण भरून त्या नव्या काळाच्या संदर्भात पुन्हा जिवंत केल्या आहेत

स्त्रीत्वाचा एक समर्थ आविष्कार देवयानीच्या रूपात येथे प्रगट झाला आहे. स्वत:साठी आत्मकेंद्रित वृत्तीने जगण्यापेक्षा दुसऱ्यासाठी जगण्यातच खरा आनंद आहे. 'प्रपंच हा यज्ञ आहे. प्रीती, वात्सल्य, कारुण्य हे तुमचे ऋत्विज आहेत. निरपेक्ष प्रेमाचे बोल हे तुमचे मंत्र आहेत सेवा, त्याग, भक्ती या तुमच्या संसारयज्ञातल्या आहुती आहेत.' प्रापंचिकांना ययाती-देवयानीच्या कथेच्या निमित्ताने कचाच्या मुखाने खांडेकरांनी हा संदेश दिला आहे.

कार्लमार्क्स, फ्राइड, महात्मा गांधी या विचारवंताच्या विचारांच्या संस्काराने संस्कारित झालेले खांडेकरांचे संपन्न व्यक्तिमत्त्व आहे. म्हणूनच 'ययाति' कादंबरीत चिरंतन तत्त्वज्ञानाचा वेध घेणारे, ययाती उपाख्यानाचे चिंतन कलात्मकतेच्या पातळीवरून अभिव्यक्त झाले आहे. महाभारतावर आधारित साहित्यकृतींमध्ये नव्या समर्थ आविष्काराचे मानाचे स्थान 'ययाति' कादंबरीला यासाठी द्यावे लागते.

## व्यक्तिचित्रणातील स्वातंत्र्य :-

'ययाति' कादंबरीत ययाती, देवयानी, शर्मिष्ठा या महत्त्वाच्या

व्यक्तिरेखांना खांडेकरांनी पुरेपूर स्वातंत्र्य घेऊन रेखाटले आहे. अन्य पात्रांच्या चित्रणातही त्यांनी मुक्त स्वातंत्र्य घेतलेले दिसून येते. 'संजीवनी विद्येचे हरण करून देवलोकी गेलेल्या महाभारतांतील 'कच' पुन्हा आपल्याला कधीच भेटत नाही! पण या कादंबरीत 'मी त्याचें उत्तर चरित्र अर्थात काल्पनिक चित्रित केले आहे.' असे खांडेकरांनी स्वतःच पार्श्वभूमीत नमूद केले आहे. हा कच प्रेमाच्या एका श्रेष्ठ रूपाचा प्रतिनिधी म्हणून येथे चित्रित केला आहे.

कादंबरीत देवयानी आणि शर्मिष्ठा या दोन नायिका आहेत. म्हणून नायकही दोन असावेत, या समजुतीतून कचाचे उत्कट चित्रण येते. खांडेकरांनी 'कच' ध्येयवादी, विचारी, संयमी तरूण म्हणून साकार केला असला तरी त्याच्या मनात देवयानीविषयी निरपेक्ष प्रेम असल्याचे चित्रित केले आहे. हे उदात्त प्रेम येथे कचाचा स्वभावधर्म झाले आहे. 'विद्याहरणा' मध्ये नाटयाचार्य खाडिलकर अशाच उदात्त व निरागस प्रेमाचे चित्रण कचदेवयानीच्या प्रणय प्रसंगातून करतात. विद्याहृणाच्या पहिल्या अंकातील अखेरचा प्रवेश आणि दुसऱ्या अंकातील मध्यभाग या प्रणयरंगांनी रंगलेला आहे.

खांडेकरांच्या ययातीतील कचाने आपल्या विफल स्त्री प्रेमाचे विशाल मानव प्रेमात रूपांतर केले आहे. एक विकसित आत्मा म्हणून खांडेकरांचा कच अवतरला आहे. तो आत्मविकासाची धडपड करणाऱ्या मानवाचा प्रतिनिधी आहे, तर ययाती अष्टौप्रहर सुखभोगण्याच्या निराधार नादात आत्मलोपाला प्रवृत्त असलेल्या मानवाचा प्रतिनिधी आहे. महाभारतातील ययाती बिचारा, पापभीरू आहे. त्याला शर्मिष्ठेची शय्यासोबत करताना शुक्राचार्यांच्या सूचनेची आठवण होते. शर्मिष्ठेच्या युक्तिवादाला तो सामोरा जातो. पण खांडेकरांची 'ययाती'च्या रूपातील अनुभूतीच नवी आहे. 'आधुनिक मानवाचे मन हा एक अतृप्त, हिंस्त्र प्राण्यांनी भरलेला अजबखाना बनत चालला आहे.' म्हणूनच त्यांचा ययाती, महाभारतातील ययातीपेक्षा भिन्न स्वरूपात आविष्कृत झाला आहे. या व्यक्तींची मनोभूमिका जाणून घेऊन खांडेकरांनी त्यांना नवे अर्थ दिले आहेत.

## नवा आविष्कार :-

काळाच्या परिवर्तनाबरोबर मानवाचे चित्रही बदलते आणि बऱ्याच अंशी स्थिर असते. आज पुराणकाळ बदलला असून त्या काळातील व्यक्ती जशाच्या तशा आढळत नाहीत. महाभारत हे मानवी जीवनाचे व संस्कृतीचे संचित आहे. हे जीवनावरील प्रचंड भाष्य आहे. या संस्कृति-संचिताला एक सतत वाढ आहे म्हणूनच आजच्या काळातील नव्या माणसाचा साक्षात्कार या महाभारताच्या एक उपाख्यानातील व्यक्तीतही घडू शकतो. 'ययाति' कादंबरी हे यांचे उत्तम उदाहरण आहे.

मानवी जीवनाच्या चिरंतन मूल्यांचा आविष्कार महाभारतात आहे. त्या मूल्यांचा शोध घेत घेत नव्या अनुभूतीतून नवी साहित्यकृती जन्माला येते. खांडेकरांनी 'ययाति' त हाच मार्ग स्वीकारला आहे. कामयज्ञ आरंभून अधिक प्रज्वलित होणारा 'ययाती' आणि स्त्रीसुखाची इच्छाच नसलेला 'यती' यांचे चित्र विरोधाने अधिक खुलले आहे. 'कचा' ला खांडेकरांनी स्वतःच्या कल्पनेप्रमाणे रूप दिले आणि कादंबरीत महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. भवितव्याचे चित्र कचाच्या स्वरूपात ते पाहतात. कलानिर्मितीचा व्यवहार ही एक सांस्कृतिक गरज आहे. रंजन, उद्बोधन, कलात्मकता यासाठी पुराणकथा सतत योजिल्या जातील हे 'ययाति' सारख्या साहित्यकृतीनेच स्पष्ट झाले आहे. तथापि कलाकृतीचा ज्ञात हेतू कोणताही असला तरी ती कक्षा ओलांडून साहित्यकृतीने कलात्मक असायला हवे. 'ययाति' कादंबरीने ज्ञात हेतूंना पार करून त्या पलिकडील नवा कलात्मक आविष्कार महाभारतातील ययाती उपाख्यानाच्या आधारे केला आहे

## वि. वा. शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी' :-

कलानिर्मिती ही एक अंतःस्फूर्त आणि गूढ प्रेरणा आहे हे लक्षात घेतले म्हणजे महाभारतातील ययाती उपाख्यानावर आधारित वि. स. खांडेकर आणि वि. वा. शिरवाडकर यांनी केलेल्या नवनिर्मितीची कल्पना येते. वि. वा. शिरवाडकरांनी आपले नाटक खाडेकरांच्या 'ययाति' कादंबरीवर आधारित आहे असा निर्वाळा स्वतः प्रस्तावनेत

दिला असला तरी त्यात शिरवाडकरांच्या प्रतिभेचे विशेष जाणवल्या-शिवाय राहत नाहीत.

'या नाटकासाठी महाभारतातील मूळ कथानकात काही महत्त्वाचे फेरबदल केले आहेत. नाटकासाठी जे कार्यकारी सूत्र मी गृहीत धरले त्याच्या परिपोषासाठी हे बदल मला आवश्यक वाटते. पौराणिक कथा या बहुतांशी काल्पनिक कथा असतात साहित्यिकाने त्यातील आपल्याला उत्कटतेने जाणवते, तेच सूत्र घेऊन त्याच्याशी सुसंगत असा नवा तपशील त्याच्याभोवती उभारावा अथवा मुळात असलेला परंतु विसंगत असा तपशील गाळावा, बदलावा यात काहीही वावगं नाही आणि नवीनही नाही.' 'ययाति आणि देवयानी' या नाटकाच्या प्रस्तावनेत शिरवाड-करांनी मांडलेल्या या भूमिकेवरून त्यांचा महाभारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. 'ययाति' कादंबरीने त्यांना नाट्यलेखनास स्फूर्ती आणि पुष्कळसा आधार दिलेला आहे' हे त्यांनी प्रांजलपणे मान्य केले असले तरी 'ययाति आणि देवयानी' नाटकात वि. वा. शिरवाड-करांच्या स्वतंत्र प्रतिभाशक्तीचा प्रत्यय येतो. प्रत्येक साहित्यकृतीचे एक स्वतंत्र खास स्वत:चे असे वास्तव असते आणि हे वास्तव निर्माण करण्यात प्रस्तुत नाटककाराला यश लाभले आहे.

## काळोखात प्रकाशरेखा :-

शिरवाडकरांना काळोखात एखादीतरी प्रकाशरेखा आढळतेच आणि ती शोधण्याचा त्यांचा प्रयत्न असतोच. ययाती उपाख्यानाशी समरस झालेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वि. स. खांडेकरांप्रमाणेच कचाच्या व्यक्तिरेखेतही प्रकाशरेखा सापडली. मग त्यांच्या सर्व चिंतनाचा प्रवास या प्रकाशरेखेच्याच दिशेने झाला त्यांना कचाच्या व्यक्तित्त्वाचे आकर्षण आहे आणि म्हणून शिरवाडकर कचाचे उदात्तीकरण करतात. 'ययाति आणि देवयानी' नाटकात वि. वा शिरवाडकरांच्या मूलतः काव्यात्म आणि चिंतनशील व्यक्तिमत्त्वाचे विशेष आढळतात. चिंतन-शील अंतर्मुख मनोवृत्ती व उत्कट, भव्यत्वाचे-दिव्यत्वाचे जबरदस्त आकर्षण असलेली त्यांची प्रतिभाशक्तीही येथे प्रत्ययाला येते.

शर्मिष्ठेविषयीची अनुकंपा आणि कचाचे व्यापक व्यक्तिमत्त्व यां जाणिवांनी आशयाला उदात्त आणि जिवंत स्वरूप येथे प्राप्त होते.

मद्यप्राशनाच्या निमित्ताने विवाहाच्या पहिल्याच 'सुहागराती' 'ययाती' आणि 'देवयानी' यांच्यात मीलनाऐवजी खटका उडतो. तें परस्परांपासून केवळ शरीरानेच नव्हे, तर मनानेही दूर जातात. देव–यानीचा अहंकार, सदाचाराचा कैफ, सत्ताधीशाची वृत्ती, ययातीचा आपल्यावर रोष ओढवून घेण्यास कारणीभूत होते.

या अनपेक्षित अपेक्षाभंगाने ययाती विमनस्क, केविलवाण्या, एकाकी अवस्थेत सापडतो. अशावेळी आपल्या नाजुक प्रणयभावांनी, लावण्याच्या मोहजालांनी, समर्पणशील एकनिष्ठ वृत्तीने 'शर्मिष्ठा' ययातीला आकर्षित करते. ययातीचे शर्मिष्ठेकडे आकर्षित होणेही येथे स्वाभाविक वाटते. 'कच' आणि 'यती' या दोन व्यक्तिरेखांच्या साहचर्यात 'ययाती' आणि 'देवयानी' या व्यक्तिरेखांच्या जीवनातील अधिकउणाभाव उल–गडतो. या व्यक्तिरेखा एकाचवेळी परस्परांशी सम–समांतर चित्रित केल्या आहेत. देवयानी आणि कच यांच्या दिव्य प्रेमाची साक्ष येथे नव्याने पटते. ययाती आपल्या कह्यातून निसटलेला पाहून असमर्थ आणि अगतिक बनलेली देवयानीच ययातीला वार्धक्याचा शाप देते. ही शिरवाडकरांच्या कल्पनेतील प्रसंग योजना असली तरी नाट्यात्म वास्तवाशी सुसंगतच आहे. तपस्वी कविराज शुक्राचार्यांची ती तेवढीच प्रखर-तेजस्वी कन्या आहे म्हणून तिच्या अंगी शाप देण्याचे सामर्थ्य असणे शिरवाडकरांना संभवनीय वाटले आहे, ते पटते. देवयानी शाप देते या प्रसंगातून शिर–वाडकरांना माणसाच्या मनाचा शोध अभिप्रेत आहे, असे वाटते. त्यांच्या या नव्या योजनेमुळे कचाच्या उत्कट आणि उदात्त प्रेमाला नव्याने अवसर मिळाला असून कचदेवयानी या अभंग समासाची प्रचीती येते. मूळ महा–भारतात अशोक वनात ययाती आणि शर्मिष्ठा यांचा गांधर्वविवाह होतो. देवयानी आपल्या पित्याकडून-शुक्राचार्यांकडून–राजा ययातीला वृद्धत्वाचा शाप देवविते. या घटना नाटकाच्या तिसऱ्या अंकात शिर–वाडकरांनी बदलून टाकल्या आहेत.

## काव्यात्म भावोत्कट नाट्य :–

शिरवाडकरांनी ययाती उपाख्यानातून एक काव्यात्म, भावोत्कट नाट्य येथे साकार केले आहे. कचाचे सात्त्विक मन आणि मनाचे उदात्तीकरण प्रथमत:च या नाटकाच्या कथानकात प्रकर्षाने प्रकट झाले आहे. येथे कचाचे भव्य उदात्त दर्शन घडते. 'ययाति आणि देवयानी' या नाटकातील कचाच्या खालील उद्गारातून याची साक्ष पटते.' कच देवी माझ्याशी पतीचं नातं जोडावं अशी तुझी इच्छा होती पण ती मला सफल करता आली नाही कोठलही बंधन नसलेलं मैत्रीचं प्रेम अनेक बंधनात ओवलेल्या वैवाहिक प्रेमापेक्षा श्रेष्ठ, फार अधिक श्रेष्ठ आहे, असं मी मानतो. हे प्रेम मी तुला—आणि फक्त तुलाच दिलं आहे. तू काहीही म्हटलंस तरी कच—देवयानी हा समास काळालाही तोडता येणार नाही. तू हे नातं मन:पूर्वक स्वीकारलं असतंस तर ययातीबरोबर तुला सुखान संसार करता आला असता, पण तसं घडलं नाही. या अलौकिक प्रेमाची जात तू जाणली नाहीस! ' (अंक ३ : पृष्ठ ५४)

देवयानीवर एवढे उत्कट प्रेम करणारा हा कच आपल्या संजीवनी विद्येचा उपयोग, याच देवयानीच्या प्रेमासाठी तिचा शाप विफल व्हावा म्हणून मुद्दाम करतो. आपल्या प्रियेचा अपकर्ष येथे त्याला पाहवत नाही, कलात्मक न्यायात हे बसणारे आहे. ययाती पुरतेपणी शर्मिष्ठेकडे आकर्षिला गेला असून त्याच्यापासून तिला मुलेही झाली आहेत. हे समजल्यावर देवयानीच्या रागाचा भडका उडतो. सर्व प्रकारची विफलता पदरी पडल्याने तिला फक्त शाप देण्याचाच मार्ग खुला राहतो. म्हणूनच स्वत:च जीवनातील उद्वेगाने ती शाप देण्यास प्रवृत्त होते. पण 'कच' एवढेसुद्धा समाधान तिला लागू देत नाही. स्वत.च्या तप:सामर्थ्याने तो देवयानीचे सारे तेज हिरावून घेतो. ह्या घटना मूळ महाभारतात नाहीत. हे सारे घडते ते फक्त शिरवाडकरांच्या 'ययाति आणि देवयानी' नाटकामध्येच. या फेरबदलाला शिरवाडकरांच्या कलात्मक जाणिवेचा कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि नाट्यात्म सुसंगतीचा आधार आहे.

## देवयानीचा शाप :-

पौराणिक सत्य बाजूला ठेवून नाट्यनिर्मितीच्या दृष्टीने शिरवाडकर देवयानीजवळ शाप देण्याचे सामर्थ्य आहे असे चित्रित करतात. एकूण नाटकाच्या संदर्भात, केवळ शाप देण्यासाठी शेवटी शुक्राचार्यांचे रंगभूमीवर आगमन दाखविणे त्यांना इष्ट वाटेना, त्यांच्या मनात देवयानी एका वेगळ्या तऱ्हेने प्रतिबिंबित झाली. त्यातून हा प्रसंग उद्भवला. देवयानी ही एका उग्र तपस्व्याच्या तालमीत वाढलेली मुलगी म्हणून शाप देण्याइतकी ती सामर्थ्यवान बनते. कल्पनाजनित कलाकृतीत या गोष्टींनाही स्थान द्यावे लागते. शरीरभोगाच्या तत्त्वज्ञानाला सामोरा जाणारा 'ययाती', अहंकारी मत्सरी 'देवयानी', निरागस प्रणयिनी 'शर्मिष्ठा', उदात्त मूल्य जोपासणारा 'कच', अतिरेकाने बेताल झालेला 'यती' या सगळ्या व्यक्तिरेखा 'ययाति' कादंबरीतील स्वभावधर्म घेऊनच येथे अवतरल्या आहेत. पण शिरवाडकरांच्या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात 'कच–देवयानी' आणि 'ययाती–शर्मिष्ठा' यांच्या उत्कट प्रणयानुभूतीचे रंगतदार चित्रण अप्रतिम केले आहे. 'ययाती आणि देवयानी' या एका काव्यात्म अनुभवाच्या लयीत, हा शिरवाडकरांनी कल्पिलेला देवयानीचा ह्या शाप प्रसंग निश्चितच बसतो. ललित साहित्यनिर्मितीची प्रक्रिया ही एक गूढ प्रक्रिया आहे. कलावंत जाणीवपूर्वक (Consciously) काहीही नवे निर्माण करू शकत नाही. त्याच्या सुप्त मनाने जे स्वीकारले. तेच येथे व्यक्त होते. या भूमिकेतून 'ययाति आणि देवयानी' नाटकाचा शेवट शिरवाडकरांनी स्वतंत्र कल्पिला आहे. नाट्यानुभवात (Dramatic Experience) हा शेवट अपरिहार्य वाटतो. महाभारतातील कथेत काही मूलगामी बदल नाटककाराने केले त्यातून मानवीमनाचे एक सुसंगत चित्र त्यांना रेखाटता आले.

भव्यतेबद्दलचे वेड, क्षुद्रतेचा तिरस्कार आणि अन्यायाबद्दल जळजळीत संताप हे कुसुमाग्रजांच्या कवितेचे विशेष त्यांच्या नाटकातून, 'ययाति देवयानी' तूनही व्यक्त होतात. म्हणूनच त्यांच्या नाटकातील व्यक्तिरेखा एका आगळ्या, भव्य अशा त्यांच्या मनाच्या मुशीत जन्मतात आणि प्रतिभाबलाने चैतन्यपूर्ण होतात. त्यामुळेच कळत–नकळत ह्या

व्यक्तिरेखा त्यांच्या त्यांच्या अर्थाची आणि प्रवृत्तींची प्रतीके बनतात. त्यामुळेही असेल, पण त्या आपापली व्यक्तित्वे हरवतात आणि लेखकाने आखून दिलेल्या अर्थाच्या आसा-भोवतीच फिरतात—वाढतात, शिरवाडकरांच्या 'ययाति आणि देवयानी' नाटकातील व्यक्तिरेखा ह्या केवळ प्रतीक न होता त्यांना स्वतःचे एक जिवंत व्यक्तिमत्त्व लाभते. म्हणूनच देवयानी शाप देते. ही घटना महाभारताला ( व ययाती कादंबरीला ) सोडून असली तरी तिच्या साकार झालेल्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहून ती अस्वाभाविक व अनाठायी वाटत नाही. महाभारतातील उपाख्यानाला एक नवा धुमारा येथे फुटलेला दिसतो आणि असे नवे नवे धुमारे फुटून मराठी प्रतिभावंतांनी महाभारत सतत पल्लवित, सुविकसित केल्याचे आढळते.

शर्मिष्ठेविषयी वि. वा शिरवाडकरांना नको तेवढी अनुकंपा वाटते म्हणून हे नाटक मूळ कथेचा आधार सोडून लिहिले असल्याचा आक्षेप उषा हस्तकांनी घेतला आहे.[18] शर्मिष्ठेविषयी वाटणारी ही अनुकंपा मुळात ययाती कादंबरीत खांडेकरांनी व्यक्त केली आहे. त्याचा आधार या नाटकाला बराचसा आहे. त्या अनुरोधानेच या नाटकातील अन्य व्यक्तिरेखा चित्रित केल्या आहेत. उषा हस्तक या नाटकाच्या परीक्षणलेखात आपले लक्ष शुक्राचार्यांवर केंद्रित करतात. त्या लिहितात, 'शुक्राचार्यांच्या रूपाने उभे असलेले महान दुःख हेच खरे कलावंताचे आव्हान आहे.' पण त्यांची ही जाणीव स्वतंत्र व्यक्तिनिष्ठ व वेगळी आहे. या जाणिवेतूनही पूर्वी 'विद्याहरण' लिहिले गेले आहेच! एकाच उपाख्यानातून अशा नव्या जाणिवा प्रकट होणे शक्य आहे. पण त्यामुळे शिरवाडकरांच्या जाणिवेला या चिंतनाला धक्का लागत नाही. खांडेकरांच्या काय किंवा शिरवाडकरांच्या काय व्यक्तींचे स्वभाव व प्रकृती यांची एक खास मांडणी आहे, विकास आहे. या व्यक्तिरेखा म्हणजे जीवनमूल्यांच्या आणि कलामूल्यांच्या चिंतनाचा परिपाकच होय.

## प्रणयानुभूतीची विविध चित्रणे :-

शिरवाडकरांना विशेषेकरून या व्यक्तींच्या साहचर्यात प्रेमभावना

---

18 ययाति आणि देवयानी : उषा हस्तक (लेख) प्रतिष्ठान जून, ७०

जाणवते. कच, देवयानी, ययाती, शर्मिष्ठा यांच्या प्रेमाचे विविध रंग ते येथे समरसून अभिव्यक्त करतात. देवयानीचे कचावरील आणि शर्मिष्ठेचे ययातीवरील प्रेम त्यांना विशेष उत्कटत्वाने जाणवले. कचाच्या अंतः-करणात शुद्ध प्रेमभाव भरलेला आहे तर प्रेमानुभवातील निराशा पदरी पडल्याने शरीरभोगाच्या तत्त्वज्ञानाला ययाती सामोरा जात आहे. दास्य नशिबी आलेली, पण ययातीवर उत्कट प्रेम करणारी शर्मिष्ठा आपल्यापरीने ययातीला सावरण्याचा प्रयत्न करते. राजा ययाती आपल्यावर मना-पासून प्रेम करणाऱ्या शर्मिष्ठेच्या सहवासात स्वतःला रमवितो. या नाटकातील सर्वच प्रमुख व्यक्ती परस्परांशी प्रणयाच्या नाट्याने बांध-लेल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीचे प्रेम हे एक स्वतंत्र प्रणयानुभूतीचें वर्तुळ आहे आणि या वर्तुळांनी परस्परांवर लक्षणीय प्रकाशझोत टाकला आहे.

## देवयानी : शोकनाट्याची नायिका :–

देवयानी शोकनाट्याची नायिका म्हणून आपल्या नजरेत 'ययाती आणि देवयानी' या नाटकात भरते. 'कच' या नाटकात आपल्याला अवगत झालेल्या संजीवनी विद्येचा एका वेगळ्या अर्थाने वापर करतो, तो ययातीपेक्षा देवयानीला तिच्या अधःपातापासून वाचविण्यासाठी! शिरवाडकरांनी दिलेले हे नवे वळण त्यांच्या अनुभूतीशी इनाम राखणारे आहे.

या नाटकात यती आणि विदूषक थोडा जास्त भाव खातात. त्यांना वाजवीपेक्षा अधिक स्थान येथे मिळाले आहे. शर्मिष्ठेपेक्षाही कचाचे अतिभव्य आणि उदात्त दर्शन या नाटकात घडते. कच व देवयानी यांचे अपूर्व कोटीतील प्रेम येथे चित्रित केले आहे.

शिरवाडकरांचे त्यांच्या सर्वच नाट्य काव्य आदी साहित्यातून आढळणारे ध्येयवादी उदात्त मन महाभारतातील कथानकावरही आपला ठसा उमटविते. ययातीचे दुःख शतपटीने वाढविण्याची प्रतिज्ञा करणारी देवयानी मोठी अहंकारी आहे पण एकाकीपणाची वा एकटेपणाची जोड देऊन एक शोकनाट्याची नायिका म्हणून तिचे आरंभी होणारे

हे चित्रण या दिशेने शेवटपर्यंत होत नाही.[19] कचाच्या व्यक्तिमत्त्वातील उदात्ततेचे रूप साकार व्हावयाचे असल्यामुळे ही गर्विष्ठ देवयानी नाटकाच्या शेवटी असहाय्य होते. या नाटकाचे हे विशेष लक्षणीय वैशिष्ट्य आहे. पौराणिक कथानकात अबोल प्रदेश (Area of Silence) विपुल असतो. त्यावर कलावंताने आपले लक्ष केंद्रित केले म्हणजे पुराणकथेतून त्याला काही नवे आकलन होते, नवा प्राण त्या कथेत भरता येतो. येथे कचाचे सात्त्विकीकरण शिरवाडकरांनी याच एका प्रेरणेतून केले आहे. महाभारताच्या तुलनेत 'ययाति आणि देवयानी' नाटकाचा विचार करीत असताना प्रा. राम मंत्री यांनी शर्मिष्ठेला चांगले व देवयानीला दोषास्पद रंगविले असल्याचे म्हटले आहे. महाभारताशी केलेल्या तुलने–तून हा विचार संभवतो. पण जर कलाकृतीचे स्वतंत्र वास्तव गृहीत धरले आणि त्या संदर्भात नाटकाचा, त्यातील घटकांचा विचार केला तर मग मुद्दाम दोन व्यक्तींच्या चित्रणात लेखाकाने दुजाभाव केला असे जाणवणार नाही ज्या विशिष्ट गृहीतावर नाटकाची उभारणी होते त्या नाट्यातील अंतर्गत कलात्मक संगतीचा शोध या चित्रणातून लागतो. त्यासाठी लेखकाने निर्माण केलेले कलात्म अनुभवातील वास्तव गृहीत धरावे लागते.

येथे देवयानी आणि शर्मिष्ठा या व्यक्तिचित्रांविषयी तफावत निर्माण होते. मुळातील देवयानी साधी भोळी, पित्याची लाडकी कन्या आणि शुक्राचार्यांकडे तक्रार नेऊन न्याय मिळविणारी आहे, निष्कपटी

---

[19] कच : तू म्हणालीस, ययाति एकटा आहे पण तो एकटा नाहीं हे तू आता बघितलं आहेस. दुःख एकाकी नसतं देवयानी, एकाकी असतो तो अहंकार. माणुसकीचा साक्षात्कार झालेली शर्मिष्ठा–विदुषकासारखी माणसं दुःखाच्या भोवती कड करुन उभी राहतात. तुझ्या सारखी माणसं मात्र अहंकाराच्या आणि क्रोधाच्या काळचाशार पहाडावर, पंख जळालेल्या गरुडासारखी तडफडत असतात– अगदी एकटी, सांग, आपण एकटे निराधार आहोत–असं तुला वाटत नाही?
देवयानी : (आवेगाने दोन्ही हातांनी तोंड झाकून घेत) हो, हो, वाटतं आहे! (अंक ३ पष्ठ ५३)

आहे. तर या नाटकातील 'देवयानी' दुष्ट, भयानक, मायावी व कपटी आणि 'शर्मिष्ठा' तितकी अधिक शांत, त्यागी सुस्वभावाची व सरळ मनाची शिरवाडकरांनी रंगविलेली आहे. महाभारतातील विचारांना आणि व्यक्तींनाही अनेक पदर, परिमाणे आहेत. त्यातील विशिष्टच स्वीकारण्याचा अट्टाहास करणे अवघड आहे. कलावंताच्या प्रत्ययाला येणारे त्याच्या जाणिवेचा भाग म्हणून जाणवणारे महाभारत त्याचे असते याच गोष्टीचा प्रत्यय शिरवाडकरांच्या या नाटकाने आणून दिला आहे.

महाभारत स्वतःला अभिप्रेत असलेला आणि उलगडलेला अर्थ शोधण्याचा प्रयत्न कलावंत करतो. कलावंत पुराणकथा म्हणूनच या महाभारतातील उपाख्यानाचे चिंतन करतो. अशा प्रकारे साहित्यिकानेच त्यात नवा आशय भरून महाभारतात सतत वाढ केली आहे.

## 'ययाति' चे नाट्यरूपांतर :–

संजीव शेंडे यांनी १९७१ मध्ये 'ययाति' कादंबरीचे 'वैरिण झाली सखी' या नावाने नाट्यरूपांतर केले आहे. 'ययाति' कादंबरीवर आधारित वि. वा. शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी' हे नाटक त्या अगोदर १९६६ साली प्रसिद्ध झालेले होते. पण ते नाटक आधारित नाटक आहे. नाट्यरूपांतर नाही. 'ययाति' कादंबरीचे हे नाट्यरूपांतर असल्यामुळे या ठिकाणीच त्याचा विचार केला आहे.

'ययाति' कादंबरी आणि 'ययाति आणि देवयानी' नाटक समोर ठेवून संजीव शेंडे यांनी हे नाट्यरूपांतर सादर केले त्यात अनुकरणाची आणि नवशिकेपणाची जाणीव होते.

शर्मिष्ठा–देवयानीच्या कलहापासून पुरूच्या वार्धक्यग्रहणापर्यंतचा विस्तृत कथाभाग येथे घेतला असूनही नाटक आटोपशीर आहे. 'ययाति' कादंबरीप्रमाणेच येथेही एक ज्योतिषी शर्मिष्ठेचा मुलगा चक्रवर्ती होईल असे भाकीत करतो. कच, दासीपणातून शर्मिष्ठा मुक्त व्हावी अशी मागणी करतो. ययाती शुक्राचार्यांपुढे हतबल होतो. 'तो माझ्या यौवनाचा

दोष आहे मी मोहाला बळी पडलो' असे तो मान्य करतो. देवयानीच्या संमतीशिवायच शुक्राचार्य शाप देतात आणि त्या शापाने येथे देवयानी हळहळते. नंतर शुक्राचार्य पुन्हा उःशाप देतात. 'वार्धक्य स्वीकारणारा तरुण तुझ्याच कुळातला आणि तुझ्याच रक्ताचा पाहिजे' हे ऐकून देवयानी किंचाळून म्हणते 'हा तर मघाच्या शापाहूनही भयंकर आहे' यावर एखाद्या वधूपित्याप्रमाणे शुक्राचार्य देवयानीला म्हणतात. 'लहानपणापासून तुझे लाड केले पण या वृद्धपित्याच्या पदरात काय पडले? अपमान.' पुरूची वार्धक्य स्वीकारण्यामागची भूमिका येथे वेगळी आहे. 'केंव्हातरी ही अवस्था प्राप्त होणारच मग वार्धक्य स्वीकारायला काय हरकत आहे?' शर्मिष्ठाही आपले मागणे मागतांना आई आणि पत्नी या भूमिकेतून आपले दोन्ही डोळे मागते. कच येतो आणि पुरूचे वार्धक्य नाहीसे करतो. 'काम अर्थ पुरुषार्थच ठरती अनुसरता धर्माला। धर्माविाचुनि राक्षस बनुनी ग्रासतिसत्कर्माला.' हेच 'ययाति' कादंबरीचे सार येथे सांगण्याचा प्रयत्न आहे. या नाटकाचा शेवट गोड होतो. देवयानी म्हणते, 'शर्मिष्ठे, मी आता महाराणी नाही आणि तू दासीही नाहीस, आपण दोघी बालपणीच्या सख्या आहोत.'

एकूण, संजीव शेंडे यांनी 'ययाति' कादंबरीतही नाट्यरूपांतर करतांना काही फेरफार केले आहेत. हे यावरून दिसून येते. वि. वा. शिरवाडकर किंवा गिरीश कार्नाड ज्या प्रतिभेच्या सामर्थ्याने या कथानकाकडे पाहतात ते सामर्थ्य येथे प्रत्ययाला येत नाही. शुक्राचार्य, ययाती, देवयानी, शर्मिष्ठा यांच्या चित्रणात या काही वेगळ्या छटा येथे नाटककाराने रंगवल्या आहेत. पण कलात्मक नाट्यानुभवाच्या संदर्भात त्या विशेष परिणामकारक ठरल्या नाहीत.

या उपाख्यानातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाला स्वतंत्र प्रतिभेचा स्पर्श या नाटकात फारसा झालेला नाही. शिरवाडकरांनी व्यक्तित्त्वाचा गाभा आपल्या 'ययाति आणि देवयानी' नाटकात शोधला आहे. तसे संजीव शेंडे यांचे व्यक्तिचित्रण नाही. 'ययाति' या आपल्याला आवडलेल्या कादंबरीचे नाट्यरूपांतर करणे एवढीच प्रेरणा येथे आहे. स्वतंत्र भूमिका

किंवा कोणतेही भक्कम तत्त्वज्ञान या निर्मितीच्या पाठीशी नाही. प्रस्तावनाकार श्री. विद्याधर गोखले यांनी 'वैरिण झाली सखी' नाटकाची भलावण केली आहे.[20]

## ग. त्र्यं. माडखोलकरांची 'देवयानी' :-

कादंबरीकार माडखोलकरांनी १९६४ मध्ये 'देवयानी' नाटक लिहिले ही नवलाची गोष्ट म्हणावी लागेल. वयाच्या ६४ व्या वर्षी नाटक लिहिणारा हा 'कादंबरीकार' कोणत्या प्रेरणांनी प्रभावित झाला होता हे लक्षात घेण्याजोगे आहे. माडखोलकरांनी 'बर्लिन म्युनिच' येथे पाहिलेल्या 'ऑपेरा' तून प्रेरणा घेतली असली तरी गद्यातच हे नाटक लिहिले आहे. पौराणिक कथावस्तूतील तपशीलात त्यांनी काही बदल केले आहेत.[21]

नाटकात माडखोलकरांनी घेतलेली पुराणकथा वेगळी कोणती याचा उलगडा ते करीत नाहीत. बदल करण्याचे स्वातंत्र्य जरी लेखकाला असले तरी ते बदल कलादृष्टया सुसंगत असले पाहिजेत. माडखोलकरांनी या नाटकात केलेले बदल हे 'शिष्टसंमत' होणे अवघड आहे. येथे या

---

20 शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी' हे नाटक रंगत, परिणामकारिता नि दर्जा यासर्व दृष्टींनी प्रथम श्रेणीचे असले तरी, व्यासांच्या महाभारतीय कथेला, विशेषत: देवयानीला, अन्याय करणारे आहे. त्या मानाने खांडेकरांनी व्यासांवर कमी अन्याय केला आहे. म्हणूनच मुख्यतः खांडेकरांच्या कादंबरीच्या सहाय्याने लिहिलेल्या या नाटकात 'ययाति आणि देवयानी' या नाटकात न आढळणाऱ्या काहीं वेगळया रंगछटा- मुख्यत: ययाति आणि शर्मिष्ठेच्या- आढळून येतात.'
वैरिण झाली सखी : संजीव शेंडे : १९७१, प्रस्तावना (पृष्ठ १४)

21 देवयानीची कथा निरनिराळ्या पुराणात निरनिराळ्या स्वरूपात आलेली आहे. त्या कथातील विसंगतीचा फायदा घेऊन नाट्यरचनेच्या सोयीसाठी मी कथानकात कांही फरक केले. त्यापैकी महत्त्वाचा फरक हा की, पुरू हा शर्मिष्ठेचा ज्येष्ठ पुत्र असल्याचे मी दाखविले आहे. त्याचप्रमाणेच शकुंतलेची कथा देवयानीच्या कथेपूर्वी घडून गेली असल्याचे मी गृहीत धरले आहे. या शिवाय मी पौराणिक कथेत कोणताच फरक केलेला नाही.'
देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४ निवेदन पृष्ठ ७

बदलांना भरीव अर्थ प्राप्त होत नाही. उदाहरणार्थ- महाभारतात पुरू हा शर्मिष्ठेचा कनिष्ठ पुत्र आहे. तेंव्हा तो माडखोलकर कल्पितात तसा ज्येष्ठ होऊ शकत नाही. बलराम आणि श्रीकृष्ण किंवा लव आणि कुश या भावांच्या क्रमात बदल करणे कोठेही उचित नाही. पण अशाही बदलांचा मोह त्यांना झाला आहे. महाभारतात शर्मिष्ठा देवयानीला कूपात ढकलून देते तर येथे अकारणच 'तलाव' कल्पिला आहे. या किरकोळ बदलातून काही विशेष परिणाम साधला जातो असेही आढळत नाही.

## प्रीती आणि भीती: –

नाटकाच्या प्रारंभी पडद्याआड पाण्यात बुडणारी देवयानी आपल्याला वाचविण्यासाठी पित्याला पाचारण करते हा नवा कल्पित पण थरारक प्रसंग वर्णन केला आहे. या कल्पिताने नाट्य लेखनाच्या संदर्भात पेच निर्माण केला आहे. नाट्याविषयीची खरी ओढ माडखोलकरांना नाही हेच या आरंभातून दिसते. माडखोलकरांनी या कथानकात स्वच्छंद बदल केले आहेत. 'ययाती, पित्याच्या सूडासाठी ब्रह्मचारी राहतो, निदान तो पर्यंत लग्न न करण्याची त्याची प्रतिज्ञा आहे' हेमंतकाच्या बोलण्यातून हे सूचित होते. हा बदलही एक बदलासाठी बदल म्हणून नव्याने केला आहे असे दिसते. 'प्रीतीला मुकलेली आणि जीवनाला विटलेली देवयानी मरणाच्या भीतीने वाचवा असे ओरडते. देवयानी ययातीने वाचविल्यावर मात्र 'पण–कशाला वाचवलत मला?' असे म्हणते आणि शिवाय दुसऱ्या बाजूने अट्टाहासाने आपण पाणिग्रहण केल्याचे सांगते. यावरून माडखोलकरांची 'देवयानी' ही एकाच वेळी प्रीतीच्या आणि भीतीच्या गर्तेत सापडली आहे, हे स्पष्ट होते. तलावातून बाहेर काढलेल्या 'ओलेती' देवयानीच्या सौंदर्याचे वर्णन ययाती करतो.[२२] याठिकाणी ययातीने कवी शुक्राचार्यांच्या कवितेशी देवयानीची

---

२२ शुक्राचार्यांच्या कवितेंतही सगळी रमणीयता आणि जयंती (अप्सरा)च्या सौंदर्यातील सगळी मनोज्ञता एकवटलेली आहे तुझ्या रूपात' अशी ही ययातीला जाणवलेली सुंदर देवयानी आहे.

देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४ (अंक १, प्र. १, पृष्ठ ५)

तुलना केली आहे. यावर देवयानी म्हणते, 'त्यांच्या त्या दिव्य कवितेची सर मला कशी येईल?'

स्वतःच्या रूपाची स्तुती होत असूनही येथे देवयानी अहंकारी व रूपगर्विता नाही. देवगुरूचा पुत्र 'कच' याने आपल्याला फसविले असल्याचे ती ययातीला निःसंकोचपणे सांगते. आणि ययातीसुद्धा आपण पूर्वी कधी स्त्री स्पर्शाचे सुख अनुभवले नसल्याची ग्वाही देतो. हे सगळेच माडखोलकरांच्या कल्पनाविलासातून जन्मले आहे.

## स्वैर कल्पना :–

या नाटकाच्या पहिल्या प्रवेशातच शुक्राचार्य येतात. 'वृषपर्वा' 'शुक्राचार्य' यांना येथे महत्त्व असल्याचे दिसते. येथे शिष्यांवर उत्कट प्रेम करणारे व सौम्य मनोवृत्तीचे शुक्राचार्य चित्रित केले आहेत. 'विद्येचे उपासक विद्येसाठी जगतात ..... कुटुम्बासाठी नाही. त्यांची विद्या आणि त्यांचा संप्रदाय हेच त्यांचे कुटुम्ब होऊन बसते.' येथे वृषपर्वा 'ययाती–देवयानी' विवाहाला फारसा अनुकूल नाही. त्याला या नव्या नात्याची भीती वाटते. या नाटकातील शर्मिष्ठा त्यागी व संप्रदायनिष्ठ वर्णिली आहे. तिच्या सौंदर्याची महती येथेही आहेच. 'हेमंतक' जेंव्हा शर्मिष्ठा रूपाने फार सुंदर आहे असे ययातीला सांगतो तेंव्हा हा ययाती अनपेक्षित प्रतिक्रिया व्यक्त करतो. तो म्हणतो, 'असेल, आपल्याला काय करायचेय तिच्या सौंदर्याशी?'[23]

महाभारतातील रसिक व कामी ययातीच्या चित्रणाशी ययातीचे हे उद्गार विसंगत आहेत. हा ययाती सौम्य प्रवृत्तीचा आहे. अन्य स्त्रियांच्या शिकारीचा विचार तो करीत नाही. शर्मिष्ठा ही स्वतः होऊनच त्याला समर्पित झालेली स्त्री आहे.

देवयानी 'कचा' ला हिणविण्यासाठी इंद्रपुरीला जाण्याचे पसंत करते. ययातीला देवयानी राजनीतीचे तर शर्मिष्ठा प्रेमशास्त्राचे धडे

---

[23] देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४ (अंक १ प्र. ३ प. २२)

देते. शर्मिष्ठेच्या मुलांमुळेच ययाती–शर्मिष्ठा यांचे गुप्त प्रेम उघडकीला आले आहे. शर्मिष्ठेची भूमिका येथे हीन पातळीवरून व्यक्त केली आहे. 'ययाती' येथे द्विधा मन:स्थितीत वावरतो म्हणूनच शर्मिष्ठेला तो 'माझ्या जीवनात तू यायला नको होते' असे निदान देवयानीच्या मनात विकल्प येऊ नये म्हणून म्हणतो. [24] आपला दासीधर्म पाळणारी शर्मिष्ठा आणि राजधर्म पाळणारा ययाती येथे चित्रित झाला आहे.

## जागृत स्त्री :–

देवयानीतील स्त्री येथे जागृत आहे. कदाचित म्हणूनच तिची ययातीविषयीची पतित्वाची भावना संपते. एका सम्राटाला असे विलासी जीवन जगण्याची संमती असावी हे विसरून ती बोलते. तिला शर्मिष्ठेने आपल्यावरच डाव उलटविला याचें तीव्र दु:ख येथे आहे देवयानी म्हणते, 'स्त्रीला तोपर्यंत पति आपला वाटतो, जो पर्यंत दुसरी स्त्री त्याच्यावर हक्क गाजवू शकत नाही. आता माझा पति हा राहिला नाही.' पुरूषांतला जो पशु असतो त्याला फक्त स्त्रीचं तारूण्य हवं असतें. [25] देवयानीचे हे उद्‌गार वसंत कानेटकरांच्या जागृत मत्स्यगंधेची आठवण करून देतात.

## शुक्राचार्यातील 'माणूस' :-

माडखोलकरांनी या नाटकात 'व्यथित देवयानीची समजूत घालणारा शुक्राचार्यांचा आवाज अंतरिक्षातून होतो' या क्लृतीचा अवलंब अद्‌भुतरम्यतेला अवसर मिळण्यासाठी केला आहे. यातून शुक्रा–चार्यांच्या अंत:करणाला हात घालणे त्यांना शक्य झाले आहे. एका प्रेमभंगातून दुसऱ्या प्रतारणेचा अनुभव घेऊ नकोस ही शुक्राचार्यांची

---

24 शर्मिष्ठा म्हणते 'दासीचा हक्क उष्टयावर म्हणून तू उष्टे केलेल्या महाराजांवर मी हक्क बजाविला,' ययाती शर्मिष्ठेला उद्देशून म्हणतो, 'परमावधीचं सुख होतं आणि म्हणूनच वाटतं की, तू यायला नको होतंस माझ्या जीवनात.'
देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४, (अंक २, प्र. ३ पृष्ठ ४३)

25 देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४, (अंक २, प्र. ४ पृष्ठ ५६)

इच्छा असावी असे देवयानीला वाटते.

देवयानीला निरोप देतांना शुक्राचार्य भरल्या डोळ्यांनी म्हणाले होते, 'बाळे, तू जोपर्यंत माझ्याजवळ होतीस, तोपर्यंत तुझ्या आईचा वियोग जाणवला नाही मला कधी,[26] खाडिलकरांच्या 'विद्याहरणा 'तील देवयानी शुक्राचार्यांशी बोलतांना सतत 'आई जिवंत असती तर' असे म्हणून आपल्या पोरकेपणाची जाणीव करून देते. माडखोलकरांच्या या नाटकातील शुक्राचार्यांनी देवयानीच्या मातेची भूमिका वठविण्या-ऐवजी तिच्या सहवासात त्यांचा आपल्या पत्नीच्या दुःखाचा भार हलका होतो. मात्र शुक्राचार्यांच्या या चित्रणात 'शाकुंतला' तील कण्वासारख्या तपस्व्याच्या मनांत असलेला सामान्य माणूस माडखोलकरांनी प्रभावीपणे टिपला आहे. म्हणूनच देवयानीला वाटते- 'बाबा, मी तुम्हाला एकटी टाकून आले-त्याचं प्रायश्चित असेल का हें?'[27] अशी ही भावविव्हल देवयानी येथे चित्रित केली आहे. स्त्रियांच्या जीवनाच्या संदर्भातील चिंतन पौराणिक कथेच्या माध्यमातून सूचित केले आहे. ते लिहितात- 'दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमपाशात पति फसलेला पाहणे, यासारखं संकट नाही स्त्रीवर दुसरं, मरणचं ते खरोखरी.'

'स्त्रीचं हे नाजुक दुःख, तिची कोमल पण दारुण व्यथा कधी कळणार नाही तुम्हाला बाबा' देवयानीच्या या उद्गारातून हेच सूचित होते.

तिसऱ्या अंकात देवयानीचे रागीट आणि विजेसारखे प्रखर रूप पहायला मिळते. त्यामुळें या नाटकाला अभूतपूर्व कलाटणी मिळाली आहे.

### स्वतंत्र चिंतन :-

महाभारतातील ययाती उपाख्यानात शुक्राचार्य ययातीला शर्मि-

---

[26] देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४ (अं. २, प्र. ४, पृष्ठ ५७).

[27] देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४ (अं. २, प्र. ४, पृष्ठ ५७)

ष्ठेची शय्यासोबत न करण्याविषयी बजावतात. शर्मिष्ठेलाही त्यांनी तशी ताकीद दिलेली आहे. पण माडखोलकरांनी या कथाभागाचे स्वतंत्र चिंतन येथे केले आहे. वयात आलेल्या कुमारिकेचा जर वडील माणसांनी वेळेवर विवाह करून दिला नाही, तर तिला स्वयंवर करण्याचा धर्मशास्त्राप्रमाणे अधिकार आहे. शर्मिष्ठेने जे केले ते तिच्या वयाला आणि परिस्थितीला साजेसे असे योग्यच केले.

ग. त्र्यं. माडखोलकरांनी आजच्या नव्या परिस्थितीला अनुलक्षून हा विचार मांडला आहे. शर्मिष्ठेविषयी मध्यमवर्गीयांच्या दृष्टिकोनातून ते पाहतात. त्यांना येथे मुख्यत: देवयानीची व नंतर ययातीची चूक लक्षात येते. या नाटकातील शुक्राचार्य ययातीचे 'राजेपण' मान्य करतात आणि शर्मिष्ठेलाही न्याय देतात. 'स्त्री जात म्हणजे मूर्तिमंत असूया तर पुरूषजात म्हणजे मूर्तिमंत कामुकता!' या नव्या चिंतनाचा बोध माडखोलकरांनी या कथेच्या निमित्ताने येथे करून दिला आहे. लेखकपरत्वे महाभारताकडे पाहण्याच्या भिन्न भिन्न दृष्टिकोनाची प्रचीती येथे येते. या प्रत्येकाच्या नव्या चिंतनातूनच महाभारताचा सर्वांगीण विकास होतो.

या नाटकात शर्मिष्ठा आपल्या कर्माचे प्रायश्चित्त भोगायला तयार आहे. नाटकातील संघर्ष तिच्या अशा प्रकारच्या चित्रणामुळे फिका होतो. भोगवादी वृत्ती बळावल्या जाऊ नयेत, त्यासाठी शासन होणे आवश्यक आहे ही देवयानीची भावना आहे. या नाटकात सगळ्याच व्यक्तींनी समजूतदारपणा, व पश्चात्तापदग्ध होऊन शासन भोगण्याची तयारी दाखविल्यामुळे नाटकाचा आत्मा असलेला संघर्ष संपुष्टात येतो. शापाने वृद्ध झालेल्या ययातीवर देवयानी पुन्हा प्रेम करू लागते. येथे देवयानी पूर्णत: निवळलेली दिसते. तिच्या मनातील किल्मिष निघून गेल्यासारखे येथे वाटते.[२८] ययाती, देवयानी, शर्मिष्ठा या सर्वच

---

[२८] देवयानी : 'आपल्या सहवासात जे अनुपम सुख मी भोगलं, त्याची सर त्रिभुवनांतल्या दुसऱ्या कोणत्याही सुखाला येणार नाही. तें सुख ज्या या आपल्या शरीरानं मला दिलं ते शरीर जरी जरेनं ग्रासलेल असलं, तर

व्यक्तींवर माडखोलकर प्रेम करतात. म्हणून प्रत्येकाची भूमिका ते आवर्जून येथे मांडू शकतात. नाट्यलेखनाला माडखोलकरांची प्रवृत्ती प्रतिकूल आहे, त्यामुळे कादंबरीला अनुकूल अशाच कथाभागाचें चित्रण ते येथे करतात. नाट्यगुणांचा अभाव येथे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

## देवयानीचा अपेक्षाभंग :—

शुक्राचार्यांकडून मिळालेल्या उःशापानुसार देवयानी जेव्हा आपल्या पोटच्या मुलांना वृद्धत्व पत्करण्यास सांगते तेव्हा तिचा दारूण अपेक्षाभंग होतो. उलट तिलाच यदू म्हणतो– 'आपल्या तरूण पुत्राला पित्याचं म्हातारपण पत्करायला सांगणं यात तरी कोणता मातृधर्म आहे देवी?'[29] येथे तर उघडच माता आणि पुत्र यांच्यात विरोध निर्माण होतो. चकमक झडते. देवयानीला आपली सर्व मुले नकार देतात तेव्हा 'आमच्या पोटच्या गोळयानं बोलावं का असं आम्हाला? ' हे उद्गार ती काढते. ययातीसुद्धा स्वार्थीवृत्तीने म्हणतो... 'काय कृतघ्न पोरं आहेत! यापैकी एकालाही राज्यपद मिळणार नाही माझं–' सगळेच संगनमत करून मुलाचे तारूण्य हिरावून घेत आहेत अशी स्थिती येथे आहे. मुलांना स्वत.चे जीवन स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे. त्यावर कोणी गदा आणू नये हे येथे ययातीची मुले सुचवितात. शेवटी पुरू आपले तारूण्य द्यायला तयार होतो. पुरू हा ज्येष्ठ पुत्र आहे हे गृहीत धरून विशेष काम साधले याचा उलगडा होत नाही. ययातीच्या वार्धक्याच्या निमि–त्ताने येथे शर्मिष्ठा मोठे सूचक उद्गार काढते "माणसाला क्रमाक्रमानं हळुहळू चोर पावलांनी नकळत म्हातारपण येतं, म्हणूनच सहन करू शकतो तो जरेचे आपल्यावर पडणारे विदारक विनाशक पाश."[30] येथें म्हातारपणाच्या भयंकर अवस्थेची जाणीव तीव्रपणे होते.

---

काय झालं? त्याचा उबग कसा येईल मला? महाराज, आपण तरुण असा की म्हातारे असा, या देवयानीला सारखेच प्रिय आहात आपण.'
देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, १९६४, (अंक ३, प्र. ३, पृष्ठ ७०-७१)

[29] देवयानीं : ग. त्र्यं. माडखोलकर, (अंक ३ प्र. ३ पृ. ७४)

[30] देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर, (अंक ३, प्र. ३, पृष्ठ ७७)

अशा या नव्या विचारांची व नव्या कल्पनांची पेरणी महाभारतातील ययातीउपाख्यानात करून मराठी ललित लेखकांनी महाभारताची वाढ केली आहे. साहित्यिकांच्या हातून कळत नकळत ते घडते.

शेवटी अपेक्षाभंग झालेली 'देवयानी' च माडखोलकरांच्या मनाची पकड घेते. स्वतःला अभागी आणि अविचारी माता म्हणवून घेणारी देवयानी माडखोलकरांच्या लेखनाचे केंद्र होते, म्हणूनच या नाटकाचे नाव 'देवयानी' असावे. देवयानीच्या मनाचा अंतर्मुख होऊन माडखोलकर येथे विचार करतात. तिचे करूण-भावविश्व उत्कटतेने चित्रित करतात[31] पण हे चित्र पूर्वीच्या तिच्या सगळ्या तडजोडीशी विसंगत आहे. खांडेकर, शिरवाडकरांनी रंगविल्याप्रमाणे अहंकारी देवयानी माडखोलकर चित्रित करीत नाहीत. नाटकाच्या अखेरच्या प्रदीर्घ स्वगतातून देवयानीच्या साऱ्या भावनांची आंदोलने येथे प्रकर्षाने साकार होतात.[32]

अशी ही माडखोलकरांची 'देवयानी' मानवी जीवनावर प्रकाश टाकते. नवे चिंतन साकार करते. पण कलात्मकतेचा, भव्यतेचा स्पर्श येथे ययातीउपाख्यानाला होत नाही. महाभारतातील ययातीउपाख्यानावर आधारित साहित्य निर्मितीचा एक प्रयत्न म्हणून माडखोलकरांच्या या नाटकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'देवयानी' येथे केंद्रस्थानी कल्पिलेली असून तिच्या अहंकाराऐवजी असहाय्यतेवर चित्रणात भर

---

31 देवयानी : 'देवयानी, काय आलं अखेर हें तुझ्या कपाळी? तुझा ज्येष्ठ पुत्र सम्राटपदाला मुकला, तुझी सवत-ती धूर्त दानवकन्या-राजमाता होऊन बसली आणि इतके दिवस तुझ्या धाकांत असलेला तुझा कामुक पति उद्या पुन्हा तरूण झाल्यावर कामक्रीडेच्या मृगजळांत मोकाट मनानं हुंदडणार!' (अंक ३, प्र. ३, पृ. ८५)

32 'पुरूष हा राजर्षि असो किंवा ब्रह्मर्षि असो तो जात्याच बहुस्त्रीक आणि बहुभोगी आहे. स्त्रीकडे तो केवळ एक भोग वस्तु म्हणून पाहतो-माणुसकीचं मूल्य सुद्धा तो स्त्रीला द्यायला तयार नाही.' (अंक ३, प्र. ३, पृष्ठ ८५)

दिला आहे. माडखोलकरांची ही 'भग्नाश' देवयानी मराठी ललित साहित्यात निःसंशय लक्षणीय आहे.

## मंगेश पाडगावकरांची 'शर्मिष्ठा' :–

महाभारतातील या उपाख्यानावर आधारित मंगेश पाडगावकरांची 'शर्मिष्ठा' ही १९५६ साली, प्रथमतः मौज दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. ती पुस्तक रूपात १९६० साली प्रकाशात आली. आपल्या काव्यात्म, भावोत्कट शैलीत मंगेश पाडगावकरांनी ययाती, शर्मिष्ठा, आणि तिच्या सख्या (आणि एक छायाकृतीही) यांचा नाट्यपूर्ण संवाद काव्यरूपात सादर केला आहे. येथे काव्यविचारापेक्षा पाडगावकरांच्या कल्पना विश्वातील 'शर्मिष्ठे' चा विचार करावयाचा आहे.

## प्रणयिनी शर्मिष्ठा :–

मंगेश पाडगावकरांनी आपल्या स्वतःच्या भावविश्वाला ययाती–उपाख्यानातून साकार केले आहे. 'शर्मिष्ठा' त्यांना प्रणयिनीच्या रूपात जाणवते. ही 'शर्मिष्ठा' अबोल विहगाची स्वामिनी आहे. एका तृष्णेला शांत करून नव्या तृष्णेला जन्म देणारी आहे. ही प्रणयिनी शर्मिष्ठा आपल्या एकलेपणाचा आवेग मिठीत बुडविणारी आहे पण...

'प्रीतीच्या भाळी शाप वेदनेचा
प्रीतीच्या स्पर्शानें
उध्वस्तच व्हावें जीवन हीं नियती ।'

हेच तिच्या अनुभवाला येते. तिच्या 'धुंद गाढ आलिंगनांत । विफलतेची वेदना विरून जाते।' अशी कबुली ययातीही देतो. प्रणयिनी शर्मिष्ठा ययातीची आतुरतेने वाट पाहते. त्याच्यासाठी झुरते, तळमळते, तिच्या निशिगंधाने दरवळलेल्या रात्री शून्य आणि रित्या करणारा हा ययाती आहे. तिच्या अनुक्त प्रीतीने 'तुटून पिसें पडलेल्या विकल क्षणांची धडपड अनुभवली आहे; 'माझी प्रीती मलाच छळणारी शाप झाली' ही विरहिणी शर्मिष्ठेची व्यथा मोठ्या उत्कटतेने पाडगावकर व्यक्त करतात. ययाती उपाख्यानातील उत्कट प्रणयभावनेचे सारे रंग मंगेश पाडगावकर या काव्यात चित्रित करतात. तेवढ्यासाठी त्यांचे लक्ष 'शर्मिष्ठे' वर

केंद्रित झाले आहे. शर्मिष्ठेच्या प्रेमाचे हे रूप एवढ्या उत्कटतेने मूळ उपाख्यानात व्यक्त होत नाही. तो कथाभाग जाणून घेऊन कवीने त्याचा विकास येथे केला आहे. पाडगावकरांची ही 'शर्मिष्ठा' महाभारतातील शर्मिष्ठेचे भावविश्व अधिक खोलात शिरून चित्रित करते. महाभारतात एवढ्या प्रचंड विषयांच्या व्याप्तीत शर्मिष्ठेच्या अंतरंगातील नाजुक धाग्यांना फुलवावयाचे, पूरक काम पाडगावकरांनी येथे केले आहे. हे असेच, मर्ढेकरांचा 'कर्ण' किंवा ;वा. रा. कांताचे 'मरणगंध' पूरक रंग घेऊन मराठी साहित्यात अवतरले आहे.

## ययातीउपाख्यानाचा आगळा आविष्कार :-

पाडगावकरांच्या संगितिकेतील 'शर्मिष्ठे' चा प्रियकर ययातीच्या रूपात येथे येतो. तृषार्त ययातीला तृप्त करणारी ही शर्मिष्ठा आहे. देवयानीचा मदनतुल्य पती, ज्याला सूर्याची अस्मिता आहे आणि ज्याचा पराक्रम वज्रासारखा आहे तो नृपश्रेष्ठ ययाती येथें शर्मिष्ठेशी संवाद करीत आहे, हा प्रीति-संवाद आहे. शर्मिष्ठेलाही आपल्या कृतकर्माची खंत आहे. तिलाही वाटते की सुखस्वप्नांच्या हिरवळीवर बागडणाऱ्या देवयानीला दु:खाच्या खोल कूपात पुन्हा एकदा मी लोटून देईन आणि यावेळी मात्र ययातीचा बलशाली कर तेथे पोहचू शकणार नाही.

शर्मिष्ठेच्या अंतरंगात कवी पाडगावकरांनी येथे प्रवेश मिळविला आहे. त्यांनी प्रथमतः शर्मिष्ठेला आपण देवयानीची वंचना करतोय ही जाणीव झाल्याचे चित्रित करून या उपाख्यानात एक नवा रंग भरून उत्कट भावसंघर्ष निर्माण केला आहे. त्यामुळे शर्मिष्ठेचे मनोविश्लेषण करतांना कोणत्याही प्रेयसीच्या मनातील कातरता त्यांनी समर्थपणे व्यक्त केली आहे. पाडगावकरांसारख्या ललित साहित्यिकांच्या या नव्याकल्पना महाभारताचा एका विशिष्ट अंगाने विकास करतात आणि आपल्या स्वतःच्या जाणिवा त्यातून मार्मिकपणे व्यक्त करतात.

शर्मिष्ठेच्या मनात सूडाचा विचार डोकावतो व तो ती आपली सखी अनुराधा हिच्याजवळ बोलून दाखविते. देवयानीने परिस्थितीचा

फायदा घेऊन जे दासीपण तिला पत्करायला लावले– भोग भोगायला लावले ते शल्य आणि मनातील दुःख येथे व्यक्त होते. मग स्वप्नाळू प्रणयिनीची भूमिका संपून सूडाला उद्युक्त झालेल्या शर्मिष्ठेचे चित्र येथे येते.

'मी माझ्या अपमानाचा घेइन सूड
सूडातच त्या कृतार्थता स्वप्नांची ।'

असे मानणारी ही शर्मिष्ठा आहे.

## नवा संघर्ष : नवी कल्पकता :–

पाडगावकरांना जाणवलेल्या संघर्षात 'अनुराधा' या काल्पनिक व्यक्तिचित्राला महत्त्व प्राप्त होते. अनुराधा, शर्मिष्ठेच्या मनात पेटलेल्या सूडाला विझवू पाहते पण शर्मिष्ठा म्हणते, 'मी या सूडावाचून तडफडेन!' अनुराधेला दासीपणाच्या जगण्याहून मरण बरे असे शर्मिष्ठेतील 'राजकन्या' जागी होऊन सांगते. निदान सूडाने पेटलेल्या या शर्मिष्ठेला ययातीने तरी साथ देऊ नये म्हणून अनुराधेची सारी धडपड व्यक्त होते.

पाडगावकरांनी समर्थपणे रंगविलेली काल्पनिक 'अनुराधा' आणि कल्पनेनेच येथे रंगविलेली शर्मिष्ठेची सूडाची भावना हे सगळेच नव्या संघर्षाला जन्म देते.

शर्मिष्ठेच्या मनात खोलवर कवी येथे डोकावतांना दिसतो. सखी अनुराधेची छायाकृती ययातीला थोपवून त्याला दैवगतीची जाणीव करून देते. पण ययातीला सुख...अधिक सुख... नव्या सुखाचा, धुंद कैफात बुडविणाऱ्या सुखाचा हव्यास आहे. कैफ–कैफासाठीच आहे. मनातील भयाण पोकळीपासून पळून जाण्यासाठी आहे. हे ययातीचे दैवरूपी छायाकृतीला सादर होणे आहे. आसक्तीत तो सारे विसरू शकतो. ययातीची व्यथा येथे प्रभावीपणे पाडगावकर साकार करतात. देवयानीची वंचना यात होते याची जाणीव जेव्हा ती छायाकृती करून देते, तेव्हा ययाती आपली मनोव्यथा व्यक्त करतो. कचाला सर्वस्व अर्पण केलेली ही देवयानी 'कळी एकदाच फुलते' तशी देवयानी एकदाच कचासाठी फुलली. अहंतेच्या कैफात तिने उरलेले सर्वस्व मात्र मला

दिले. कोसळणाऱ्या देवयानीने माझा आधार शोधला ... ही त्याची तीव्र जाणीव आहे.

देवयानीला शुक्राचार्यांच्या उग्र तपःसामर्थ्याचा आधार आहेच.

अहंतेच्या कैफात जखमी स्वप्ने बुडविणारी देवयानी आणि मदिरेच्या कैफात आपली सारी जाणीव बुडविणारे शुक्राचार्य, ययातीला हे वेळीच उमगते रसरसलेले यौवन हवे म्हणूनच ययाती, शर्मिष्ठेला जवळ करतो.

महाभारताशी हा ययाती जवळचा आहे. शुक्राचार्यांना दिलेल्या वचनाचे हा ययाती, भान ठेवतो आणि महाभारतातील शर्मिष्ठाही युक्तिवादाने त्याला जाळ्यात पकडते. पाडगावकरांचा ययाती येथे अष्टावधानी बनतो. त्याला देवयानीचे खरे रूप उमजले आहे. सूडाने पेटलेल्या शर्मिष्ठेला जाणून बुजून तो सामोरा जातो. तिच्या स्वराने आणि लावण्याने त्याला येथं खेचून आणले आहे. देवयानीच्या अहंकाराने (खरं म्हणजे स्वतःच्याच क्रूरकर्माने) दासी झालेली शर्मिष्ठा येथे नव्याने साकार होते केवळ पित्यासाठी नाइलाजाने तिने दास्य पत्करले आहे अशी शर्मिष्ठेची नवीनच कैफियत पाडगावकर मांडतात. त्यामुळे त्यांचा शर्मिष्ठेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि भूमिका संपूर्णपणे वेगळीच आहे हे लक्षात येते.

ययातीच्या आवाहनाला साथ देतांना या शर्मिष्ठेच्या मनात भीती आहे. तिचे अनामिकपण संपून जाते. शुक्राचार्यांच्या शब्दांचे स्मरण ठेवणारा 'ययाती' येथे प्रेमप्रसंगीही सावध आहे. हे शर्मिष्ठेला अनपेक्षित असे ययातीचे रूप आहे. उघड्या डोळ्यांनी ती आता ययातीला स्वीकारू शकत नव्हती पण ययाती जाणीवपूर्वक (सारे स्मरून, पुन्हा विसरून) शर्मिष्ठेला स्वीकारतो.

ययाती–शर्मिष्ठेच्या मीलनाचे रंगतदार चित्रण येथे कवीने रेखाटले आहे. प्रत्यक्ष देवयानी येथे नाही तर तिच्या अस्तित्वाची जाणीव मोठ्या सूचकतेने कवीने करून दिली आहे. शेवटी शर्मिष्ठा सत्याला

जागते. तिची तिला ओळख पटते. ययाती–शर्मिष्ठा मीलन होते.

येथे महाभारताच्या या उपाख्यानातील एक अनुभवबिंदू हळुवार पणे कवी पाडगावकरांनी टिपला आहे. हा महाभारतीय ययाती उपाख्यानाचा एक कलात्मक आविष्कार आहे. पाडगावकरांची प्रतिभा ययाती शर्मिष्ठेच्या व्यक्तित्वाला नवा अर्थ प्राप्त करून देते. प्रणयाच्या वा सूडाच्या भावनेला समर्थपणे अभिव्यक्त करते.

## कार्नाडांचे अनुवादित नाटक :–

अनुवादित साहित्यकृती येथे अभ्यासात घेतलेल्या नसल्या तरी ज्या अनुवादाचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही असे कानडी नाटककार श्री. गिरीश कार्नाड यांचे 'ययाति' नाटक आहे. या नाटकाचा मराठी अनुवाद श्री. रं. भिडे यांनी १९७१ मध्यें केला आहे.

## नव्या मूल्यांसाठी पुराणकथा :–

कार्नाडांच्या 'ययाति' ने पौराणिक कथानकावर आधारित साहित्याची नवी परंपराच निर्माण केली. पूर्वापार चालत आलेले स्वरूप आणि दृष्टिकोन यात बदलला आहे. नव्या मानवी मूल्यांच्या चित्रणासाठी पुराणकथा येथे स्वीकारली आहे, पौराणिक संदर्भांची नव्याने तपासणी करून त्यातून काही नवीन मूल्यांचा मागोवा घेण्याची, नव्या धर्तीवर विश्लेषण करण्याची प्रथा रूढ झाली आहे. पौराणिक कथेच्या आधाराने जीवनाचा नवा संदर्भ मांडणारी ही नाट्यकृती आहे. आजच्या ललित साहित्यात हा एक नवा पायंडाच आता पडला आहे.

ययाती आख्यानाच्या विचारमंथनातून गिरीश कार्नाड एक नवा संदर्भ निर्माण करतात; नवा निष्कर्ष मांडतात.

पुराणकथा अनुभवाशी जेव्हा एकरूप होते तेव्हा ती कलारूप घेते. ती पुराणकथा ग्राह्य बनते. भारतीयांना तर ती केवळ ग्राह्यच नव्हे तर आस्वाद्यही वाटते. म्हणून प्राचीन मराठीतील बखरीही पुराण पद्धतीने आपला इतिहास सांगतांना दिसतात. कारण पुराणकथा जनरूचीशी

सुसंवाद राखतात. गिरीश कार्नाड एखादा विशिष्ट संदर्भ वा समस्या घेऊन त्या दृष्टीतून नाटक लिहीत नाहीत. उलट एखादी पौराणिक घटना जेंव्हा त्यांच्या मनावर विशेष परिणाम घडविते त्यावेळी त्यातून नाट्यकृती घडते. 'ययाती' मध्ये जे जिवंत नाट्य साकार होते याचे रहस्य हेच आहे.

मराठीतील श्रेष्ठ पौराणिक कलाकृतीतही याच गोष्टीचा प्रत्यय येतो. महाभारतातील कथानक, व्यक्ती, घटना लेखकांच्या मनावर परिणाम करतात आणि त्यातूनच या संपन्न साहित्यकृतींची निर्मिती झालेली आढळते.

या कथानकात कार्नाडांचे लक्ष अखेरच्या प्रसंगाने विशेष वेधून घेतलेले दिसते. पितापुत्रातील आपापली वये बदलण्याचा प्रश्न ( Transplantation of Age ) त्यांना विशेष करून भावला. यातून त्यांनी माणसाच्या वैयक्तिक आणि सामाजिक जबाबदारीचा प्रश्न निर्माण केला. पौराणिक कथेतून ( Myth ) नवी अभिव्यक्ती साधण्याचा त्यांचा येथे प्रयत्न आहे.

ययातीची सून, पुरूची पत्नी 'चित्रलेखा' हिच्या भावनांची विशेष कदर या नाटकात नाटककाराला करावयाची आहे. त्यातून नवे प्रश्न आणि संदर्भ निर्माण करावयाचे आहेत.

**'चित्रलेखे' ची कहाणी :–**

राजा ययातीने आपल्या पापाचे गाठोडे बिचाऱ्या पुरूवर लादले हीच खरी चित्रलेखेची तगमग आहे. म्हणून ती ययातीला रोखठोक, परखड सवाल विचारते. एक सून सासऱ्याला सरळ म्हणते, 'तुम्ही माझ्या पतीचे यौवन हिसकावून घेतलंत...त्या यौवनाला चिकटलेल्या इतर गोष्टींचा स्वीकार करणं आता तुम्हाला क्रमप्राप्त आहे.' (पृ.८१)

'सामान्यांच्या नीतीच्या सापळ्यात आपल्या सारख्यांनी का अडकून पडावं? ' निरूत्तर करणारी ही प्रश्नमालिका आहे. शेवटी विष

...८७

प्राशन करून चित्रलेखा आत्मसमर्पण करते. ययातीचे खाडकन डोळे उघडावेत, असे हे आत्मसमर्पण आहे. चित्रलेखेच्या जीवनकहाणीची कल्पना आणि तिचे आत्मसमर्पण यातील गिरीश कार्नाडांना उलगडलेला नवा अर्थ म्हणजे त्यांचे हे नाटक आहे. नव्या अर्थप्राप्तीने, पुराणकथेतून नवा आशय कलात्मक पातळीवरून व्यक्त झाला आहे. तेव्हा गिरीश कार्नाडांच्या या नाटकाकडे लक्ष वेधण्याचे कारण हीच एक प्रवृत्ती आता मराठी पौराणिक साहित्यात रूढ झाली आहे. त्यामुळे महाभारताचे नवे नवे आविष्कार होत आहेत आणि नव्या अर्थाने, नव्या संदर्भात प्रतिपादन होत आहे. त्यातूनच या वर्धिष्णू महाकाव्याची सतत वाढ चालूच आहे हे लक्षात येते.

**समालोचन :-**

महाभारतातील 'कचदेवयानी' आख्यानापेक्षा 'ययाती उपाख्यान' मराठी ललित लेखकांना विशेष आवडलेले दिसते. कारण कच देवयानी उपाख्यानापेक्षा, ययाती उपाख्यानावर आधारित ललित कृतींची संख्या अधिक आहे.

कचदेवयानी उपाख्यानावर 'विद्याहरणा' सारखे खाडिलकरांचे नाटक विशेष गाजलेले व नवा मानदंड ठरणारे आहे, तर ययाती उपाख्यानावर भाऊसाहेब खांडेकरांची 'ययाति' कादंबरी, शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी' नाटक, गिरीश कार्नाड यांचे 'ययाति' नाटक, पाडगावकरांची काव्यात्म 'शर्मिष्ठा' या विशेष गाजलेल्या व कलात्मक गुणांच्या दृष्टीनेही सरस ठरलेल्या साहित्यकृती आहेत. मराठी लेखकाचे लक्ष या उपाख्यानाने नव्या ललित साहित्य निर्मितीसाठी वेधून घेतले. या घटनेत मराठी प्रतिभेच्या नवोन्मेषाचा प्रत्यय येतो.

ययाती उपाख्यानावर नाट्यनिर्मिती अधिक झालेली आहे. याचे कारण या महाभारतीय उपाख्यानातील संघर्ष, व्यक्तींच्या स्वभावरेखा, (ज्या परस्पर संवादी व विसंवादी आहेत.) व नाट्यानुकूलता हे आहे.

पौराणिक कथेत नवा प्राण कशा तऱ्हेने भरता येतो आणि एखादी पुराणकथा लेखकाला कशी भारून टाकते याचा प्रत्यय खांडेकर, शिरवाडकर, पाडगावकर, यांच्या साहित्यातून येतो. माडखोलकरांचे 'देवयानी' नाटक, मुळात त्यांची प्रतिभा नाट्यानुकूल नसल्याने, यशस्वी झाले नसले तरी त्यांची देवयानीच्या संदर्भातील शोकनाट्याच्या नायिकेची जाणीव येथे महत्त्वाची आहे. पाडगावकरांची शर्मिष्ठा, ययाती केवळ अपूर्व आहेत. तर शिरवाडकरांना जाणवलेले कचदेवयानी चे अत्युत्कट प्रेम किंवा शर्मिष्ठेविषयीची अनुकंपा लक्षणीय आहे. खांडेकरांचा 'ययाती' तर फार मोठा संदेश (कलात्मक पातळीची बूज राखून) देऊन जातो. तो नुसता कामी 'ययाती' नाही तर सर्व प्रलोभनांवरच संयमाचा लगाम घालण्याची आवश्यकता सुचवितो. ययाती–यती–कच शर्मिष्ठा–देवयानी–पुरू–मंदार या सगळ्याच व्यक्तिरेखांना खांडेकर आपल्या कथेत नव्याने जिवंत करतात. त्यांना नवे अर्थ प्राप्त करून देतात आणि त्या आधाराने मानवी मनाचा व जीवनाचा नवा संदर्भ उलगडून दाखवतात. मराठी साहित्यात 'ययाति' कादंबरीचे हे यश अभूतपूर्व आहे. पौराणिक कादंबरीचे नवे पर्व निर्माण करणारे आहे.

मराठी ललित साहित्यात कर्णावरील साहित्यकृतींच्या खालोखाल ययाती उपाख्यानावरील साहित्यकृतींची संख्या भरते. यावरून या उपाख्यानाची लोकप्रियता स्पष्ट होते.

मराठी प्रतिभावंतांनी आपल्या प्रतिभाबलाने ययाती उपाख्यान–कथेंत विशेष मोलाची भर टाकली, एवढेच नव्हे तर महाभारतातील ययाती उपाख्यानात नवा प्राण भरून त्याचे पुनरुजीवन केले असे म्हणता येईल. व्यक्तिरेखा, घटना प्रसंग, कथानकाला मिळत गेलेली कलाटणी या सर्वच बाबतीत हे साहित्य म्हणजे नावीन्यपूर्ण आविष्कार आहेत. मराठी ललित लेखकांनी या व्यक्तींचे केलेले चिंतन, आणि त्या निमित्ताने केलेले विचारमंथन, व कथानकात केलेले फेरफार यामुळे महाभारतातील हे उपाख्यान सर्वांगांनी विकसित झाले आहे असे म्हणता येते. महाभारत हे एक अभिजात, वर्धनशील महाकाव्य आहे. माणसाचे सामर्थ्य आणि

त्याच्या मर्यादा यांचा शोध घेणारे ते चिंतनपर महाकाव्य आहे. म्हणूनच मराठी प्रतिभावंतांनी त्यातील कथोपकथांवर आधारित समृद्ध व कलादृष्ट्या संपन्न ललित साहित्याची निर्मिती केली आहे. महाभारतातील संघर्षाच्या, व्यक्तींच्या मुळाशी असलेल्या मूलगामी जीवनप्रवृत्तींचा शोध घेण्याचा प्रयत्न या ललित लेखनात आहे. हे या ठिकाणी स्पष्ट होते. कृ. प्र. खाडिलकरांसारख्यांनी महाभारतातील उपाख्यानात फारसा मूलभूत बदल केला नाही. कच देवयानीला भगिनी मानतो तेंव्हा देवयानी त्याला शाप देते, या कथाभागाला मुरड घालून देवयानीच कचाला आपला भाऊ मानते. देवगुरू प्रमाणेच दैत्यगुरू शुक्राचार्यही (आपला डाव) कचाला जामात करण्याचा येथे नव्याने टाकतात. त्यांनी 'शिष्ट संमत फेरफार' करून स्वतंत्र कथानक साकार केले. शिरवाडकरांची देवयानी, शुक्राचार्यांच्या ऐवजी शाप देते हे त्या नाटकाच्या वास्तवात शिरवाडकरांना भावलेले सत्य आहे. देवयानीच्या अंगीं शाप देण्याचे सामर्थ्य आहे हे त्यांना पुरतेपणी पटले आहे म्हणूनच त्यांनी हे बदल केले आहेत. पुराणकथेचा ललित साहित्यिकांच्या मनावरील परिणाम आणि त्याच्या मनाने शोधलेला आकार या नव्या बदलासाठी फेरफार करण्यासाठी लेखकाला उद्युक्त करतो. कलात्मक अनुभूतीत त्यांची अपरिहार्यता त्याला जाणवते. महाभारताची वाढ होण्यास लेखकाची ही कालसंदर्भाच्या व व्यक्तिसंदर्भाच्या प्रकाशात नवा अर्थ शोधण्याची प्रक्रियाच कारणीभूत आहे हे ययाती उपाख्यानाने सिद्ध केले आहे. 'संजीवनी मंत्राचा उच्चार करतांना तुझे स्मरण होऊन मी गहिवरेन.' ही ध्येयनिष्ठुर कचाने देवयानीला दिलेली कबुली आजही रसिकवाचकांच्या मनात हळुवार स्पंदन उमटवू शकेल. पूर्वपरिचित कथेतून शाश्वत जीवनमूल्यांचा कधीही न संपणारा शोध येथे घेतलेला दिसतो. हेच पुराणकथेच्या ययाती उपाख्यानाच्या आकर्षणाचे कारण आहे.

* * *

# परिशिष्ट (अ)

# महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी साहित्याचा अभ्यास

## (प्रबंध रूपरेषा आणि निष्कर्ष)

### उपोद्घात :–

प्रस्तुत प्रबंधात महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्याचा इ. स. १८५० ते १९७५ पर्यंतचा अभ्यास सादर केला आहे. त्यात मराठी साहित्यिकांनी विविध दृष्टिकोनातून केलेल्या महाभारताच्या आख्यानांचा, नव्या चिंतनाचा आणि कलात्मक अभिव्यक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

महाभारत हे एक चैतन्यमय आणि म्हणूनच सतत वाढणारे महाकाव्य आहे. ही एक सांस्कृतिक पुराणकथा आहे. महाभारताचे मराठी प्रतिभेला कधीही न संपणारे कुतूहल आहे, जबरदस्त आकर्षण आहे. म्हणून महाभारतावर आधारित अर्वाचीन मराठी ललित साहित्याची निर्मिती वैपुल्याने झाली आहे. महाभारत वाढीची प्रक्रिया लाक्षणिक अर्थाने अव्याहत चालू राहणार आहे, हे लक्षात घेऊनच महाभारता–सारख्या महाकाव्याच्या सतत होणाऱ्या वाढीचा नवा सिद्धान्त ह्या प्रबंधात प्रस्थापित केला आहे.

महाभारतावर आधारित साहित्यकृतीचा या नव्या दृष्टीने मराठीत प्रथमतःच अभ्यास होत आहे. मराठी प्रतिभावंतांनी आपल्या प्रतिभेच्या स्पर्शाने महाभारत कसे फुलविले आहे, हे प्रस्तुत प्रबंधातून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. हा विचार मराठीतील पौराणिक साहित्याच्या संशोधनातही काही महत्त्वाची भर घालू शकेल असा नम्र विश्वास आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाभारताधिष्ठित ललित साहित्याची विशेष लक्षणीय निर्मिती झाली आहे. मराठी प्रतिभावंतांनी महाभारतावर आधारित ललित साहित्यात महाभारतातील व्यक्तींना विशेष प्राधान्य दिले आहे. हे लक्षात घेऊनच प्रस्तुत प्रबंधात अभ्यासाच्या सोयीसाठी या व्यक्तींच्या संदर्भात मांडणी केली आहे व महाभारतावर आधारित सर्व महत्त्वाच्या निवडक मराठी साहित्यकृतींच्या आधारे हा अभ्यास केला आहे.

## महाभारताला मराठी प्रतिभेचा स्पर्श :–

महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्याच्या प्रस्तुत प्रबंधात केलेल्या अभ्यासातून पुढील गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

साहित्यिकांनी प्राधान्य दिलेल्या महाभारतातील कर्ण, ययाती, भीष्म, द्रौपदी, कृष्ण इत्यादी व्यक्तींच्या अनुषंगाने येथे अर्वाचीन मराठी साहित्याचा अभ्यास केला आहे. महाभारताचे मराठी साहित्यिकांना सतत आकर्षण वाटत असून ते वाढते आहे. तसेच मराठी साहित्यिकांच्या विभिन्न दृष्टिकोनानुसार आणि वदलत्या कालमानानुसार महाभारतात भर पडत गेली आहे आणि त्यामुळे महाभारत सतत वाढतच आहे हे या अभ्यासातून लक्षात आले आहे.

अर्वाचीन कालखंडात अव्वल इंग्रजी कालखंड, प्रबोधनयुगपूर्व कालखंड, व्यक्तिवादाच्या उदयानंतरचा कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड असे जे भिन्न कालसंदर्भ आहेत त्यातून महाभारताकडे पाह–ण्याच्या विविध प्रेरणा दिसून येतात. त्यामध्ये रंजनाची, उद्बोधनाची, प्रचाराची आणि कलात्मक नवनिर्मितीची प्रेरणा प्रभावी आहे.

महाभारतातील 'ययाती' उपाख्यानावर आणि 'कर्ण' या व्यक्तिरेखेवर आधारित साहित्यकृतींची संख्या सर्वांत अधिक दिसून येते. महाभारतातील ययाती उपाख्यानाकडे मराठी प्रतिभेने प्रथमतः लक्ष वेधले व त्या उपाख्यानाचा अनेकपरीने कलात्मक आविष्कार केला ही गोष्ट मराठी साहित्यिकांच्या साहित्यकृतींनी महाभारतात आपल्यापरीने

नवी भरघातली व महाभारत विकसित केले हे सिद्ध करण्यास पुरेशी आहे. कर्णासारख्या उपेक्षितांचे अंतरंग सहानुभूतीने मराठी प्रतिभावंतांनी जाणून घेतले आहे, ही गोष्टही पुरेशी बोलकी आहे. याचा अर्थ मराठी प्रतिभेच्या स्पर्शाने महाभारत काही प्रमाणात उजळले आहे असे म्हणता येते. मात्र महाभारतातील अर्जुन, विदुर, अश्वत्थामा, एकलव्य इत्यादी व्यक्तींच्या जीवन कहाणीकडे अद्याप मराठी प्रतिभेचे लक्ष केंद्रित झालेले दिसत नाही. पण अल्प प्रमाणात का होईना भीष्म, द्रौपदी, धर्मराज, श्रीकृष्ण इत्यादी व्यक्तींच्या जीवन-चरित्राचे नवे आकलन मराठी साहित्यात केलेले आढळते. अर्जुनासारखी महत्त्वाची व्यक्तिरेखा केवळ स्फुटलेखनातूनच विचारात घेतली आहे.

महाभारत हे एक वर्धिष्णू व उपजीव्य महाकाव्य आहे हे सूत्र नव्यानेच या अभ्यासातून लक्षात आले असून वाढण्याची प्रवृत्ती असलेल्या या महाभारताला मराठी साहित्यिकांनी सतत वाढविले असल्याचे दिसून येते. त्यामुळे महाभारतातील कथाभागाचा आणि व्यक्तींचा विकास झालेला दिसून येतो. तो विकास कसा होत गेला, हे जागोजागी स्पष्ट केले आहे. या अभ्यासातून लक्षात आलेले काही स्वतंत्र विचार पुढीलप्रमाणे आहेत.

१) महाभारतातील चैतन्य, व्यक्तींचे पारदर्शक आणि बहुमिती व्यक्तित्व, मानवी जीवनाचे व्यापक चिरंतन आणि व्यामिश्र दर्शन, नवनिर्मितीची प्रेरणा देण्याचे सामर्थ्य या कारणांमुळे साहित्यिकांना मनापासून महाभारताची ओढ आणि आकर्षण आहे.

२) साहित्यिकांनी महाभारताकडे विविध दृष्टिकोनातून पाहिले आहे. म्हणून महाभारताधिष्ठित साहित्यात त्यांच्या स्व-भावाचे, दृष्टिकोनाचे आणि सभोवतालच्या परिस्थितीचे जिवंत पडसाद उमटले असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

३) महाभारताच्या सखोल चिंतनातून नवा आशय व्यक्त होण्यासाठी या साहित्यिकांना महाभारताचे पुनर्मंथन करावे लागले, नवी

मांडणी करावी लागली. म्हणून त्यांना नवे रंग भरून राजकीय, सामाजिक आशयाला साकार करता आले आहे. या पुराणकथेच्या आधाराने नव्या वर्तमानकालाचा वेध घेता आला आहे.

४) महाभारत एक सांस्कृतिक महाकाव्य किंवा पुराणकथा म्हणून साहित्यिक आणि रसिक अशा सर्वांच्याच मनात रुजलेले आहे. सर्वांना स्थूलमानाने ज्ञात असलेल्या या कथेचेच आवाहन आणि कुतूहल मराठी साहित्यिकांना आहे. त्यांनी ते सतत जागृत ठेवण्याचा प्रयत्न आपल्या साहित्यातून केला आहे.

५) मराठी साहित्यिकांनी ही महाभारताची कथा विविध साहित्य प्रकारातून व्यक्त केली आहे. ययाती उपाख्यानावर 'ययाती' कादंबरी आणि नाटके, संगीतिकाही लिहिल्या आहेत. कर्णावर **कौंतेय. मृत्युंजय, राधेय, सूर्यपुत्र,** अशी नाटक, कादंबरी, आणि चरित्र या वाङ्मय प्रकारातील निर्मिती आढळते. पण महाभारतावर आधारित नाटकांची संख्या कादंबरी–काव्य या प्रकारापेक्षा अधिक आहे. याचे कारण महाभारतात नाट्यानुकूलता व संघर्षमयता अधिक आहे, हे सांगता येईल. आधुनिक हिन्दी कवींच्या प्रमाणे मराठी कवींनी महाभारताचे काव्य निर्मितीसाठी चिंतन केलेले दिसत नाही म्हणून काव्यनिर्मिती विरल–त्वाने आढळते.

६) कालखंडाचा विचार केला तर अव्वल इंग्रजी कालखंडात महाभारताचे मराठीकरण करण्याची प्रवृत्ती विशेष प्रभावी आहे. शृंगार, करुण अद्भुत, भयानक, बीभत्स इत्यादी रसांची निर्मिती करण्याकडे या साहित्यिकांची प्रवृत्ती दिसून येते. कलात्मक निर्मिती या कालखंडात फारशी आढळत नाही. यानंतरच्या म्हणजे १८७५ ते १९४७ या स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मनोरंजन, उद्बोधन आणि प्रचार ह्या प्रेरणा आढळतात. समाजाची स्वातंत्र्याला अनुकूल अशी मनोभूमी तयार होण्यासाठी महाभारताचा आधार साहित्यिकांनी घेतला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात म्हणजे १९५० ते १९७५ या काळात महाभारताच्या चिंतनातून संस्कृतिदर्शनाची प्रेरणा व कलात्मक निर्मितीची प्रेरणा

प्रभावी ठरल्याचे दिसून येते. या साहित्याचे कलात्मक मूल्यही अधिक आहे. कलानिर्मितीचे भान स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्यिकांनी विशेष ठेवले आहे. महाभारताचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांच्या या काळातील साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत म्हणूनच त्यात सत्त्वही अधिक जाणवते. शिवाय रंजन प्रचार, उद्‌बोधन या सर्वच प्रेरणांवर मात करण्याचे सामर्थ्य साहित्यकृतीत असते हे 'सौभद्र', 'कीचकवध', 'कौंतेय', 'ययाती', 'मत्स्यगंधा', 'मृत्युंजय', 'राधेय', 'जीवन–व्यास', 'माता द्रौपदी' व 'एकलव्य' या साहित्यकृतींनी सिद्ध केले आहे.

या विविध प्रेरणांच्या आधाराने महाभारतावर आधारित निवडक साहित्यकृतींची केलेली वर्गवारी परिशिष्ट 'अ' मध्ये दिली आहे.

उपरोक्त विविध प्रेरणांपैकी महाभारताधिष्ठित ललित साहित्यात कलात्मक निर्मितीची प्रेरणा अधिक प्रभावी आहे. त्यातही १९५० नंतरच्या साहित्यात हा प्रभाव विशेष जाणवतो. संस्कृतिदर्शनाची एक महत्त्वाची प्रेरणा येथे नव्याने आढळते. या प्रेरणांच्या सीमारेषा मात्र काहीशा अस्पष्टच आहेत. एकाच साहित्यकृतीतही या विविध प्रेरणा आढळू शकतात. उदाहरणार्थ **खाडिलकरांचे 'कीचकवध'** या नाटकाचा समावेश कलात्मकनिर्मिती, उद्‌बोधन, मनोरंजन व प्रचार या प्रेरणा असलेल्या साहित्यातही करता येतो.

७) महाभारताकडे पाहण्याच्या विविध दृष्टिकोनात **कृ. प्र. खाडिलकरांचा** राजकीय दृष्टिकोन, **इरावती कर्वे** यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन; **दुर्गा भागवतांचा** सतत कलेचे भान ठेवणारा कलावादी दृष्टि-कोन; **आनंद साधले** यांचा व्यवहारवादी दृष्टिकोन, **बाळशास्त्री हरदासांचा** संस्कृतिनिष्ठ दृष्टिकोन, **अनंतराव आठवले व डॉ रा. शं. वाळिंबे** यांचा महाभारतनिष्ठ चिकित्सक दृष्टिकोन, **डॉ. प वि वर्तक, शं. के. पेंडसे** यांचा बुद्धिवादी वैज्ञानिक दृष्टिकोन, **वि. वा. शिरवाडकर, रणजित देसाई, वसंत कानेटकर, कै बा. सी. मर्ढेकर, मंगेश पाडगावकर** इत्यादींचा कलात्मक नवनिर्मितीचा दृष्टिकोन, **कै वि. स. खांडेकरांचा** जीवनवादी

दृष्टिकोन, **वि. अं. खैरे** यांचा समतावादी दृष्टिकोन आणि **विद्याधर पुंडलिकांचा** अस्तित्ववादी दृष्टिकोन येथे लक्षात येतो.

या लेखकांनी उपरोक्त विविध दृष्टिकोनातून जरी महाभारताकडे पाहिले असले तरी आपण स्वीकारलेला तेवढाच महाभारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन नाही याचे प्रत्येकाने भान ठेवले आहे. शिवाय त्यात अन्य दृष्टिकोनही एकाच वेळी मिसळलेले आहेत. उदाहरणार्थ, **इरावती कर्वे** एकाच वेळी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आणि साहित्यिकांच्या कलात्मक दृष्टिकोनातून महाभारताकडे पाहताना दिसतात. तर **कृ प्र. खाडिलकर** आपल्या साहित्यकृतीत राजकीय प्रचाराच्या आणि कलात्मक दृष्टिकोनातूनही पाहताना दिसतात.

८) कृष्ण, युधिष्ठिर, भीम, अर्जुन, द्रौपदी, अश्वत्थामा, एकलव्य या महाभारतातील काही व्यक्तींची समृद्ध चित्रणे साहित्यात आढळत नाहीत. वस्तुतः यातील काही व्यक्तींना महाभारतात विशेष महत्त्व आहे. ज्या व्यक्तींच्या जीवनात शोकात्म अनुभूतीचा अभाव, आदर्शवादाकडे कल, परतत्त्वाचा स्पर्श किंवा असामान्यत्व आढळते; त्यांचे चित्रण साहित्यात कमी प्रमाणात होणे स्वाभाविकच आहे. म्हणून कर्णाच्या तुलनने अर्जुन साहित्यिकांच्या जिव्हाळ्याचा विषय होत नाही. महाभारतातील अनेक कथा-उपकथा, घटना, प्रसंग आणि व्यक्तीच्याकडे मराठी साहित्यिकांचे लक्ष अजूनही वेधले गेलेले दिसत नाही.

९) मराठी साहित्यिकांनी ययाती उपाख्यानावर आपले लक्ष केंद्रित करून वैपुल्याने ललित साहित्याची निर्मिती केली आहे. त्या साहित्याची थोरवीही सिद्ध झालेली आहे. या एका काव्यात्म आणि कलात्म उपाख्यानाकडे संस्कृत साहित्यिकांचे लक्ष गेलेले आढळत नाही. निदान नामांकित साहित्यकृती निर्माण झालेली कोठेच आढळत नाही. तेव्हा महाभारतातील ययाती उपाख्यानाची काव्यानुकूलता हेरून दर्जेदार ललित साहित्याची निर्मिती करून महाभारतात मोलाची भर टाकल्याचे श्रेय मराठी प्रतिभेला द्यावे लागते. आजच्या संसारकथेचे प्रतिबिंब या कथेत उमटलेले आहे.

१०) रसिक, साहित्यिक आणि समीक्षक यांचे महाभारताकडे पाहण्याचे दोन स्वतंत्र दृष्टिकोन आढळतात

अ) महाभारतनिष्ठ परंपरावादी दृष्टिकोन.

ब) लेखन-स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा दृष्टिकोन.

या दोन गटांत मराठी साहित्य विभागले गेले आहे. ह्यापैकी **कालिदास, भवभूती, भास** इत्यादी श्रेष्ठ लेखकांनी दिलेल्या स्वातंत्र्याच्या सनदीचा हक्क बजावणारे ललित साहित्यिक संख्येने अधिक आहेत. त्यांनी कसदार व कलात्मक साहित्यकृतींची निर्मिती केलेली आहे.

११) महाभारताचा आधार अनेक साहित्यिकांनी घेतला असला तरी प्रत्येकाची दिशा आणि वाट वेगळी आहे. मौजेची गोष्ट अशी की सामान्य रसिकवाचकात महाभारतातील ठळक, ज्ञात गोष्टींविषयी एकवाक्यता आढळते पण विचारवंतांच्या आणि कलावंतांच्या चिंतनात भिन्नता प्रत्ययाला येते. कर्ण दानशूर होता हे सर्वसामान्यापर्यंत जाऊन पोहचलेले एक ज्ञात सत्य आहे. पण त्याच्या दातृत्वात हेतू होता, सौंदर्याचा वर मागून व वासवीशक्ती घेऊन त्याने कवचकुंडलाचे दान केले, त्यामध्ये त्याची कीर्तीची हाव दिसते अशी भिन्न मते विचारवंत व कलावंतांनी व्यक्त केली आहेत.

१२) काही वेळा कलावंत मनाच्या समान प्रतिक्रिया महाभारताच्या चिंतनातून व्यक्त होतात. उदाहरणार्थ **इरावती कर्वे** यांच्या '**युगांत**'मध्ये आणि **विद्याधर पुंडलिक** यांच्या '**माता द्रौपदी**' मध्ये भीम आणि द्रौपदी यांच्या संबंधाकडे समान भावनेने पाहिलेले आढळते. दोघांनाही भीमाचे द्रौपदीवर अलोट प्रेम होते हे जाणवले आहे. द्रौपदीकडून या प्रेमाला विशेष प्रतिसाद मिळू शकला नाही हेही त्यांनी व्यक्त केले आहे. हाच अनुभव **दुर्गा भागवत** आणि **आनंद साधले** यांची कृष्ण व द्रौपदी यांच्या नात्याविषयी केलेल्या नव्या चिंतनातून प्रत्ययाला येतो. कृष्ण आणि द्रौपदी यांच्या सख्यत्वाला अशरीरिणी व अनामिक प्रेमाचे रूप त्यांनी '**कामिनी द्रौपदी**' व्यासपर्व आणि हा **जय नावाचा इतिहास आहे** यात

प्राप्त करून दिले आहे. अश्वत्थाम्याच्या चिरंजीवित्वाचे चिरंतन दु:ख **दुर्गा भागवत, मधू भोसले, विद्याधर पुंडलिक** यांनी असेच व्यक्त केले आहे. हे साम्य जसे आढळते त्यापेक्षाही एकाच व्यक्तीच्या आणि प्रसंगाच्या चित्रणात पृथगात्मता आढळते याचे उदाहरण म्हणून भिन्न साहित्यिकांनी रेखाटलेलें कर्णाचे जीवन सांगता येईल.

१३) कोणत्याही पौराणिक साहित्यकृतीत कल्पकतेवर विशेष भर असणे स्वाभाविक आहे. ऐतिहासिक साहित्यकृतीच्या निर्मितीसाठी निदान काही बाह्य साधने (कागदपत्रे, दप्तर, वाड इत्यादी) तरी उपलब्ध असतात. ललित साहित्यात पौराणिक साहित्याची एकदा गणना केल्या–नंतर मग साहित्यिकाला कथेची कलात्मक बांधणी करण्याची, व्यक्तींच्या मनाचा व जीवनाचा शोध घेण्याचा व नवा तपशील कथेत भरण्याची मुभा असते. साहित्यिकाच्या भावनात्मक प्रत्ययालाच शेवटी येथेही महत्त्व प्राप्त होते. माणसाचे प्रत्ययकारी चित्रण घडविण्याचे सामर्थ्य पौराणिक ललित साहित्यकृतीत असते म्हणून अशा साहित्याला वाङ्मयीन मूल्य लाभते.

या संदर्भात **इरावती कर्वे** यांनी स्वर्गारोहणपर्वाच्या कथाभागाला आपल्या प्रतिभेचा केलेला स्पर्श पाहिला म्हणजे पौराणिक कथेला कलावंताच्या भावनिक प्रत्ययाची लाभणारी ओढ दिसून येते. इरावती कर्वे यांनी चित्रित केलेल्या या प्रसंगातून भीमाला द्रौपदीविषयी वाटणारी ओढ नव्यानेच व्यक्त होते. **रणजित देसाई** यांच्या '**राधेय**' कादंबरीचा अंत:करणाला पाझर फोडणारा शेवट, **विद्याधर पुंडलिकांच्या** '**माता द्रौपदी**' तील अश्वत्थामा आणि द्रौपदी यांच्यातील संभाषण या उदा–हरणांतून मराठी प्रतिभावंतांच्या कलात्मक आविष्काराची जाणीव होते.

१४) मोठ्या आत्मविश्वासाने साहित्यिकांनी कलात्मक आविष्कार केले आहेत. उदाहरण म्हणून रणजित देसाई यांच्या 'राधेय' कादं–बरीची प्रस्तावना पाहिली म्हणजे याची कल्पना येते याही अगोदर **शिरवाडकरांच्या 'ययाती आणि देवयानी'** नाटकाच्या प्रस्तावनेत हा आविष्कार प्रगट झाला आहे. आपल्यापरीने साहित्यिकांनी महाभारतातून

असे अर्थ शोधले आहेत. नवी संगती लावली आहे. साहित्यिकांना महा–भारताचे आकर्षण कायम वाटत राहणार आहे हेही या साहित्यातून सूचित होते.

१५) स्थल, काल आणि व्यक्ती याला अनुसरून महाभारत वाढले. महाकाव्याची ती प्रवृत्तीच आहे. म्हणूनच महाभारताला वर्धिष्णू महाकाव्य आणि जिवंत महाकाव्य म्हटलें आहे. मराठी प्रतिभावंतांचे ते एक प्रेरणास्थान आहे. अनेकविध साहित्यकृतींच्या विवेचनातून हे स्पष्ट झालें आहे. महाभारताच्या नव्या नव्या आविष्काराची ही प्रक्रिया कधीच थांबणारी नाही. कारण महाभारताचे आवाहन फार जवरदस्त आहे. मराठी प्रतिभेला ते अखंड राहणार आहे. असे दिसून येते. कलावंतांच्या महाभारतावरील भाष्याने महाभारतात नवी भर पडलेली दिसते. म्हणूनच त्यांची लाक्षणिक अर्थाने वाढ होते व अनेक साहित्यिक रूपी विहंगांना भरविणारा तो एक कल्पवृक्ष आहे हे लक्षात येते.

१६) महाभारतातील व्यक्ती चैतन्यपूर्ण आहेत, मानवी पातळी–वरील आहेत. त्यांची जीवनातील सत्यांशी नाती आहेत. माणसाच्या माणूसपणाचे दर्शन त्या घडवितात. त्यांचे वावरणेही स्वाभाविक वाटते. असे असूनही या व्यक्तींच्या मध्ये गुणदोषावरोवरच एकेका वैशिष्टचपूर्ण गुणाचे आधिक्य आहे. भीष्म प्रतिज्ञेचा, धर्म सत्याचा, कर्ण दातृत्वाचा, एकलव्य गुरूभक्तीचा, भीम सामर्थ्याचा, अर्जुन शौर्याचा,कृष्ण मुत्सद्दी-पणाचा, अश्वत्थामा क्रौर्याचा, उत्कर्ष आहे असे म्हणता येईल. माणसाने जीवन जगावे कसे आणि संपवावे कसे हे या व्यक्तींच्या जीवनातून स्पष्ट होते. या बाबतींत महाभारत वास्तववादी आहे. आदर्शवादी कमी आहे.

१७) महाभारतातील व्यक्तींकडेच प्रामुख्याने साहित्यिकांचे लक्ष वेधले गेले हे व्यक्तिप्रधान मराठी साहित्यावरूनही स्पष्ट होते. काही लेखकांनी मात्र संपूर्ण महाभारताचा पट आपल्यासमोर ठेवला आहे. **बाळशास्त्री हरदास, शं. के. पेंडसे, आनंद साधले, म. रं. शिरवाडकर** इत्यादी साहित्यिकांनी असे चिंतन केले आहे. **व्यासपर्व,**

...९९

**युगांत, कल्पवृक्ष** या साहित्यावरूनही हेच दिसून येते. आपल्या दृष्टि-कोनातून विशिष्ट व्यक्तींवर, प्रसंगांवरही लिहिण्याची प्रवृत्ती आढळते. **वि. वा शिरवाडकर** कौंतेयमध्ये कर्ण-कुंती संवादाचा, त्यांच्या भेटीचा प्रसंग निवडतात तर **शिवाजी सावत** कर्णावरच आपले लक्ष केंद्रित करतात. समाजकारण, राजकारण व तत्त्वज्ञान यांचे चिंतन करण्यासाठी आणि आपल्या आवडीच्या गोष्टींचे समर्थन करण्यासाठी महाभारताचे माध्यम साहित्यिकांना उपयुक्त ठरले आहे. साधन म्हणून महाभारताकडे पाहिल्यामुळे निश्चितपणे महाभारताच्या कक्षा वाढल्या पण त्यामुळे त्यातील काव्यात्म भाव झाकाळले याची खंत **दुर्गा भागवतांनी** व्यक्त केली आहे **'व्यासपर्वा'त** सतत व्यासांच्या कलेचे भान राखण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

**इरावती कर्वे** **'युगान्त'**मध्ये समाजशास्त्रीय दृष्टिकोन व्यक्त करतात आणि कलात्मक पातळीही गाठतात. त्यातील सामाजिक चिंतन आणि लालित्य परस्परात अतूटपणे मिसळलेले आहेत. 'प्रत्येकाच्या मनात दडलेले' आणि जीवनाशी निगडित असलेले अनुभव आपल्या प्रतीतीनुसार साहित्यिकांनी व्यक्त केले आहेत. त्यांना जाणवलेल्या महाभारतातील व्यक्ती, घटना व प्रसंग नाटक, कादंवरी, काव्य या वाङ्मयप्रकारांच्या माध्यमातून ते व्यक्त करतात.

**वि वा. शिरवाडकर 'कौंतेय' व 'ययाती आणि देवयानी', वि. स. खांडेकर 'ययाती', शिवाजी सावंत 'मृत्युंजय', रणजित देसाई 'राधेय', विद्याधर पुंडलिक 'चक्र'** इत्यादी साहित्यिकांच्या साहित्या-वरून हे दिसून येते. परंपरेने आपल्या स्वाधीन केलेल्या महाभारताचे हे नवे रूपदर्शन आहे. त्यांच्या प्रतिभेने फुलविलेली ही नवी निर्मिती मातीतून उगवणाऱ्या लसलशीत रोपट्यांसारखी चैतन्यमय आहे. एखाद्या वृक्षाला नवी पालवी फुटावी तशी महाभारत या 'कल्पवृक्षाला' फुटलेली ही नवी पालवी आहे. प्रतिभेच्या द्वारा घडणारे हे महाभारताचे रूपदर्शन मुळापेक्षा वेगळे असणेच स्वाभाविक आहे.

१८) कलावंत काव्यात्मक-अनुभवाची अभिव्यक्ती करीत असतो.

काव्यात्म न्याय पाळणे, कलांतर्गत सुसंगती राखणे त्याला आवश्यक असते. साहित्यकृतीत या अपेक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य आहे की नाही तेच फक्त पाहिले पाहिजे. कापडावरील भरतकामाचे सौंदर्यग्रहण करण्याची आपली क्षमता असावी. त्यामागील बाजू पाहण्याचा प्रयत्न केल्याने सौंदर्य प्रचीती होणार नाही. हीच गोष्ट ललित साहित्यातील सौंदर्याचा आस्वाद घेतानाही लक्षात घ्यावी लागते, महाभारतात जीवनातील सत्याचे आणि सौंदर्याचे दर्शन घडते. सत्य कल्पिताच्या पातळीवरून अभिव्यक्त झाले की कलात्मक पातळी गाठते. **वि वा शिरवाडकर, शिवाजी सावत, रणजित देसाई** यांचा 'कर्ण' **विद्याधर पुंडलिकांचा** 'अश्वत्थामा' यांच्याकडे या दृष्टीने पाहिले पाहिजे **दुर्गा भागवतांनी**ही महाभारतकारांची सौंदर्यदृष्टी आणि कलागुणांचा शोध घेण्याचा केलेला प्रयत्न असाच समजावून घेतला पाहिजे.

१९) इतिहास, पुराणकथा आणि महाकाव्य यामुळे महाभारताचे स्वरूप व्यामिश्र झाले आहे. महाभारत अनेक संस्करणांतून विविध काळात एखाद्या लोककथेसारखी वाटचाल करीत आहे. समाजाच्या प्रगल्भ आणि अप्रगल्भ अशा सर्व स्तरातून ते प्रवाहित झाले आहे. महाभारताच्या या स्वरूपामुळे साहित्यिकांच्या बहुविध जाणिवांना अवसर मिळाला आहे. कोश स्वरूपाच्या साहित्यात नेहमीच नव्या आकलनाला आणि संशोधनाला अधिक वाव मिळतो. महाभारतात ही सर्वसमावेशकता आहे. महाभारत ही जणू काही विद्युत्शक्ती असून ती अनेक साहित्यिकरूपी विद्युत्द्दीपांमधून प्रवाहित झाली आहे. साहित्यिकांच्या प्रतिभेने ही अनेकरंगी इंद्रधनुष्ये महाभारतातूनच निर्माण झाली आहेत. साहित्यिकांनी या महाकाव्याला नवसंजीवन प्राप्त करून दिले आहे. त्यांनी घडविलेले हे नवे रूपदर्शन म्हणजेच महाभारताची झालेली वाढ आहे.

२०) प्रत्येकावर शोकात्म अनुभूतीचा प्रभाव पडत असतो. महाभारत हे तर शोकानुभूतीचा प्रत्यय देणारेच महाकाव्य आहे.

गांधारी, कुंती, द्रौपदी, धृतराष्ट्र, विदुर, कर्ण, अश्वत्थामा, एकलव्य या सगळ्या व्यक्तींचे जीवन कारुण्याने भरलेले आहे. याचे कारण

महाभारतकाराने व्यक्तीं गुणदोषांनी युक्त व मानवी पातळीवरून चित्रित केल्या आहेत. या व्यक्तींच्या महाभारतात रेखाटलेल्या जीवनात प्रखर नाटच व शोकानुभावाचा प्रत्यय येतो. तसेच महाभारतातील व्यक्तीं-मध्ये चिरंतर मानवी मनातील भावभावनांचे चिंतन केलेलें आहें. कारण महाभारतकाराने चार पुरुषार्थापैकी मोक्षाला महत्त्व दिले आहे. यावरून महाभारताला आध्यात्मिक बैठक आहे व त्याकडेच व्यक्तीला नेण्याचा प्रयत्न आहें. या व्यक्तींच्या चित्रणामागील चिंतन महत्त्वाचे आहे, म्हणून महाभारताचे आवाहन सतत वाढणारे आहे. इहतत्त्वाचा अंश परतत्त्वा-पेक्षा या व्यक्तींच्या मध्ये अधिक असून अद्‌भुताच्या आधाराने त्या अवतरल्या आहेत.

२१) महाभारताचा नवा आविष्कार करताना मराठी साहित्यि-कांनी पुढील स्वतंत्र गोष्टींची नव्याने जोड दिली आहे व त्यांच्या साहित्यकृतींनी महाभारतात नवी भर टाकली आहे.

अ) **नवे चिंतनः-**

**'ययाती'** कादंबरीतील ययाती दोन महायुद्धानंतरच्या **खांडेकरांच्या** सखोल व नव्या चिंतनातून अवतरला आहे. महाभारतातील ययातीप्रमाणे हा केवळ कामी नसून सर्व प्रकारच्या सुखलोलुपतेची हाव धरणाऱ्या माणसांचा प्रतिनिधी झाला आहे.

आ) **प्रसंग-निर्मिती :-**

याचे ठळक उदाहरण म्हणजे **वि. वा. शिरवाडकर** ह्यांच्या **'कौंतेय'** नाटकातील कर्ण आणि कुंती यांच्या भेटीचा प्रसंग व त्यातून उमटलेले उत्कट भावनाट्य हे सांगता येईल.

इ) **पूरक व्यक्तिरेखा :-**

**शिवाजी सावंताच्या 'मृत्युंजय'** कादंबरीतील कर्णाचा धाकटा भाऊ 'शोण', पत्नी 'वृषाली' किंवा **रणजित देसाई** ह्यांच्या **'राधेय'** कादंबरीतील 'चक्रधर' या कल्पित व्यक्तींची भर कर्णकथेत पडलेली आहे.

ई ) **घटनांचा तपशील :–**

महाभारतातील घटनेत नवे नवे रंग भरले आहेत. उदा– हरणार्थ, **विद्याधर पुंडलिकांच्या 'माता द्रौपदी'** मध्ये अश्वत्थामा आणि द्रौपदी ह्यांची झालेली गाठ. ही घटनांच्या तपशिलातील नवी भर आहे.

उ) **रस-निर्मिती :–**

**'अश्वत्थाम्याचा छापा' व 'अश्वत्थाम्याचे पारिपत्य'** या नाटकामध्ये बीभत्स व भयानक रसांची निर्मिती झालेली आहे

ऊ) **कल्पकता :–**

**वि. वा शिरवाडकरांच्या 'ययाती आणि देवयानी'** नाटकातील तिसऱ्या अंकात देवयानीच ययातीला वार्धक्याचा शाप नृत्य प्रसंगाच्या निमित्ताने देते.

महाभारतातील व्यक्ती, वातावरण, प्रसंग, याची कालोचित जाण आणि आगळेपणाचे भाव ठेवून त्याला मराठी प्रतिभावंतांनी आपल्या प्रतिभेचा स्पर्श केला आहे.

२२) महाभारतावर आधारित ललित साहित्याची निर्मिती हा पलायनवाद नाही 'सामाजिका'चा पट कमी पडतो म्हणून त्याकडे पाठ फिरविणेहीं नाही, तर वर्तमानकाळातील समस्या आणि व्यक्तीचे स्वभाव यांची पाळेमुळे महाभारतात खोलवर रुजलेली आहेत. विचार, विकार, भावना आणि वासना यांचे सार्वकालीन प्रतिबिंब महाभारतात उमटलेले आहे. द्रौपदीसारख्या लावण्यवतीला आपल्या स्त्रीत्वाला जपावे लागते हे कोणत्याही काळातील स्त्रीच्या संदर्भात म्हणता येईल. साहित्यिकांनी पुराणकाळ आणि वर्तमानकाळ ह्यांतील अनुभवविश्व एकाच वेळी साकार केले आहे. **'कीचकवध'**, **'विद्याहरण'**, **'ययाती'**, **'चक्र'** या साहित्य कृतीतून वर्तमान जीवननिष्ठा प्रत्ययाला येतात. म्हणूनच महाभारत एक सांस्कृतिक पुराणकथा म्हणून मराठी ललित साहित्याचे प्रेरणा-स्थान झाले आहे.

२३) मराठी प्रतिभावंतांनी शोकनाट्याचा नायक म्हणून कर्णाकडे पाहिले आहे. **पहिला पांडव, टाकलेलं पोर, कौंतेय, कर्णायन, मृत्युंजय, राधेय, सूर्यपुत्र** इत्यादी साहित्यकृतीत सामाजिक, राजकीय परिस्थितीच्या संदर्भात कर्णाचे चित्रण रेखाटले असून त्यातील कौंतेय, राधेय यासारख्या साहित्यकृतींमध्ये कलात्मक अभिव्यक्ती आढळते. कर्णाच्या निमित्ताने महाभारताचे पुनर्मंथन व मानवी मनाचे कलात्मक चिंतन आविष्कृत झाले आहे. हिऱ्याचे पैलू पाहावे तसे कर्णाच्या जीवनाचे नवे पैलू प्रकाशात आणले आहेत. त्याचे अंतरंग जाणून घेऊन 'माणूस' म्हणून चित्र रेखाटले आहे, महाभारताचे हे वर्धिष्णू रूप हेरून त्यात नवी भर घातली आहे हे मराठी साहित्यातील कर्णाच्या चित्रणावरून दिसून येते. मात्र अद्याप महाभारतातील पुष्कळच व्यक्तिरेखा आणि कथाभाग अस्पर्शित राहिला आहे कुंती, गांधारी, भी म, विदुर, अश्वत्थामा या व्यक्तिरेखा आणि दुष्यन्त, शकुंतला, सावित्री इत्यादी उपाख्याने व अंबा कथा ही याची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

२४) यावरून साहित्यिकांच्या व्यक्तित्वाला व वदलत्या परिस्थितीला अनुसरून सतत वाढण्याची महाभारताची प्रवृत्ती सिद्ध होते. महाभारतातील व्यक्तींचे पारदर्शक व बहुमिती व्यक्तिमत्त्व, भावोत्कटता, संघर्ष व चैतन्य इत्यादी नवनिर्मितीच्या विविध प्रेरणा देण्याचे सामर्थ्य आढळते.

महाभारत एक जिवंत, वर्धिष्णू व उपजीव्य महाकाव्य ठरले आहे. भविष्यकाळातही तत्कालीन परिस्थितीला आवश्यक अशा प्रेरणा महाभारतातून मिळून ते सतत वाढतच राहील.

* * *

# परिशिष्ट ( ब )

महाभारतावर आधारित काही निवडक साहित्यकृतींची विविध प्रेरणांच्या आधाराने पुढीलप्रमाणे वर्गवारी केली आहे.

※ मनोरजनाची प्रेरणा :–

सौभद्र : अण्णासाहेब किर्लोस्कर (१८८३)
सं. ययाती नाटक : वि. गो. श्रीखंडे (१८८९)
सं. देवयानी पाणिग्रहण नाटक : भि. ग. आठवले (१८९६)
डाव जिंकला : ना. वि. कुलकर्णी (१९२२)
सं. त्रिदंडी संन्यास : कृ. प्र. खाडिलकर (१९२३)
प्रेमयोग (अंबाहरण) : के. म. सोनाळकर (१९४२)
वैरिण झाली सखी : संजीव शेंडे (१९७१)

※ प्रचाराची प्रेरणा :–

सं. विद्याहरण : कृ. प्र. खाडिलकर (१९१३)
सं. पटवर्धन : गो. स. टेंबे (१९२४)
टाकलेलं पोर : के. सी. ठाकरे (१९२८)
सं. संजीवनी हरण : वि. गो. साठ्ये (१९४८)
सं. संजीवनी : भा. वि. वरेरकर (१९६०)

(समाजातील विषमता, कुमारी माता, बालहत्या, मिश्र विवाह, मद्यपान इत्यादी समस्या, स्वातंत्र्यप्रीतीचे, देशभक्तीचे, स्वदेशीच्या प्रचाराचे आवाहन इत्यादी गोष्टींना प्रचाराच्या प्रेरणेत महत्त्व प्राप्त झाले आहे )

※ संस्कृती व समाज दर्शनाची प्रेरणा :–

महाभारतातील व्याख्याने : बाळशास्त्री हरदास (१९५१)
महाभारतातील व्यक्तिदर्शन : शं. के. पेंडसे (१९६४)
महाभारत : एक मुक्त चिंतन : प्रेमा कंटक (१९६७)
युगान्त : इरावती कर्वे (१९६७)
हस्तिनापूर : म. र. शिरवाडकर (१९७२)

**※ उद्‌बोधनाची प्रेरणा :–**

कीचकवध : कृ. प्र. खाडिलकर (१९०७)
देवयानी अर्थात विद्यासाधन : कृ. ह. दीक्षित (१९१३)
ययाती : वि. स. खांडेकर (१९५९)
हा जय नावाचा इतिहास आहे : आनंद साधले (१९६४)
धर्मराज : य. कृ. खाडिलकर (१९७०)

**※ कलात्मक निर्मितीची प्रेरणा :–**

मत्स्यगंधा : य. ना. टिपणीस (१९१३)
महारथी कर्ण : वि. ह. औंधकर (१९३४)
कौंतेय : वि. वा. शिरवाडकर (१९५३)
शर्मिष्ठा : मंगेश पाडगावकर (१९६०)
व्यासपर्व : दुर्गा भागवत (१९६२)
कर्णायन : गो. नी. दांडेकर (१९६२)
देवयानी : ग. त्र्यं. माडखोलकर (१९६४)
कर्ण : बा सी. मर्ढेकर (१९६५)
चक्र : विद्याधर पुंडलिक (१९६६)
ययाती आणि देवयानी : वि. वा. शिरवाडकर (१९६६)
मृत्युंजय : शिवाजी सावंत (१९६७)
एकलव्य : वि. आ. खैरे (१९७२)
वंशाचा व्यास : मधू भोसले (१९७४)
माता द्रौपदी : विद्याधर पुंडलिक (१९७४)

ह्या वर्गवारीत ज्या साहित्यकृती नमूद केल्या काहेत. त्यांमध्ये तेवढी एकच प्रेरणा आहे असे नव्हे तर त्यात इतरही प्रेरणा आढळतात. ह्या साहित्य कृतीमध्ये जी प्रेरणा प्रामुख्याने दिसून येते. त्या वर्गात ती साहित्य-कृती समाविष्ट केली आहे. उदाहरणार्थ 'सौभद्र', 'कीचकवध','ययाती', 'युगान्त' या साहित्यकृती कलात्मक निर्मितीची आणि 'विद्याहरण', 'टाकलेलं पोरं' था साहित्यकृतीत उद्‌बोधनाची प्रेरणा आढळते.

※ ※ ※

## परिशिष्ट (क)

# महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्याची कालानुक्रमे सूची

| | | |
|---|---|---|
| १८३६ | महाभारताची नायिका सती द्रौपदी | – दर्भ |
| १८६१ | जल–नाटक | – नातू वि. म. |
| १८६७ | विराटपर्व नाटक पूर्व भाग | – अभ्यंकर र. श. |
| १८७० | पार्थ–प्रतिज्ञा नाटक | – ताटके वि. ना. |
| १८७२ | सैरंध्री | – नेने व. बा. |
| १८७५ | हिडिंबवध | – नेने व. बा. |
| १८७७ | नरनारायण चरित्र | – मांडवगणे के. त्र्यं. |
| १८७९ | पार्थ पराजय अथवा बुभ्रवाहन अख्यान | – दत्तात्रेय |
| १८७९ | बकासुर नाटक | – वेलणकर गो. मो. |
| १८७९ | नल दमयंती नाटक | – त्रिलीकेकर सो. बा. |
| १८७९ | सुभद्राहरण नाटक | – केळकर वि. म. |
| १८८१ | सुधस्वासत्त्व परीक्षा नाटक | – सरनाईक स. बा. |
| १८८२ | पार्थगर्व परिहार | – सरनाईक स. बा. |
| १८८३ | सं. सौभद्र | – किर्लोस्कर अण्णासाहेब |
| १९८४ | सं. द्रौपदी | – भेंडे शा. ना. |
| १८८४ | द्रौपदी स्वयंवर नाटक | – सरनाईक स. बा. |
| १८८५ | कृष्णार्जुन युद्ध | – केळकर म. वि. |
| १८८५ | बभ्रुवाहन आख्यान | – ढवळे सी. ब. |
| १८८६ | श्री महाभारतांतर्गत उद्योग पर्वातील कृष्ण शिष्टाई | – जोगळेकर व. बा. |
| १८८६ | सं. चक्रव्यूह अथवा अभिमन्यू वध | – सरनाईक स. बा. |
| १८८७ | गद्य–पद्यात्मक कच–देवयानी नाटक | – सरनाईक स. बा. |
| १८८७ | प्रमिलार्जुन | – केळकर ग. वि. |
| १८८९ | सं. द्रौपदीहरण | – धामणकर बा बि. |

| | | |
|---|---|---|
| १८८९ | सं. दमयंती नाटक | – धामणकर बा. वि. |
| १८८९ | सं. ययाती नाटक | – श्रीखंडे पि. गो. |
| १८८९ | साग्रसंगीत नल दमयंती नाटक | – काणे क. म. |
| १८९१ | सं. द्रौपदी नाटक | – भेंडे शा. बा. |
| १८९२ | सं कचदेवयानी नाटक | – कापरेकर वि. भि. |
| १८९६ | अभिनव कर्णवध नावाचे चतुषवेशात्मक नाटक | – रानडे श. गो. |
| १८९६ | सं. देवयानी-पाणिग्रहण नाटक | – आठवले वि. ग. |
| १८९७ | सं. सती दमयंती | – वढावकर श. वि. |
| १८९९ | द्रौपदी वस्त्रहरण नाटक | – मुंबईकर ग. वि. |
| १९०१ | जयद्रथवध नाटक | – वाड वा. ह. |
| १९०१ | विराट-पर्व कीचकवध नाटक | – धामणकर बा. वि. |
| १९०३ | सं. सर्वस्वापहार अथवा द्रौपदी वस्त्रहरण | – पाटणकर मा. वा. |
| १९०४ | जयद्रथ–विडंबन | – दिक्षित कृ. ह. |
| १९०४ | दमयंती | – शेंबेकर धु. र. |
| १९०४ | द्रोण संकोच | – किरात |
| १९०६ | सं. सैरंध्री | – साडविलकर म. रा. |
| १९०७ | कीचकवध | – खाडिलकर कृ. प्र. |
| १९०८ | अश्वत्थामयाची हत्या | – साठे वा. पु ॥क. क.॥ |
| १९०८ | तेजोभंग | – भागवत अ. बा. |
| १९०८ | सं. नलदमयंती नाटक | – लिंबगावकर वि. स. |
| १९०९ | अश्वस्थाम्याचे पारिपत्य | – साठे वा. पु ॥क. क.॥ |
| १९०९ | श्रीकृष्ण चरित्र | – कान्हेरे म. गो. |
| १९०९ | लोहभीम | – साठे वा. पु. |
| १९०९ | सं. सैरंध्री नाटक | – पाटणकर मा. वा. |
| १९१० | कर्णार्जुन | – जोशी माधवराव |
| १९१२ | वत्सला आणि अभिमन्यू | – परळकर व. श. |
| १९१३ | देवयानी अर्थात विद्यासाधन | – दिक्षित कृ. ह. |
| १९१३ | मत्स्यगंधा | – चिटणीस ग. बा. |
| १९१३ | सं विद्यसहरण | – खाडिलकर कृ. प्र. |

| | | |
|---|---|---|
| १९१४ | दर्भ महाभारताची नायिका सती द्रौपदी | – इस्लामपूरकर वामनशास्त्री |
| १९१४ | द्रौपदी–वस्त्रहरण | – भिडे ग. वि. |
| १९१४ | नवीन स. सौभद्र नाटक | – मोडक म. वि. |
| १९१४ | वेणी सहार ॥ रंगावृत्ती ॥ | – बरवे अ. बा. |
| १९१५ | सं. सत्व–परीक्षा | – खाडिलकर कृ. प्र. |
| १९१६ | पौराणिक आर्य स्त्री रत्ने | – दाल ले. ले. |
| १९१६ | सं. स्वयंवर | – खाडिलकर कृ. प्र. |
| १९१७ | प्रार्थ–प्रतिज्ञा | – कुलकर्णी बा. वि. |
| १९१८ | तेजोभंग नाटक | – भागवत अ. बा. |
| १९१९ | सं. वीर–विडंबन | – केळकर ब. चि. |
| १९२० | सं. आत्मतेज | – बामणगावकर ना. रा. |
| १९२० | सं. द्रौपदी | – खाडिलकर कृ. प्र. |
| १९२१ | सध्येय कर्ण चरित्र | – वाकसकर वि. स. |
| १९२२ | डाव जिकला | – कुलकर्णी ना. वि. |
| १९२३ | त्रिदंडी संन्यास | – खाडिलकर कृ. प. |
| १९२४ | सं. पटवर्धन | – टेंब गो. स. |
| १९२४ | प्रेमयोग उर्फ अंबाहरण | – सोनाळकर के. ग. |
| १९२६ | नाट्यरूप भीष्म चरित्र | – करमरकर राधाबाई |
| १९२६ | राजर्षि भीष्म | – परिव्राजक सत्यदेवस्वामी |
| १९२७ | वीर अभिमन्यू | – शुक्ल स. अ. |
| १९२८ | मुलींची द्रौपदी | – किनरे कृ. गो. |
| १९२९ | योगेश्वर व भारतीय | – देशपांडे स. रा. |
| १९२९ | कर्मवीर भगवान श्रीकृष्ण | – |
| १९२९ | सं. वत्सलाहरण | – टेंबे गो. स. |
| १९२९ | कलंक रहस्य (दु. आ.) | – वर्दे श्री. म. |
| १९३० | सं. साक्षात्कार | – शुक्ल अ. अ. |
| १९३१ | पहिला पांडव | – परांजपे शि. म. |
| १९३२ | संधिसंग्राम | – गुप्ते शा. गो. |
| १९३३ | सं. संजीवनी नाटक | – वन्दे शा. रा. |

| | | |
|---|---|---|
| १९३३ | पांचाली | – बेंडे श्री. बं. नं. |
| १९३३ | सं. सावित्री | – खाडिलकर कृ. प्र. |
| १९३४ | भारतीय वीरदाता कर्ण | – वैशंपायन का. रं. |
| १९३४ | महावीर कर्ण | – ओंधकर वि. ह |
| १९३५ | नाटिका | – गोखले ग. वि. |
| १९३६ | कर्णांची उत्कट तत्त्वनिष्ठा अर्थात मुत्सद्यांचे हुकलेलें डाव | – ताडपत्रीकर श्री. ना. |
| १९३९ | टाकलेलं पोर | – ठाकरे के. सी |
| १९४१ | सुभद्राहरण | – सुखटणकर रा. म |
| १९४२ | एकलव्य | – सोहोनी ग. प्र |
| १९४२ | स्वयंभू | – वर्तक श्री प. |
| १९४२ | शर्मिष्ठा | – कारखानीस म. आ. |
| १९४३ | स्वैरिणी अर्थात कलियुगारंभ | – कारखानीस त्र्यं सी. |
| १९४४ | महारथी कर्ण | – फाटक वा वा. |
| १९४५ | पिता-पुत्र-युद्ध | – कामत मा आ |
| १९४६ | मानला तर देव | – कुलकर्णी ना. वि. |
| १९४७ | हंसदूत | – वैद्य ग. सी. |
| १९४८ | महावीर कर्ण | – बोडस ग. कृ. |
| १९४८ | श्री संजीवनी–हरण काव्य | – साठे वि. गं. |
| १९४८ | श्रीकृष्ण–चरित्र रहस्य | – घैसास श. गो. |
| १९४९ | श्रीकृष्ण चरित्र (आ. ६ वी) | – वैद्य चि वि. |
| १९४९ | सं. संन्याशाचे लग्न | – वरेरकर भा वि |
| १९५० | भगवान श्रीकृष्ण (आ २ री) | – सप्रे धों वि |
| १९५० | सं गुरुभक्तीचा साक्षात्कार | – नार्वेकर ना. नी. |
| १९५० | महारथी कर्ण | – हरदास बाळशास्त्री |
| १९५१ | महाभारतावरील व्याख्याने | – हरदास बाळशास्त्री |
| १९५३ | कौंतेय | – शिरवाडकर वि. वा. |
| १९५५ | महाभारत (खंड १ व २) | – दांडेकर गो. नी. |
| १९५९ | श्रीकृष्णायन | – दांडेकर गो. नी. |
| १९५९ | कौरव-पांडव-युद्ध | – |

| | | |
|---|---|---|
| १९५९ | ययाति | – खांडेकर वि. स. |
| १९६० | सं. संजीवनी | – वरेरकर भा. वि. |
| १९६१ | शर्मिष्ठा | – पाडगावकर मंगेश |
| १९६२ | कर्णायन | – दांडेकर गो. नी. |
| १९६२ | व्यासपर्व | – भागवत दुर्गा |
| १९६३ | भारतातील थोर स्त्रिया | – दांडेकर शं. वा. (संपादक) |
| १९६४ | महाभारतातील व्यक्तिदर्शन | – पेंडसे शं. के. |
| १९६४ | देवयानी | – माडखोलकर ग त्र्यं. |
| १९६४ | सं. मत्स्यगंधा | – कानटेकर वसंत |
| १९६४ | हा जय नावाचा इतिहास आहे | – साधले आनंद |
| १९६५ | नष्टश्रेष्ठ आणि चार संगीतिका (कर्ण) | – मर्डेकर बा. सी. |
| १९६६ | चक्र | – पुंडलिक विद्याधर |
| १९६७ | महाभारत एक मुक्त चिंतन | – कंटक प्रेमा |
| १९६७ | मृत्युंजय | – सावंत शिवाजी |
| १९६७ | युगांत | – कर्वे इरावती |
| १९६९ | महापुरुष | – साधले आनंद |
| १९७० | धर्मराज | – खाडिलकर य. कृ. |
| १९७० | महाभारताचे वास्तव दर्शन | – आठवले अनंतराव |
| १९७० | युधिष्ठिर | – देशपांडे कमलाबाई |
| १९७१ | ययाति | – कर्नाड गिरीश (अनु श्री. र. भिडे) |
| १९७१ | राधेय कर्ण | – वाळिंबे रा शं. |
| १९७१ | वैरिण झाली सखी | – शेंडे संजीव |
| १९७१ | सीमा वृक्ष | – वाळिंबे रा. शं. |
| १९७१ | स्वयंभू | – वर्तक श्री. प. |
| १९७२ | एकलव्य | – खैरे वि. आ. |
| १९७२ | माता द्रौपदी | – पुंडलिक विद्याधर |
| १९७२ | हस्तिनापूर | – शिरवाडकर म. र. |
| १९७३ | पांचाली | – क्षेत्रमाडे सुमती |

| | | |
|---|---|---|
| १९७३ | महर्षि वेदव्यास | – कोल्हटकर कृ. के. |
| १९७३ | राधेय | – देसाई रणजित |
| १९७३ | सूर्यपुत्र | – देशमुख विजय |
| १९७३ | वंशाचा व्यास | – खैरे वि. आ. |
| १९७४ | जीवन व्यास | – भोसले मधु |
| १९७४ | पंचकन्या | – केळकर मालवा |
| १९७४ | मराठी ललित साहित्यातील कर्ण | – पाटील सुशीला |
| १९७५ | कल्पवृक्ष (पूर्वार्ध) | – खेर भा. द. |
| १९७५ | द्रौपदी | – मोडक वि. आ. |
| १९७६ | कर्ण खरा कोण होता? | – पणशीकर दाजी |
| १९७६ | कल्पवृक्ष (उत्तरार्ध) | – खेर भा. द. |
| १९७६ | श्रीकृष्ण-जीवन दर्शन | – आठवले पांडुरंगशास्त्री |
| १९७६ | मरणगंध | – कांत वा. रा. |
| १९७६ | यज्ञ संभवा | – पाटील सुशीला |
| १९७७ | महाभारत एक सुडाचा प्रवास | – पणशीकर दाजी |
| १९७७ | भारतीय कर्णवीर | – देशपांडे स. रा. |
| १९७७ | योगेश्वर श्रीकृष्ण | – रानडे रा. के. |
| १९७७ | सारथी सर्वांचा | – खेर भा. द. |

* * *

# परिशिष्ट ( ड )

## प्रबंधात अभ्यासलेल्या काही महत्त्वाच्या नोंदी.

### १) महाभारताधिष्ठित मराठी साहित्यकृती :-

विद्याहरण, ययाति, ययाति आणि देवयानी, शर्मिष्ठा, मत्स्यगंधा, सीमावृक्ष भीष्म, वंशाचा व्यास, कर्णायन, महारथी कर्ण, कौंतेय, टाकलेलं पोर, महापुरुष, मृत्युंजय. राधेय, सूर्यपुत्र, माता द्रौपदी, एकलव्य इत्यादी १५० हून अधिक साहित्यकृती अभ्यासलेल्या आहेत.

### २) मराठी प्रतिभेचा स्पर्श लाभलेले काही प्रसंग :-

कर्ण–कुंती संवाद, द्रौपदी स्वयंवर, द्रौपदी वस्त्रहरण, भीष्म प्रतिज्ञा, कच-देवयानी प्रणय, ययाति शर्मिष्ठा प्रणय, कृष्णशिष्टाई, कर्ण जन्म रहस्य, पांडवाचा अज्ञातवास, द्रौपदी अश्वत्थामा भेट, अभिमन्यूचे बलिदान, एकलव्याची गुरुदक्षिणा, सुभद्राहरण

### ३) महाभारताधिष्ठित मराठी ललित साहित्यातील काही ठळक व्यक्तिरेखा–

कर्ण, ययाति, कच, शर्मिष्ठा, देवयानी, भीष्म, द्रौपदी, कृष्ण, धर्मराज, भीम, अर्जुन, अश्वत्थामा, गांधारी, एकलव्य, अभिमन्यू, इत्यादी. कुंती, धृतराष्ट्र, दुर्योधन, विदुर, द्रोणाचार्य, पांडू, सत्यवती, अंबा, विकर्ण, दु:शीला इत्यादी व्यक्ती सापेक्षत: अलक्षित म्हणून उल्लेखिता येतील.

अनुराधा (शर्मिष्ठा), गौरी (मत्स्यगंधा), चक्रधर (राधेय) शोण, सुप्रिया (मृत्युंजय), मंदार (ययाति), गर्ग (सौभद्र), वंचर (एकलव्य), युवराज (विद्याहरण), चित्रलेखा (ययाति), द्विजिव्ह (संजीवनी)

* * *

## परिशिष्ट (इ)

# मराठी साहित्यात आढळणाऱ्या महाभारतातील महत्त्वाच्या विषयांची सूची

**(पर्वाचे नाव प्रारंभी दिले असून कंसातील क्रमांक अध्याय निदर्शक आहेत)**

*** आदिपर्व :-**

पर्व संग्रह पर्व (२), दुष्यंत शकुंतला उपाख्यान (६८-७४), कचोपाख्यान (७५-७७), ययाती उपाख्यान (७७-८५), भीष्मकथा (९८-१०६), विदुर (१०६, ११४, १४५), कर्ण जन्म वृत्त (१११), कर्णाला राज्याभिषेक (१३६-१३७), जवुगृहदाह (१४८), बकवध (१६४), द्रौपदी जन्मकथा (१६६), द्रौपदी-स्वयंवर (१८४-१९२), विदुराचे भाषण (२०५-२०६), सुंदोपसुंद कथा (२०९-२१२), सुभद्राहरण (२१९-२२१), कृष्णार्जुन युद्ध (२२७), मयसभा वर्णन (२२८-२३४)

*** सभापर्व :-**

जरासंध कथा (१७-२४), शिशुपाल वध (४०-४५), द्रौपदी केशाकर्षण (६७-६९)

*** वनपर्व :-**

किर्मिर वध (११), किरातार्जुन युद्ध (३९-४०), अर्जुन-उर्वशी कथा (४५-४६), नलोपाख्यान (५२-७९), द्रौपदीहरण (२६४-२७१) सावित्री उपाख्यान (२९३-२९९), कवच कुंडल हरण (३००-३१०), यक्ष प्रश्न (३१३)

*** विराटपर्व :-**

अज्ञातवासारंभ (१-१२), जीमूत वध (१३), कीचक वध (१४-२४), कर्ण पलायन (५४-६४), उत्तरा विवाह (७२)

**※ उद्योगपर्व :–**

श्रीकृष्ण भाषण (२९), विदुर नीती (३३-४०), कृष्ण कर्ण संभाषण (३६६-३७२), कुंती-कर्ण भेट (३७४-३७७)

**※ भीष्मपर्व :–**

भीष्म पर्व (१३), श्रीमद्भगवद्गीता (२५-४२), भीष्म कर्ण संवाद (२५८)

**※ द्रोणपर्व :-**

अभिमन्यूवध पर्व (३३–४९), जयद्रथ वध (१४६), घटोत्कच वध (१७९), द्रोणवध (१९२)

**※ कर्णपर्व :–**

कर्ण शल्य संवाद (३५-४५), कृष्णार्जुन युद्ध (८७-९१)

**※ शल्यपर्व :-**

दुर्योधन वध (५८)

**※ सौप्तिकपर्व :–**

अश्वत्थाम्याचा संहार (८), मणिहरण (११-१६), गांधारी विलाप (१५-२५), कर्ण गूढ कथन (२७)

**※ शांतिपर्व :–**

कर्ण शल्य वृत्त (४), कर्णाला ब्रह्मास्त्र प्राप्ती (५), युधिष्ठिर राज्याभिषेक (४०), श्राद्धक्रिया (४२)

**※ अनुशासनपर्व :–**

भीष्माला मोक्ष (१६८)

**※ महाप्रस्थानिकपर्व :–**

पांडव द्रौपदीचे पतन (१-३)

**※ स्वर्गारोहणपर्व :–**

युधिष्ठिर देहत्याग (२-३)

※ ※ ※

# प्राचार्य डॉ. भास्कर व्यं. गिरधारी यांच्या प्रकाशित साहित्याची सूची

- ☐ अभिव्यक्ती (समीक्षालेखसंग्रह)
  प्रस्तावना : तात्यासाहेब शिरवाडकर
  अनमोल प्रकाशन, पुणे / १९७७

- ☐ आलेख (समीक्षा लेख संग्रह)
  राधेय प्रकाशन, नागपूर / १९८१

- ☐ बाहुल्या : एक आस्वाद (समीक्षा)
  अनमोल पुस्तकालय, पुणे / १९७६

- ☐ मराठी 'शुद्ध' लेखनाचा मार्ग (व्याकरण)
  विभा प्रकाशन, नाशिक / १९८५

- ☐ मराठी साहित्यातील ययाती (समीक्षा)
  विभा प्रकाशन, नाशिक / १९८९

- ☐ हरिभाऊंचे साप्ताहिक करमणूक
  विभा प्रकाशन, नाशिक / १९८९

- ☐ आदिवासी विद्यार्थी मराठी कौशल्य सुधार
  विभा प्रकाशन, नाशिक / १९८९

- ☐ कर्ण आणि मराठी प्रतिभा
  विभा प्रकाशन, नाशिक / १९८९

## ● संपादित साहित्य

- ☐ पीएच्. डी. प्रबंध : रूपरेषा आणि निष्कर्ष (सहकार्याने)
  गो. ए. सोसायटी प्रकाशन, नाशिक / १९८०

- ☐ महाभारतातील 'दुर्गा स्तोत्र'
  विभा प्रकाशन, नाशिक / १९८२

- ☐ ना. गोपाळकृष्ण गोखले चरित्र (सहकार्याने)
  गो. ए. सोसायटी प्रकाशन, नाशिक / १९८३

- ☐ जिज्ञासा
  गो. ए. सो. जिज्ञासा महाविद्यालय प्रकाशन,
  नाशिक / १९८३

## ● प्रस्तावना लेखन

- ☐ युद्ध (काव्यसंग्रह) नीलकांत चव्हाण
  कविता प्रकाशन, नाशिक / १९८५

- ☐ देव मामलेदार (चरित्र) दीपक माळी
  अध्यात्म ज्ञानपीठ, नाशिक / १९८९

✲ ✲ ✲



## डॉ. भास्कर व्यंकटराव गिरधारी

प्राचार्य व मराठीचे नामवंत प्राध्यापक.
पीएच्. डी., एम्. फील् पदवी मार्गदर्शक.
समीक्षक, लेखक, प्रभावी वक्ते.
'महाभारता' वर महाराष्ट्रभर व्याख्याने.
विविध विद्यापीठे, सार्वजनिक,
सांस्कृतिक संस्थाकार्यात सहभाग.
विविध शैक्षणिक व साहित्यिक
मेळाव्यात महत्त्वाची पदे, सन्मान प्राप्त.

शैक्षणिक, प्रशासकीय, वाङ्मयीन
परिषदात शोधनिबंध वाचन.
विविध पारितोषिके आणि पुरस्कार.
आदिवासी साहित्य आणि संस्कृती चिंतन.
मराठी नियतकालिकातून सातत्याने लेखन.
आकाशवाणी, दूरदर्शनवर कार्यक्रम.